सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | बुधवार, १३ मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १६४ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

**आज सदाफुली पुरवणी नाही**

काही तांत्रिक अडचणींमुळे आजच्या अंकासोबत 'सदाफुली' पुरवणी नाही. याची वाचक व विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

## विचारपुष्प



पायातील दगड सुद्धा इमारतीचा सारा भार वर्षानुवर्षे सांभाळत असतात, पण ते आपली जागा सोडत नाहीत. खचूनही जात नाहीत. उच्च स्थानाकडे जाण्याची त्यांना इच्छा नसते; आपले स्थान सोडणे त्यांच्या गावीही नसते, कोसळून पडण्याचा तर प्रश्नच नसतो. लोकांना आपले नाव माहिती व्हावे असा विचारही त्यांच्या मनात येत नाही.

**- स्व. बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# पेपरफुटीमुळे 'नीट' रद्द; सीबीआय चौकशीचा आदेश

◆ **नवी दिल्ली, १२ मे**

प्रश्नपत्रिका फुटीबाबत झालेल्या आरोपांच्या पृष्ठभूमीवर राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) मंगळवार, ३ मे रोजी घेण्यात आलेल्या नीट (यूजी) २०२६ परीक्षा रद्द केली असून सरकारने या अनियमिततांची सखोल चौकशी करण्याचा निर्देश सीबीआयला दिला आहे.

**'एनटीए'चा निर्णय**



नवी दिल्ली येथे निदर्शने करताना विद्यार्थी

वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा आता नव्याने घेतली जाईल. या परीक्षेच्या तारखा स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

पारदर्शकता राखण्याच्या आणि राष्ट्रीय परीक्षा प्रणालीवरील विश्वास जतन करण्याच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे, असे राष्ट्रीय चाचणी संस्थेने 'एक्स'वरील निवेदनात म्हटले आहे. केंद्रीय संस्थांच्या समन्वयाने एनटीएने नंतर तपासलेल्या माहितीच्या आधारे तसेच कायदा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी सामायिक केलेल्या तपास निष्कर्षांच्या आधारे, एनटीएने भारत सरकारच्या परवानगीने ३ मे रोजी झालेली नीट (यूजी) परीक्षा रद्द करण्याचा आणि ही परीक्षा स्वतंत्रपणे कळविण्यात येणाऱ्या तारखांना पुन्हा घेण्याचा निर्णय घेतला आहे, असे या संस्थेने म्हटले आहे.

नीट परीक्षा ३ मे रोजी भारतातील ५५१ आणि विदेशातील १४ शहरांमध्ये झाली होती. देशभरातील २३ लाख नोंदणी केलेल्या उमेदवारांसाठी एनटीएने ही परीक्षा आयोजित केली होती. प्राप्त झालेली माहिती आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी सामायिक केलेले निष्कर्षांचा एकत्रित विचार करता, सध्याची परीक्षा प्रक्रिया कायम ठेवता येणार नसल्याचे सिद्ध झाले, असे एनटीएने म्हटले आहे.

पुन्हा घेण्यात येणाऱ्या परीक्षेच्या तारखा तसेच नव्याने जारी केल्या जाणाऱ्या प्रवेशपत्रांचे वेळापत्रक, आगामी दिवसांत संस्थेच्या अधिकृत माध्यमांद्वारे कळविले जाईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. परीक्षेसंबंधी सखोल चौकशी करण्यासाठी, हे प्रकरण सीबीआयकडे सोपविण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

चौकशीसाठी सीबीआयला संपूर्ण सहकार्य केले जाईल तसेच इतर साहित्य, रेकॉर्ड उपलब्ध करून दिले जाईल. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या हितासाठी आणि ज्या विश्वासावर राष्ट्रीय परीक्षा प्रणाली आधारली आहे, त्याचा मान राखून घेण्यात आला आहे, असे एनटीएने म्हटले आहे.

### कोचिंग क्लासेस संशयाच्या घेऱ्यात

पेपरफुटीच्या रॅकेटमागे कोचिंग नेटवर्क, दलाल आणि काही तांत्रिक तज्ज्ञांची भूमिका असल्याचा संशय वर्तविला जात आहे. यात मनीष नावाच्या व्यक्तीचे नाव समोर आले. राजस्थानातील पीजीच्या एका विद्यार्थ्याच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका बाहेर आणली गेली. त्यानंतर ती विविध राज्यांमध्ये वितरित करण्यात आली. पोलिसांनी कित्येक संशयितांना ताब्यात घेतले आहे. (वृत्तसंस्था)

### नाशिकमध्ये फुटला पेपर

**फुटलेल्या प्रश्नपत्रिकेची पहिली प्रत नाशिकमध्ये तयार करण्यात आली होती. हीच प्रत हरयाणाला पोहोचली. तिथे फुटलेल्या प्रश्नपत्रिकेचे १० संच तयार करण्यात आले. त्यानंतर ही फुटलेली प्रश्नपत्रिका हरयाणातून बिहार, आंध्रप्रदेश, जम्मू-काश्मीर तसेच राजस्थानात पोहोचली. या प्रकरणी नाशिकच्या इंदिरानगर पोलिस ठाणे हद्दीतून एकाला ताब्यात घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.**

### जयपुरात सूत्रधाराला अटक

**नीट परीक्षा पेपरफुटीतील सूत्रधाराला राजस्थानच्या जयपुरातून अटक करण्यात आली. मनीष असे त्याचे नाव असून त्याने प्रश्नपत्रिका छापण्यापूर्वीत संभाव्य प्रश्नांची माहिती मिळवली होती, असे सूत्रांनी सांगितले.**

## परीक्षा रद्द; पुढे काय?



**प्रश्न : नीट यूजी-२०२६ परीक्षा का रद्द झाली?**

**उत्तर** : परीक्षेशी संबंधित अनियमिततेनंतर एनटीएने ३ मे रोजी झालेली परीक्षा रद्द केल्याची घोषणा केली. या प्रकरणाचा तपास राजस्थानच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप आणि इतर संस्थांकडून केला जात आहे. या परीक्षेचे आयोजन परीक्षेशी निगडित मानक संचालन प्रक्रियेच्या अंतर्गत करण्यात आले होते. यात प्रश्नपत्रिकांच्या हालचालींचे जीपीएस ट्रॅकिंग, बायोमेट्रिक पडताळणी, एआय आधारित सीसीटीव्ही देखरेख आणि ५-जी जॅमर्सचा समावेश होता.

**प्रश्न : फेरपरीक्षा कधी होईल?**

**उत्तर** : नवीन तारखा सध्या जाहीर करण्यात आलेल्या नाहीत. ही परीक्षा येत्या काही दिवसांत अधिकृत माध्यमांद्वारे स्वतंत्रपणे सूचित केली जाणाऱ्या तारखांना पुन्हा घेतली जाईल, असे एनटीएने स्पष्ट केले आहे.

**प्रश्न : विद्यार्थ्यांना पुन्हा नोंदणी करावी लागेल?**

**उत्तर** : मे २०२६ च्या सत्रातील नोंदणीचा तपशील आणि उमेदवारी ही पुन्हा आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षेसाठी पुढे ग्राह्य धरली जाईल, असे एनटीएने स्पष्ट केले आहे.

**प्रश्न : उमेदवारांना परीक्षेचे शुल्क पुन्हा भरावे लागेल का?**

**उत्तर** : कोणतेही अतिरिक्त परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. विद्यार्थ्यांनी यापूर्वी भरलेले शुल्क त्यांना परत केले जाईल, असे एनटीएने स्पष्ट केले आहे.

**प्रश्न : नवीन प्रवेशपत्रे जारी केली जातील का?**

**उत्तर** : पुन्हा जारी केल्या जाणाऱ्या प्रवेशपत्रांचे वेळापत्रक अधिकृत माध्यमांद्वारे कळवले जाईल, असे एनटीएने सांगितले आहे.

**प्रश्न : विद्यार्थ्यांना तीच परीक्षा केंद्रे मिळतील का?**

**उत्तर** : मे २०२६ च्या सत्रासाठी निवडलेली परीक्षा केंद्रेच पुन्हा आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षेसाठीही कायम ठेवली जातील. मात्र, परीक्षा केंद्र वाटपामध्ये काही बदल होण्याची शक्यता आहे की नाही, याविषयी एनटीएने कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

**प्रश्न : ही परीक्षा पुन्हा बाह्य संस्थांच्या माध्यमातून घेतली जाईल का?**

**उत्तर** : ही पीरक्षात्यांच्या अंतर्गत संसाधनांचा वापर करून घेतली जाईल, असे एनटीएने स्पष्ट केले आहे.

**प्रश्न : विद्यार्थ्यांनी आता काय करावे?**

**उत्तर** : फेरपरीक्षेच्या तारखा, नवीन प्रवेशपत्रे आणि परीक्षा संबंधित सूचनांविषयीच्या अद्यतनांसाठी केवळ एनटीएच्या अधिकृत माध्यमांवरच अवलंबून राहावे, असा सल्ला उमेदवारांना आणि पालकांना देण्यात आला आहे. समाज माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या, परंतु खात्री नसलेल्या वृत्तांकडे विद्यार्थ्यांनी दुर्लक्ष करावे, असेही एनटीएने सूचित केले आहे.

## गुंतवणूकदारांचे ११ लाख कोटी स्वाहा

◆ **मुंबई, १२ मे**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायल-हमास युद्धविराम आता अखेरच्या घटका मोजत असल्याचे विधान केले. या विधानामुळे जागतिक राजकारणात खळबळ उडाली असून, त्याचे तीव्र पडसाद भारतीय शेअर बाजारात उमटले. मंगळवारी गुंतवणूकदारांचे तब्बल ११ लाख कोटी रुपये एकाच दिवसात मातीमोल झाले.



राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ५० हा ४३६ अंकांनी म्हणजेच १.८३ टक्क्यांनी घसरून २३,८१५.८५ वर स्थिरावला. बाजारातील व्यवहार सुरू होताना निफ्टी २३,७२२.६ अंशांवर होता, त्यानंतर तो २३,७५७.५५ या उच्चांकी स्तरावर पोहोचला. मात्र, विक्रीच्या दबावामुळे त्याने २३,३४८.४ या नीचांकी पातळीला स्पर्श केला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्येही १४५६.०३ अंकांची मोठी पडझड झाली, ज्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले.

क्षेत्रनिहाय कामगिरीचा विचार करता, सर्वच प्रमुख क्षेत्रांमध्ये विक्रीचा प्रचंड दबाव दिसून आला. आयटी (माहिती तंत्रज्ञान) क्षेत्रात सर्वाधिक घसरण झाली. त्यापाठोपाठ रिॲलिटी, कन्झ्युमर ड्युरेबल्स आणि मीडिया या क्षेत्रांमधील समभागांनाही फटका बसला. बँकिंग आणि वित्तीय सेवा क्षेत्रातील निफ्टी बँक, पीएसयू बँक आणि प्रायव्हेट बँक हे निर्देशांकही घसरल्याने बाजारावरचा ताण वाढला. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### परिषदेच्या १० सदस्यांचा १४ मे रोजी शपथविधी

**मुंबई** : महाराष्ट्र विधानपरिषदेवर बिनविरोध निवडून आलेले नऊ सदस्य आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेले एक, अशा एकूण १० नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सोहळा गुरुवार, १४ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. मुंबईतील विधान भवन येथील मध्यवर्ती सभागृहात सकाळी ११.०० वाजता हा समारंभ पार पडणार असून, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे सर्व नवनिर्वाचित सदस्यांना पदाची व गोपनीयतेची शपथ देतील. या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपाध्यक्ष अण्णा बनसोडे आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्यासह विधानपरिषदेचे अनेक मान्यवर सदस्य या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

### गंधक स्फोट प्रकरणी गनदुकान मालकावर गुन्हा

**सोलापूर, दि.१२ मे-**

कारच्या डिक्कीमध्ये गंधकाचे बॉक्स ठेवताना स्फोट होऊन झालेल्या दुर्घटने प्रकरणी सपोनि अजित पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गन दुकान म ालक बाळासाहेब प्रभाकर फुले (रा. अकलूज) याच्याविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सोमवार, दि.११ मे २०२६ रोजी मुरारजी पेठ येथे गंधकाचा स्फोट झाला होता. यात दुकानातील कामगार केदार छत्रे (रा.समता नगर, विजापूर रोड, सोलापूर) गंभीर जखमी झाले. सध्या त्यांच्यावर येथील सोलापूर म ार्कंडेय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. स्फोटक पदार्थामुळे मानवी जीवितास धोका निर्माण होऊ शकतो; याची जाणीव असतानाही गनदुकान मालक बाळासाहेब फुले याने पुरेशी खबरदारी घेतली नाही. केदार छत्रे यांना सुरक्षेचे साहित्य दिले नाही. स्फोटक पदार्थांच्या सुरक्षिततेबाबत निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवण्यात आला.

### सनातन संपवायलाच हवा : उदयनिधी स्टॅलिन

**चेन्नई** : तामिळनाडू विधानसभेतील विरोधी पक्षनेता आणि द्रमुकचा आमदार उदयनिधी स्टॅलिन पुन्हा एकदा सनातनच्या मुद्यावर बरळला आहे. सनातनने लोकांचे विभाजन केले. तो संपुष्टात आणला पाहिजे, असे तारे उदयनिधी स्टॅलिनने विधानसभेत तोडले. त्याच्या या आक्षेपार्ह वक्तव्याचे पडसाद उमटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उदयनिधी स्टॅलिनने आपल्या भाषणात राजकीय सौजन्य आणि सहकार्याबद्दलही भाष्य केले. द्रमुकसह अनेक नेत्यांनी मुख्यमंत्री जोसेफ विजय यांना शुभेच्छा दिल्या आहेत

## देशहित प्रथम! मंत्र्यांनी परदेश दौरे टाळले

### नेत्यांनी धरली सार्वजनिक वाहतुकीची वाट

◆ **मुंबई, १२ मे**

इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला काटकसरीचा मंत्र दिला आहे. विदेशी चलनाची बचत आणि इंधन टंचाईवर मात करण्यासाठी अनावश्यक खर्च आणि परदेश दौरे टाळण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले होते. या आवाहनाला महाराष्ट्रातील सत्ताधारी नेत्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत राष्ट्र प्रथम या भावनेचे दर्शन घडवले आहे.

राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी आपला नियोजित लंडन, पॅरिस आणि ॲम्स्टरडॅमचा कौटुंबिक दौरा रद्द केला आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी घेतली आहे. १२ आमदारांसह होणारा त्यांचा जपानचा अधिकृत दौरा रद्द केला आहे. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर सरकारी तिजोरीवर भार पडू नये आणि इंधनाची बचत व्हावी, यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयाचे राजकीय वर्तुळातून कौतुक होत आहे. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी इंधन बचतीचा संदेश थेट कृतीतून दिला. मंगळवारी दुपारी १२ वाजता त्यांनी विधानभवन ते धारावी असा प्रवास मेट्रो-३ या भुयारी मेट्रोने केला. भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनीही इंधन बचतीसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यांनी नुकतीच इलेक्ट्रिक वाहनाची टेस्ट ड्राइव्ह घेतली असून, भविष्यात केवळ ई-वाहनेच वापरण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. (वृत्तसंस्था)

# जिल्हा सहकारी बँकांमध्ये स्थानिकांना नोकऱ्या

## सहकार विभागाचा मोठा निर्णय, सकारात्मक बदल घडणार

**विनय पुराणिक**

◆ **पुणे, १२ मे**





राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरतीमध्ये स्थानिकांसाठी ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय सहकार विभागाने घेतला आहे. ज्या जिल्हा बँकांनी पदभरतीची जाहिरात या निर्णयापूर्वी प्रसिद्ध केली आहे, त्या बँकांनाही हा निर्णय लागू असणार आहे. त्यामुळे राज्यातील स्थानिकांना जिल्हा पातळीवरच गुणवत्तेनुसार नोकरीची संधी मिळणार असून स्थलांतरण रोखण्यासाठी चांगला निर्णय घेतला असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

'सहकारांतर्गत सहकार' या संकल्पनेनुसार जिल्हा बँका या प्राथमिक सहकारी संस्थांच्या मातृसंस्था आहेत. जिल्हा बँकांचे कार्यक्षेत्र संबंधित जिल्ह्यापुरते मर्यादित आहे. या बँकांचे सर्व सभासद त्या जिल्ह्यातील असतात. त्यामुळे जिल्हा बँकेच्या नोकरी भरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिल्यास असे कर्मचारी बँकेचे ग्राहक, सभासद, ठेवीदार यांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देऊ शकतील. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. सहकार विभागाचे अपर निबंधक संतोष पाटील यांनी हे आदेश प्रसिद्ध केले आहेत.

संबंधित जिल्हा बँकेने तिचे कार्यक्षेत्र असलेल्या जिल्ह्यातील मूळ रहिवासी अधिवास प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना ७० टक्के जागा राखीव ठेवाव्यात. उर्वरित ३० टक्के जागा जिल्ह्याबाहेरील उमेदवारांसाठी खुल्या असतील. मात्र, जिल्ह्याबाहेरील उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास या जागा स्थानिक उमेदवारांमधून भरता येतील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. पुणे, नाशिक, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर अशा सर्व जिल्ह्यांत या निर्णयाचा थेट फायदा होणार आहे.

### काय होणार फायदा?

**७० टक्के जागा स्थानिकांसाठी राखीव ठेवल्याने हजारो नोकऱ्या स्थानिक तरुणांच्या हाती येतील. प्रत्येक जिल्हा बँकेत ५० ते २०० पदांची भरती होत असल्याने, राज्यस्तरावर एकूण हजारो पदांवर स्थानिक युवकांना प्राधान्य मिळेल. गावातील पदवीधर, व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेले तरुण शहरांकडे धाव घेत होते, त्यांना चांगली संधी उपलब्ध होऊन स्थलांतर थांबेल.**

### ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी

**सहकार विभागाच्या या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होऊन स्थानिक कर्मचारी असल्याने शेतकरी, छोटे उद्योजक आणि बचत गटांना अधिक चांगली सेवा मिळेल. स्थानिक भाषा, रीतिरिवाज आणि समस्यांची जाणीव असल्याने काम अधिक प्रभावी होईल. अनेक जिल्ह्यांत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरणार असल्याचेही सहकार विभागाने नमूद केले.**

> ही मागणी अनेक वर्षांपासून होती. त्यानुसार, सहकार विभागाने राज्य शासनाला प्रस्ताव पाठवून याबाबत अभिप्राय आणि परवानगी मागितली होती. सरकारने सहमती दर्शविल्याने आता केवळ स्थानिकांच्या नोकरीचा प्रश्न सुटला नाही तर, जिल्ह्यातील आर्थिक स्वायत्तता वाढण्यास आणि सहकार क्षेत्रात विकसनशील कामे सुलभ पद्धतीने होण्यास मदत होणार आहे.
>
> **- दीपक तावरे,** सहकार आयुक्त

> या निर्णयासोबत भरती प्रक्रिया पारदर्शक आणि वेगवान ठेवणे गरजेचे आहे. ऑनलाइन परीक्षा, मुलाखती आणि नियुक्ती यात जिल्हा पातळीवरच होणे अपेक्षित आहे, जेणेकरून स्थानिक तरुणांना खऱ्या अर्थाने फायदा होईल. हा निर्णय राज्यातील सहकार क्षेत्रात मोठा बदल घडवून आणेल. सहकार क्षेत्रातील बँकांना तसेच ग्राहकांना अपेक्षित सुविधा, सुलभता, मजबूत व विश्वासार्हता प्राप्त होईल.
>
> **- विद्याधर अनास्कर,** सहकार तज्ज्ञ

# 'कृषी पर्यटक' विभागासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र तहसीलदारांची गरज

### जिल्हा कृषी पर्यटन समितीचे जिल्हाध्यक्ष लहू आवताडे

**तभा वृत्तसेवा | अविनाश गायकवाड**

**सोलापूर, दि. १२ मे-**

प्रत्येक जिल्हा हा सेंद्रिय शेतीचा व कृषी पर्यटक जिल्हा म्हणून ओळखला गेला पाहिजे, अशी अपेक्षा सर्वांचीच आहे. ग्रामीण संस्कृतीचा साजबाज राखणारा हा उपक्रम आता लोकप्रिय ठरू लागला आहे. हजारो शेतकरी या कृषी पर्यटन उपक्रमांमध्ये सामील होऊन आत्मसन्मानाने जगत आहेत. प्रत्येक जिल्ह्यात या पर्यटन केंद्रांचे संपूर्ण कामकाज सांभाळण्यासाठी 'स्वतंत्र तहसीलदारांची' नेमणूक व्हावी. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात येणार आहे, असे सोलापूर जिल्हा पर्यटन समितीचे अध्यक्ष तथा सीनाई कृषी पर्यटन केंद्राचे मालक लहू आवताडे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना सांगितले.

दि.१६ मे रोजी जागतिक कृषी पर्यटक दिन आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना ते पुढे म्हणाले, आपल्या जिल्ह्यात धार्मिक पर्यटनाबरोबर कृषी पर्यटनाचीही मोठी संधी आहे. याचा संपूर्ण कारभार सांभाळण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नाहीत; यामुळे कृषी पर्यटन विकासाला पाहिजे तशी चालना मिळत नाही. आपल्याच जिल्ह्यात नाहीतर राज्यातील इतरही जिल्हाधिकारी कार्यालयातील एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कृषी पर्यटनाची जबाबदारी जोडली गेल्याने तेही आपल्या दिवसभराच्या इतर विभागाच्या व्यापातून जिल्हा पर्यटनाच्या विषयाला पाहिजे तितका न्याय देवू शकत नाहीत. त्यामुळे खरंच यासाठी स्वतंत्र तहसीलदारांची गरज आहे.



कृषी पर्यटन ही उदयोन्मुख आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारी संकल्पना आहे. सोलापूर जिल्हा हा सेंद्रिय शेतीचा व कृषी पर्यटक जिल्हा म्हणून ओळखला गेला पाहिजे अशी अपेक्षा सर्वांचीच आहे. आपल्या जिल्ह्यातील केळी, ऊस, दाळिंब, द्राक्षांसह इतरही काही उत्पादनांना तोड नाही. ज्वारीचा हुरडा, आंबा उत्पादनातही सोलापूर आघाडी घेत आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातही कृषी पर्यटनाला चालना देण्याची अत्यंत गरज आहे. यामुळे 'कृषी पर्यटन विभाग' सांभाळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात एक तहसीलदार आणि त्यांच्या टीमची तितकीच गरज आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### का येतात लोक कृषी पर्यटनाला?

कृषी पर्यटनाच्या माध्यमातून अस्सल ग्रामीण संस्कृती व परंपरा, गावरान जेवणाचा आस्वाद घेणे असो व हिरवाईमधून बैलगाडीतून फेरफटका, ग्रामीण खेळ, चुलीवर भाजलेली हातावरची भाकरी, खर्डा, हुरडा, धपाटा, खमंग उसळ, वांग्याचे भरीत, भरलं वांगं, भेंडी, गाड्यातील दही, पशुपालन, शेततळे, फुलबागा, औषधी वनस्पती, रात्रीचं चांदणं अशा कितीतरी बाबी लोकांना अगदी सहज अनुभवता येत आहे. यामुळेच राज्यातील कृषी पर्यटन केंद्रांना राज्यासह परदेशी पर्यटक हजेरी लावतात.

### पर्यटक केंद्रांचा मिळतोय शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधार

एकदा आलेला पर्यटक वारंवार त्या केंद्रावर भेट देण्यास यावा, यासाठी केंद्र नूतनीकरण, स्वच्छता, करमणुकीची साधने, सात्त्विक व स्वादिष्ट भोजन, उत्कृष्ट आदरातिथ्य याबाबत केंद्रचालक अत्यंत बारकाईने लक्ष देत आहेत आणि म्हणूनच आजपर्यंत राज्यातील हजारो पर्यटन केंद्रांवर येणाऱ्या पर्यटकांची संख्या १० ते १५ लाखाच्या घरात गेली आहे. पर्यटनाचा व्यवसाय शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधार ठरतोय. विविध ठिकाणातील देवदेवतांच्या जत्रा, उरूस यासाठी येणारा भाविक वर्ग आता कृषी पर्यटन ठिकाणी मुक्कामाचा पर्याय निवडतोय, हेही विशेषच आहे.

## कारची ट्रकला जोरदार धडक; दोन मित्र जागीच ठार

### सोलापूर-पुणे महामार्गावरील तेलंगवाडी जवळील घटना

**सोलापूर, दि. १२ मे-**





एर्टिगा कारने ट्रकला पाठीम ागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन मित्र जागीच ठार झाले. ही घटना सोलापूर-पुणे महामार्गावर तेलंगवाडीजवळ मंगळवारी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास घडली. संकल्प शिवपुत्र गुरव (वय-२२), नागनाथ मल्लप्पा बिराजदार (वय-२८, दोघेही रा.धोत्री, ता.दक्षिण सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत.

संकल्प गुरव व नागनाथ बिराजदार हे दोघे एम.एच.१३ डी.टी.८०९३ या क्रमांकाच्या कारने मोहोळहून सोलापूरच्या दिशेने येत होते. तेलंगवाडी गावाजवळ टी.एन.५४ आर ८८८१ या क्रमांकाच्या ट्रकने कारला पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यांना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पहाटे २ वाजण्याच्या सुमारास दाखल करण्यात आले. मात्र दोघांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. संकल्प गुरव हा व्हिडिओ शूटिंग आणि एडिटिंगचे काम करत होता. त्याच्या पश्चात आई, वडील आणि भाऊ असा परिवार आहे. नागनाथ बिराजदार हा गोकुळ शुगर फॅ क्टरीमध्ये कामाला होता. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील, भाऊ आणि दोन बहिणी असा परिवार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सौंदरे येथे अवैध दारु वाहतुकीवर कारवाई

## दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १२ मे -**

स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण पथकाने बार्शी उपविभागात अवैध दारु वाहतुकीविरोधात मोठी कारवाई केलीआहे. सौंदरे परिसरातून देशी-विदेशी दारुचा साठा, वाहन व मोबाईल असा एकूण १ लाख ५९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच एकावर गुन्हा दाखल केला आहे.

अमित अशोक तुपेरे (वय ३२, रा. खंडोबा मंदिराजवळ, सौंदरे ता. बार्शी) असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे.दि. ११ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी समर्थ गाजरे, सपोनि भिमगोंडा पाटील, पोकॉ सागर ढोरे पाटील, पोकॉ यश देवकते व चापोकॉ दिलीप थोरात हे बार्शी उपविभागात अवैध धंद्यांवर कारवाई व पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी सौंदरे परिसरात बार्शी-सोलापूर रस्त्यावर एका पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी ओमनी वाहनातून अवैधरित्या दारु वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

माहितीची खातरजमा करुन पोलिसांनी पंचांना सोबत घेत सापळा रचला. काही वेळात संशयित ओमनी येताना दिसताच पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात देशी व विदेशी मद्यसाठा आढळून आला. पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेत वाहनाची झडती घेतली असता विविध कंपनीच्या बिअर व व्हिस्कीच्या बाटल्या मिळून आल्या. त्याशिवाय अन्यही विविध ब्रॅण्डच्या ४९ हजार ९२० रुपये किंमतींची दारुच्या बाटल्या सापडल्या. त्यासह मारुती सुझुकी ओमनी व एक व्हिवो कंपनीचा मोबाईल असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा अतिरिक्त मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला आहे. तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

### एलसीबीच्या कारवाया; पोलिसांचे मात्र अपयश

बार्शी शहर व तालुक्यात अवैध धंद्यांवर स्थानिक पोलीस प्रशासन कारवाई करण्यात अपयशी असल्याचे चित्र दिसून येत आहे. मागील महिनाभरात बार्शी शहर व तालुक्यात एलसीबीकडून अवैध धंद्यांवर मोठ्या कारवाया झाल्या आहेत. अवैध दारु, गुटखा, मटका, गांजा आदी प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर यांनी बार्शी शहर व तालुक्यात येऊन कारवाया केलेल्या आहेत. पण स्थानिक पोलीस प्रशासन अवैध धंद्यांवर धडकपणे कारवाई करताना दिसून येत नाही.

# यंदा जिल्ह्यात ४ लाख ९९ हजार हेक्टरवर खरीप पेरणी!

## २ लाख ५१ हजार ९०० टन खत उपलब्ध
## जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

मागील वर्षी ४ लाख १७ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली होती. यंदा ४ लाख ९९ हजार हेक्टरवर खरीप पेरणी होणार आहे. यासाठी खते व बियाणे याचेही नियोजन झालेले असून, बफर स्टॉक ही उपलब्ध आहे. दरम्यान, जिल्ह्याला दोन लाख ५१ हजार ९०० टन इतका खत उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. १२) दैनिक तरूण भारतशी खास बोलताना दिली.



जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले पुढे म्हणाले की, केळी लागवड, फळ लागवड, पीक परिस्थितीत होत असलेला बदल, पीक कर्ज वाटप, नमो शेतकरी योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान, पीएम किसान सन्मान निधी, माती परीक्षण पत्रिका यामध्ये आपला जिल्हा आघाडीवर आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे आणि स्थानिक आमदारांनी सांगितल्याप्रमाणे आमच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांना खते व बियाणे वेळेत उपलब्ध देण्याची व्यवस्था केली आहे. तसेच लिंकिंग होणार नाही याची काळजी घेणार आहोत.

नियोजन भवन येथे खरीप हंगाम २०२६ आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही काही सुचना केल्या आहेत. कंपन्यांकडून कृषी विभागाने वेळेतच खते व बियाणे उपलब्ध करून घ्यावेत. विक्रेत्यामार्फत विनालिंकिंग शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावेत. जे निविष्ठा विक्रेते लिंकिंग करून शेतकऱ्यांना बोगस खते व बियाणे विकत असतील अशा विरोधात प्रशासनाने कठोर कारवाई करावी आदी सूचनांचा समावेश आहे. त्यानुसार कृषी विभागाचे कडक धोरण आखले आहे.

### क्यु आर कोडचा शेतकऱ्यांना फायदा

कृषी निविष्ठांच्या अनुषंगाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहज व सुलभ पद्धतीने तक्रार नोंदविता येईल यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या संकल्पनेतून क्यूआर कोड तयार केला आहे. हा क्यूआर कोड प्रत्येक ग्रामपंचायत, कृषी सहाय्यक कार्यालयात उपलब्ध करून देणार आहे. त्या अनुषंगाने संबंधित शेतकरी यावर तक्रार नोंदवतील. त्याची दखल घेऊन सात दिवसात त्याचे निवारण करण्यात येणार आहे.

### माती परीक्षणासाठी प्रत्येक तालुक्याला लॅबची गरज

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीचे माती परीक्षण करून घेण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रबोधन करावे, अशा सुचना पालकमंत्र्यांनी आढावा बैठकीत दिल्या आहेत. जिल्ह्याला सध्या एकच माती परीक्षण लॅब आहे. पुढील काळात प्रत्येक तालुक्याला माती परीक्षण लॅब मिळण्याची मागणी आम्ही त्यांच्याकडे केली आहे. यावर्षी फळबाग लागवडीचे उद्दिष्ट दुप्पट करण्याचेही धोरण आम्ही आखत असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी सांगितले.

### अल निनो सुरक्षा कवच पंचसूत्री राबविणार

दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन कृषी विभाग अल निनो सुरक्षा कवच पंचसूत्री राबविणार आहे. यामध्ये पीक नियोजन, पाणी व्यवस्थापन, कीड रोग व्यवस्थापन, पावसाचा खंड व्यवस्थापन, जोखीम व्यवस्थापन आदींबाबत शेतकरी व नागरिकांना जागृत करणार आहेत.

# सुपीक जमिनी उध्वस्त करणारा शक्तीपीठ महामार्ग

## आमदार रोहित पवार; शेतकऱ्यांचा कडाडून विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १२ मे -**

शक्तीपीठ महामार्ग हा स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सरकारने लादलेला प्रकल्प आहे. हा महामार्ग माळशिरस तालुक्यातील सुपीक आणि बागायती भागातून जात असल्याने शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा दिला पाहिजे, असे आवाहन आमदार रोहित पवार यांनी केले.




माळशिरस तालुका शक्तीपीठ महामार्ग विरोधी समितीच्या वतीने शक्तीपीठ महामार्गास कडाडून विरोध करण्यासाठी निमगाव येथे आमदार रोहित पवार यांची जाहीर सभा झाली. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार उत्तम जानकर होते.२०२३ साली या महामार्गासाठी सुमारे ५७ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता. तोच खर्च २०२६ मध्ये एक लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. सहा पदरी महामार्गासाठी प्रति किलोमीटर तब्बल १२० कोटी रुपये खर्च होत आहेत. हा निधी सिंचन प्रकल्प, शेती अंतर्गत रस्ते आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी वापरणे अधिक गरजेचे असल्याचेही आमदार रोहित पवार म्हणाले.

यावेळी के. के. पाटील म्हणाले की, शक्तीपीठ महामार्गामुळे शेतकरी देशोधडीला लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी महामार्गाला ठाम विरोध करावा. जमिनीची मोजणी होऊ देऊ नका, कागदपत्रांवर सह्या करू नका. आमदार उत्तम जानकर म्हणाले की,महामार्गाबाबत शेतकऱ्यांना विश्वासात घेणे गरजेचे होते. मात्र सरकारने कोणतीही पूर्वकल्पना न देता थेट अधिसूचना काढून शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. सरकारने पर्यायी मार्गाचा विचार करावा, अशी मागणी पालकमंत्र्यांकडेही केली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी वाचवण्यासाठी मी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे.

कार्यक्रमास कृषिभूषण राजेंद्र पवार, सभापती दत्ता मगर, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, शक्तीपीठ संघर्ष समितीचे कोल्हापूरचे फोंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीशराव माने-देशमुख, के.के.पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अजित बोरकर, कमलाकर माने-देशमुख, मदनसिंह जाधव, जीवन जानकर यांच्यासह माळशिरस तालुका शक्तीपीठ विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी, विविध पक्षांचे नेते, शेतकरी व महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी संजय मगर, डॉ. सचिन मगर, ॲड. जयसिंह मगर, मिनिनाथ मगर, महावीर मगर, बापू मगर आदींनी परिश्रम घेतले.

### सासरवाडीच्या पाठीशी उभे राहण्याचे आ. पवारांना आवाहन

सभेदरम्यान निमगावकर मगर कुटुंबीयांचे जावई असलेल्या आमदार रोहित पवार यांनी सासरवाडीतील लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे भावनिक आवाहनही ग्रामस्थांकडून करण्यात आले.

## बार्शीत वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

**बार्शी, दि. १२ मे -**

बार्शी शहरातील परंडा रोड परिसरात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला पुढील तपास सुरू आहे.

ज्ञानेश्वर भिल्लारे (वय ५२, रा. जनार्धन नगर, राऊत तळ्याजवळ, बार्शी) हे दि. २८ एप्रिल रोजी रात्री १०.४५ वाजण्याच्या सुमारास परंडा रोडने पायी घरी जात होते. त्यावेळी ब्रम्हा टायर वर्क्स दुकानाजवळ वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी झाले. नागरिकांनी त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे दाखल केले. मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. मयत ज्ञानेश्वर भिल्लारे यांच्या पत्नी विद्या भिल्लारे यांच्या सोमवार दि. ११ मे रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, गुन्हा दाखल केला आहे.

# अकलूजमध्ये तरुणावर भरदिवसा जीवघेणा हल्ला

अकलूज, दि. १२ मे-

अकलूज : अकलूज येथील नवीन बाजार तळ परिसरात किरकोळ कारणावरून एका तरुणावर चाकू, काठ्या आणि दगडाने बेदम मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले. याप्रकरणी अकलूज पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी शिवाजी पवार (वय ४०, रा. नवीन बाजार तळ, अकलूज) यांचा भाऊ सुनील हा ९ मे रोजी दुपारी ४:३० च्या सुमारास गांधी चौक परिसरात मित्रांसोबत बोलत उभा होता. यावेळी आरोपी करण अभिमान पवार, अभिषेक अभिमान पवार, बंटी साळुंखे, अक्षय शिलकर आणि ओंकार यादव यांनी तिथे येऊन 'तुला लय मस्ती आली आहे काय?' असे म्हणून सुनीलला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. जीवाच्या भीतीने सुनील नवीन बाजार तळाच्या दिशेने धावत गेला. आरोपींनी पाठलाग करून त्याला गाठले. तिथे आरोपींनी चाकू, काठ्या आणि दगडांनी सुनीलला बेदम मारहाण करून जखमी केले. या प्रकरणी शिवाजी पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अकलूज पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. घटनेचा तपास पोलीस हवालदार करत आहेत.

# किरकोळ कारणावरून रॉडने हल्ला; आई-मुलासह चौघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ मे -**

उपळाई रोड परिसरातील वैद वस्तीत घरात घुसून एका कुटुंबावर रॉड व काठ्यांनी जीवघेणा हल्ला झाला. यात युवक, त्याची आई, भाऊ व चुलते जखमी झाले. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी सहाजणांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

राहुल घोरपडे (वय २०, रा. वैद वस्ती,बार्शी) यांच्या फिर्यादीनूसार ९ मे रोजी सायंकाळी ते घरी असताना मारुती वाघमोडे घरी आला. किरकोळ कारणावरुन वाद सुरु केला. नंतर पुन्हा सर्व आरोपींसह परत आला. आरोपींनी रॉड व काठ्यांनी हल्ला चढविला. हल्ल्यात राहुल यांच्या डोक्यावर मार लागून ते जखमी झाले. त्यांची आई कमल घोरपडे व भाऊ शेखलाल व चुलते मारुती घोरपडे यांनाही मारहाण केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

गोंधळात कमल घोरपडे यांच्या गळ्यातील चार ग्रॅम वजनाचे अंदाजे ६० हजार रुपयांचे सोन्याचे डोरले व मणी गहाळ झाल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. जखमी अवस्थेत कुटुंबीयांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी मारुती शंकर वाघमोडे, राहुल तायप्पा वाघमोडे, तायप्पा शंकर वाघमोडे, दुर्गा मल्हारी वाघमोडे, विनोद मारुती वाघमोडे व अनिल तायप्पा वाघमोडे (सर्व रा. वैद वस्ती, उपळाई रोड, बार्शी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# महाळुंग-श्रीपूर एमआयडीसीसाठी अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा

## सकारात्मक भुमिका; महाळुंग-श्रीपुरकरांच्या आशा पल्लवित

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १२ मे-**

उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सोलापूरचे प्रादेशिक अधिकारी शिवाजी राठोड, उपअभियंता प्रदीप खंडारे, भूमापक प्रमुख सारंग साबळे, भूमापक भारत भांजी यांच्या शिष्टमंडळाने महाळुंग, श्रीपूर, बोरगांव, मिरे येथे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जागेची पाहणी केली.



आ. उत्तम जानकर, आ. अभिजित पाटील व माजी आ. राम सातपुते तसेच माळशिरस चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीज यांच्या वतीने महाळुंग-श्रीपूर येथील शेती महामंडळाच्या जमिनीवर एमआयडीसी मंजूर व्हावी म्हणून उद्योग विभागाकडे प्रस्ताव दाखल केला होता. त्याची दखल घेत उद्योगमंत्र्यांनी आदेश दिले होते. माळशिरस तालुक्यात एमआयडीसी होण्याबाबत राजकीय व्यासपीठावरून विचार मांडले गेले. परंतु मोठ्या प्रमाणात जमीन उपलब्ध होत नसल्याने प्रस्तावाचा उपयोग झाला नाही. आ. उत्तम जानकर व माळशिरस चेंबर ऑफ इंडस्ट्रीजचे भानुदास सालगुडे पाटील, सोमनाथ वाघमोडे, शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख तानाजी भोळे-पाटील, उद्योजक महावीर शहा, नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, तानाजी भगत यांनी महाळुंग, श्रीपूर, बोरगांव, मिरे या हद्दीत शेती महामंडळाचे सुमारे ३८०० एकर क्षेत्र असल्याने या जागेचा प्राधान्याने विचार व्हावा असे सुचविले. त्याप्रमाणे मंगळवार १२ मे रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी केली. त्यांना शेती महामंडळाचे लेखापाल राजेंद्र काशिद यांनी सर्व क्षेत्रांची माहिती दिली.

यावेळी भानूदास सालगुडे-पाटील व सोमनाथ वाघमोडे यांनी महाळुंग - श्रीपूर येथील शेती महामंडळाची जागा सर्वदृष्टीने अनुकूल असल्याचे सांगितले. शिवाजी राठोड यांनी एमआयडीसीसाठी शासनाने लावलेले निकष जागेबाबत जुळत आहेत. आम्ही अहवाल पुढील कार्यवाहीसाठी पाठवू असे सांगितले. नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, तानाजी भगत व उद्योजक महावीर शहा यांनीही एमआयडीसीमुळे रोजगार वाढेल, असे सांगितले.

# स्व. गंगाधरपंत कुचन यांनी शेवटच्या श्वासापर्यंत केली समाजसेवा : खा. शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे २०२६**

काँग्रेस पक्षाचे माजी खासदार तथा ज्येष्ठ समाजसेवक गंगाधरपंत कुचन यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी आजरोजी निधन झाले. खासदार प्रणिती शिंदे यांनी पद्मनगर येथील कुचन यांच्या निवासस्थानी जावून त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. माजी खासदार गंगाधरपंत कुचन यांच्या निधनाविषयी शोक व्यक्त करताना त्या म्हणाल्या, गंगाधरपंत कुचन साहेबांनी अनेक वर्ष सोलापूरची निष्ठेने सेवा केली.



शहराचे नाव राज्यभर प्रतिष्ठित केले. सहकार क्षेत्र, हातमाग उद्योग, टेक्स्टाईल क्षेत्र तसेच सोलापूरच्या पूर्व भागाच्या विकासात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे.त्यांचे कार्य आणि विचार कायम स्मरणात राहतील. सोलापूरकरांना, विशेषतः पूर्व भागातील नागरिकांना त्यांची मोठी उणीव जाणवणार आहे. माझ्या प्रत्येक निवडणुकीत मी त्यांचा आशीर्वाद घेऊनच कामाला सुरुवात करत असे. या वयातही त्यांचा कणखर आवाज आणि समाजाविषयीची तळमळ प्रेरणादायी होती. त्यांच्या आठवणी कायम मनात राहतील.

जाता जाता त्यांनी देहदान करून समाजसेवेचा आदर्शच निर्माण केला. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत समाजासाठी कार्य करणे हेच त्यांचे ध्येय होते. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी आणि त्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी माझे प्रयत्न कायम राहतील, असेही त्या म्हणाल्या.

### माजी खासदार गंगाधरपंत कुचन यांचे निधन

# आज आणि शुक्रवारी शोकसभेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मे-**

माजी खासदार, विणकररत्न गंगाधरपंत कुचन यांचे मंगळवार, दि.१२ मे २०२६ रोजी निधन झाले. कुंभारी येथील अश्विनी रुग्णालयला त्यांचे देहदान करण्यात आले.श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयच्या वतीने बुधवार, दि.१३ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता रुग्णालयच्या सभागृहात शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी दुपारी ४.३० वाजता कुचन प्रशालेच्या प्रांगणात शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. स्व.गंगाधरपंत कुचन यांच्या सहवासातील सहकारी, शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, समाजबांधवांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गंगाधरपंत कुचन 'सहकार'रुपी चळवळीची 'गंगा'

**सहकार, वस्त्रोद्योग, बँकिंग, पणन, वाणिज्य, हातमाग, यंत्रमाग, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, वैद्यकीय अशा विविधांगी क्षेत्रात आपल्या 'कार्यकर्तृत्वाचा अमीट ठसा' उमटविलेले माजी खासदार गंगाधरपंत सिद्रामप्पा कुचन यांच्यामुळे 'सोलापूर'चा चेहरामोहरा बदलला. त्यांनी अवतरलेल्या 'सहकार'रुपी चळवळीच्या 'गंगा'द्वारे अनेकांनेक संस्था, व्यक्ती 'सहकारातून समृध्दी' साधली, असे म्हटल्यास ते वावगे ठरु नये.**

दि.१५ नोव्हेंबर १९३४ रोजी अंबुबाई व सिद्रामप्पा कुचन या दांम्पत्यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. वैकुंठभाई मेहता व रामकृष्णपंत बेत हे गंगाधरपंत कुचन यांच्या दृष्टीने अनुक्रमे आदरणीय व गुरुवर्य. चंद्रभागा ह्या त्यांची अर्धांगिनी. लक्ष्मीनारायण, श्रीनिवास, अरविंद, सुनंदा, भूलक्ष्मी, पुष्पा ही त्यांची अपत्ये. राजारामपंत हे बंधू, शकुंतला ह्या भावजय. कलावती, राजुबाई, तुकाबाई, लीलावती ह्या भगिनी तर थो.अनिता, रेखा, धा.अनिता ह्या स्नुषा. गंगाधरपंत कुचन यांना वाचन, चित्रपट पाहणे आणि रेडिओवरील बातम्या-गाणी ऐकण्याचा मनस्वी छंद.

शालेय जीवनात त्यांनी काही नाटकातही काम केले होते. 'शिस्तीचे भोक्ते व वेळेचे पक्के' म्हणून ते सर्वदूर परिचित होते. सन १९८० साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत सोलापूर मतदार संघातून ते 'काँग्रेस'च्या तिकीटावर पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले. सन १९८५ साली पुन्हा एकदा ते 'काँग्रेस'च्याच तिकीटावर विजय संपादन केले होते.

आशिया खंडातील प्रथम स्थापित 'उद्योग बँक, यशवंत मील, सोलापूर मील, नागरी बँक, श्री मार्कंडेय रुग्णालय, अश्विनी रुग्णालय, विव्हको प्रोसेस, सोलापूर जिल्हा मुद्रक मंडळ,



इंदिरा श्रमिक महिला बँक, अक्कलकोट रोड एमआयडीसी, हैदराबाद रोड विडी घरकुल वसाहत, पश्चिम महाराष्ट्र हातमाग विणकर मंडळ, श्री मार्कंडेय सूत गिरणी-भोर (जि.पुणे), सोलापूर डिस्ट्रिक्ट पॉवरलूम को-ऑपरेटिव्ह फेडरेशन, गणेश सहकारी साखर कारखाना (अहमदनगर), सोलापूर डिस्ट्रिक्ट लेबर कॉन्ट्रॅक्ट सोसायटी, महात्मा फुले सहकारी स्टार्च कारखाना, महाराष्ट्र राज्य कापड खरेदी-विक्री सहकारी संघ (मुंबई), आनंद विणकर गृहनिर्माण सोसायटी, संजीवनी मेडिसिन बँक चॅरिटेबल ट्रस्ट, सर्वोदय विमुक्त जमाती सहकारी सायकल कारखाना, परमाचार्य चंद्रशेखरेंद्र स्पिनर्स लिमिटेड अशा एक ना अनेक संस्थांची 'मुहुर्तमेढ' रोवून त्यांनी जणू सर्वत्र 'सहकाराचे जाळे' विणले. त्यांच्या या कार्याच्या गौरवार्थ त्यांना 'विणकर रत्न' ही उपाधी देण्यात आली. ऑल इंडिया इंडस्ट्रियल बँक्स् असोसिएशन, सेंट्रल सिल्क बोर्ड, ऑल इंडिया फेडरेशन को-ऑफ स्पिनिंग मिल्स, महाराष्ट्र राज्य शिखर बँक, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, महाराष्ट्र स्टेट बँकर्स असोसिएशन, महाराष्ट्र स्टेट हॅन्डलूम कार्पोरेशन, पश्चिम महाराष्ट्र विकास मंडळ, नागपूर विणकर सहकारी सूत गिरणी, मराठवाडा उत्पादक सहकारी सूत गिरणी (नांदेड), जवाहर को-ऑप स्पिनिंग मिल्स (लातूर), शिवाजी विद्यापीठ (पुणे), अमरावती कापूस उत्पादक सहकारी सूत गिरणी, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जगदंबा सहकारी सूत गिरणी-माढा, शरद शेतकरी सहकारी सूत गिरणी-उत्तर सोलापूर, कला व्यवसाय केंद्र-सोलापूर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, पद्मशाली ज्ञाती संस्था, पद्मशाली शिक्षण संस्था यांसह देश, राज्य पातळीवरील अनेक संस्थांवरही त्यांनी काम पाहिले होते.

**- श्रीनिवास धर्मराज गाजूल**
माजी कार्यकारिणी सदस्य,
पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर.
मुख्य वरिष्ठ उपसंपादक,
दैनिक तरुण भारत, सोलापूर
भ्रमणध्वनी क्रमांक
९३७०७५९७४६/ ९५१८५५७४५६.

### कुचन साहेबांचा शब्द प्रमाण मानला जायचा

गंगाधरपंत कुचन यांनी इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या कार्यकाळात खासदार राहिले होते. आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी 'विरोधकांची तोंड बंद' करायचे. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्याशी त्यांची विशेष मैत्री होती. माजी खासदार संदीपान थोरात आणि गंगाधरपंत कुचन ही जोडी सर्वदूर परिचित होती. एकेकाळी कुचन साहेबांचा शब्द प्रमाण मानला जायचा. त्यामुळे 'पूर्वभाग बोले, सोलापूर हाले' अशी परिस्थिती होती.

# पंतप्रधानांचे आवाहन सकारात्मकतेने घ्यावे!

## ● शासन आणि प्रशासनाने काटकसर करणे गरजेचे तरच सामान्य जनता देखील उत्साहने करेल अनुकरण

**अमेरिका-इजराईल यांनी इराण विरोधात सुरु केलेल्या अनाकलनीय युध्दामुळे संपूर्ण जगच सध्या आर्थिक चिंताग्रस्त झाल्याचे चित्र आहे. भारतासह अनेक देशांना अमेरिकेच्या या युध्दाचे परिणाम नाहक भोगावे लागत आहेत. इराणने अद्याप अन्वस्त्र तयार केलेले नाहीत तरी देखील अमेरिकेने अन्वस्त्र कार्यक्रम रद्द करण्याची धमकी देत इजराईलच्या दबावाखाली इराण विरोधात युध्द सुरु केल्याचा परिणाम संपूर्ण आखातील देशांवर तीव्रतेने जाणवत आहे. या युध्दाचा थेट परिणाम पेट्रोलियम पदार्थांवर होत असून जगातील अनेक देशांना याचा फटका बसत आहे. शेजारच्या पाकिस्तानात पेट्रोल साडेचारशे रुपये प्रती लिटर विकले जात आहे. तर अनेक देशांना पेट्रोलियम पदार्थांचा तुटवडा जाणवत आहे. जगावर गंभीर परिणाम होत असतानाही मोदी सरकारच्या मुस्तदी धोरणांमुळे भारतात आजही पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती स्थीर आहेत. विशेष म्हणजे जागतिक बाजारात क्रूड ऑईलच्या म्हणजेच कच्च्या तेलाच्या किमती प्रती बॅरेल सव्वाशे रुपयांच्या जवळपास पोहचल्या आहेत. तर आपला रुपया डॉलरच्या तुलनेत सातत्याने घसरत आहे. आगामी काळात हे संकट आणखीन तीव्र होण्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देवासियांना आवाहन केले की, पेट्रोलियम पदार्थांचा वापर काटकसरीने करा, स्वदेशी वस्तूंची खरेदी करावी, देशात पर्यटन वाढवा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा. हे आवाहन सर्वांनीच सकारात्मकतेने घेणे काळाची गरज आहे. मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देत भाजपाशासीत राज्यांनी मंत्रीमंडळ आणि प्रशासकीय पातळीवर काटकसर सुरु केली हे कौतुकास्पद पण आणखीन कठोर काटकसर खूपच गरजेची असल्याची मागणी सामान्य जनतेतून होत असून त्याचे स्वागत करणे गरजेचे आहे.**






पंतप्रधान मोदी यांनी आगामी संकटाच्या पार्श्वभूमीवर जनतेला काटकसरीचे आवाहन केले, परंतु केवळ नेहमीच टिकाकाराच्या भूमिकेत असणाऱ्या विरोधकांनी मोदींच्या आवाहानाबाबत जनतेत फेक नॅरेटिव्ह पसरविण्याचे उद्योग सुरु केले आहेत. केंद्र आणि राज्यातील मंत्र्यांनी अगोदर काटकसर करावी, खासदार, आमदारांचे मानधन कमी करावे, पेन्शन बंद करावी, मुख्यमंत्री, उपमंख्यमंत्र्यांसह मंत्र्यांनी उद्घाटनाच्या कार्यक्रमांना प्रत्यक्ष न जाता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बटन दाबून विकास कामांची उद्घाटने करावीत. मंत्रीमंडळाचा लवाजमा बंद व्हावा, प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या वाहन वापरावर निर्बंध घालावेत, अशा अनेक मागण्या सामान्य जनतेतूनही होत आहेत. विरोधकांच्या विरोधाच्या नेहमीच्या भूमिकांकडे दुर्लक्ष करत केंद्र आणि राज्यातील मंत्र्यांनी जनतेच्या भावनांची दखल घेत म ोदींच्या सूचनेनुसार काटकसरीला सुरुवात केल्याचे चित्र आहे.

मोदींच्या आवाहानानुसार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने सूचना देत मंत्रिमंडळाच्या खर्चावर नियंत्रण आणले आहे. मंत्र्यांच्याा विमान प्रवासावर निर्बंध आणले आहेत. तर भाजपाच्या काही मंत्र्यांनी बैठका ऑनलाईन घेणे, मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांच्या संख्यांवर नियंत्रण, मंत्री व अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांना कात्री लावली आहे. तर मंत्र्यांसाठी इलेक्ट्रिक वाहने वाढविण्याचीही सकारात्मक भूमिका घेतली आहे.

### खासदार-आमदारांची पेन्शन कमी तरी व्हावी

सामान्य जनता कधीही कोणाला राजकारणात या आणि जनतेची सेवा करा असे सांगत नाही. प्रत्येकजण स्वेच्छेने राजकारणात येतो. मग खासदार, आमदार झाल्यानंतर सर्वांना कायमची पेन्शन सरकारने देण्याचे काय कारण असा संताप जनता व्यक्त करत आहे. गलेलठ्ठ पेन्शन देण्याऐवजी निराधारांना जसे सकारर मानधन देते तसेच यांनाही द्यावे, अशी मागणी जनता करीत आहे. कारण राजकारणात येणारे हे बहुतांश प्रस्थापितच असतात मग त्यांनी जनसेवेच्या मोबदल्यात सरकारी लाभांची अपेक्षा करणे अवास्तवच असल्याचे मत व्यक्त होत आहे. याबाबत मोदी व फडणवीसांनी गांभीर्याने दखल घ्यावी, अशी माफक अपेक्षा साम ान्य जनता व्यक्त करत असून ही तीच जनता आहे जिच्या कररुपी पैशातून पेन्शन दिली जाते, हे म हत्वाचे होय.

### मंत्र्यांचे वाहन ताफे आणि बंदोबस्तात कपात व्हावी

निवडणुकीत मत मागताना हात जोडून, पाया पडून फिरणारे खासदार, आमदार निवडून आल्यानंतर वेगळ्याच तोऱ्यात असतात. मंत्री, खासदार, आम दारांवर होणारा वारेमाप खर्च अत्यल्प करण्याची गरज आहे. मंत्री निघाल्यानंतर दोन-दोन तास वाहतूक ठप्प होते असे मोठे वाहनांचे ताफे कमी करणे आवश्यक आहे. ज्या जनतेतून निवडून जातात त्याच जनतेत जाताना भला मोठा बंदोबस्त कशासाठी लागतो, असेही प्रश्न आता यानिमित्ताने लोक उपस्थित करीत आहेत. मंत्र्यांचे बंदोबस्त, खासदार, आमदारांचे बंदोबस्त, उत्सव मिरवणुकांचे बंदोबस्त यातच पोलिसांची एनर्जी मोठ्या प्रमाणात वाया जाते मग गुन्हेगारी थांबवणे, चोऱ्या, दरोड्यांचा तपास करणे यावर परिणाम होतो. सामान्य जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेले पोलिस खाते मंत्री-संत्र्यांच्या संरक्षणातच मशगूल असल्याने सामान्य जनता वैतागल्याचे जाणवत आहे.

### मंत्र्यांच्या बैठका व्हिसीद्वारे झाल्यास मोठी बचत

मंत्रालयात बसणारे मंत्री नेहमी विविध विषयांवर बैठका आयोजित करतात. कामे होण्यासाठी या बैठका गजरेच्यादेखील असतात, परंतु या बैठका आता डिजिटल म्हणजेच व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे झाल्यास अधिकाऱ्यांना हेडक्वार्टर सोडून मंबईचे हेलपाटे मारावे लागणार नाहीत.

### मंत्र्यांनी स्वतःची वाहने वापरल्यास मोठी बचत

निवडणुकीच्या मैदानात उभारल्यानंतर सादर केलेल्या ॲफ ेडेविटवर उमेदवार आपली प्रॉपर्टी, वाहने, सोनं, गंगाजळी याची माहिती देतो, ती पाहिल्यानंतर अनेकदा सामान्यांचे डोळे पांढरे होतात. इतके श्रीमंत असणारे मंत्री, खासदार, आमदार शासकीय खर्चावर जनसेवा का करतात असा भाबडा प्रश्न सामान्यांना पडत आहे. कोट्यवधींची प्रॉपर्टी जाहीर करणाऱ्या राजकीय नेत्यांनी जनतेच्या कररुपी जमा होणाऱ्या पैशांचा असा खर्च थांवबून कराचा पैसा विकासकामांवर खर्च करण्याची मागणी जनता करीत आहे. शासकीय होणारे मोठे कार्यक्रम बंद होण्याची गरज आहे. आगामी संकट ओळखून पंतप्रधानांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत शासन-प्रशासनाने जर का काही कठोर निर्णय घेतले तर जनता डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाही. सुजान राज्यकर्ते मोदींच्या आवाहनाचा नक्कीच सकारात्मक विचार करतील यात शंका नाही.

# इराणची लढाऊ विमाने पाकिस्तानने लपविली

## ● अमेरिकेला अंधारात ठेवून गुप्त सहकार्य ● नूर खान हवाई तळावर आश्रय



◆ **वॉशिंग्टन, १२ मे**

शांतता चर्चेसाठी मध्यस्थीची भूमिका पार पाडणारा पाकिस्तान अमेरिकेला अंधारात ठेवून इराणला सहकार्य करत असल्याचे उघड झाले आहे. संघर्षाच्या काळात इराणी लष्करी आणि गुप्तचर विमानांना पाकिस्तानच्या हवाई तळावर आश्रय दिला. रावळपिंडी येथील नूर खान हवाई तळावर इराणी विमानांच्या हालचाली अमेरिकेच्या उपग्रह छायाचित्रात दिसून आल्या. यामुळे मध्यस्थ करणारा पाकिस्ताना इराणचा मदतनीस असल्याचे उघड झाले. पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्कर प्रमुख असीम मुनीर यांच्यावर विश्वास ठेवणे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना अंगलट आले आहे.

पाकिस्तानने यापूर्वी इराणला व्यापारासाठी सहा भूमार्ग उपलब्ध करुन दिले आहेत. आर्थिक कोंडीसाठी होर्मुझवर करण्यात आलेली नाकाबंदी यामुळे निष्फळ ठरत असल्याचे पेंटागॉनच्या अहवालात म्हटले आहे. यामुळे नि:पक्षपणे मध्यस्थी करत असल्याचा दावा करणारा पाकिस्तान इराणला उघड सहकार्य करतो, असा आरोप होत आहे.

अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिलेल्या वॉशिंग्टन पोस्टच्या वृत्तानुसार अमेरिका, इराण लष्करी संघर्ष सरू असताना इराणची लष्करी आणि गुप्तचर विमाने पाकिस्तानी हवाई तळावर लपवण्यात आली होती. अमेरिकी हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. भारताने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानच्या युद्धनौका इराणच्या हद्दीत लपवण्यात आल्या होत्या. इराणच्या मदतीची भरपाई करण्यासाठी पाकिस्तानने युद्धकाळात इराणच्या लढाऊ विमानांना आश्रय दिल्याचे वृत्तात म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

### शांतता चर्चेत विघ्न आणण्याचा प्रयत्न

**नूर खान हवाई तळावर इराणी लष्करी विमाने असल्याचा दावा चुकीचा आहे. शांतता आणि स्थैर्यासाठी पाकिस्तान करत असलेल्या प्रयत्नांना डागळण्याचा हा प्रयत्न आहे. शांतता चर्चेच्या पहिल्या फेरीसाठी इराण आणि अमेरिकेतून विमाने पाकिस्तानमध्ये दाखल झाली होती. याकाळातच विमानतळावर हालचाली सुरु होत्या आणि त्या तात्पुरत्या होत्या, असे पाकिस्तानी परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.**

### आरोपांना बळकटी

**पाकिस्तानने आपल्या भूमीवर इराणी विमानांच्या उपस्थितीची अधिकृतपणे कबुली दिली आहे. याला शस्त्रसंधीदरम्यान सामान्य प्रशासकीय आणि लॉजिस्टिकल मदत म्हटले असले तरी, या विधानामुळे पाकिस्तानने इराणी लष्करी विमानांना आपला हवाई तळ वापरण्याची परवानगी दिली या आरोपांना आणखी बळकटी मिळाली आहे. इराणी विमानांची उपस्थिती ही शत्रुत्व किंवा कोणत्याही लष्करी कारवाईशी संबंधित नसल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे.**

### तो विश्वासघातकी देश : लिंडसे ग्रॅहम



**ट्रम्प यांचे सहकारी अमेरिकन सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी पाकिस्तानच्या मध्यस्थीच्या भूमिकेचा आढावा घेण्याची मागणी केली. त्यांनी म्हटले की, पाकिस्तानच्या अशा कृतीने त्यांना आश्चर्य वाटणार नाही, कारण हा देश नेहमीच विश्वासास पात्र राहिलेला नाही.**

### इराणजवळ पाणबुड्या लपवल्या

**भारताने सुरू केलेल्या ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानने कराची बंदरातून दोन पाणबुड्या पश्चिम ग्वादार बंदरात पाठवल्या. भारतीय हल्ल्यांपासून आपल्या पाणबुड्यांचे संरक्षण करण्यासाठी असे करण्यात आले. उपग्रह प्रतिमांनीही कराची बंदरातून रातोरात पाकिस्तानी पाणबुड्या हटवल्याचे दिसून आले. इराणने केलेल्या मदतीची प्रतीपूर्ती म्हणून युद्धकाळात त्यांच्या लष्करी विमानांना आश्रय दिला.**


# पाकिस्तानात पुन्हा आत्मघाती हल्ला

## ● स्फोटकांनी भरलेली ऑटोरिक्षा उडवली ● १२ नागरिकांचा मृत्यू; ३५ जण जखमी

◆ **इस्लामाबाद, १२ मे**

पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वामध्ये मंगळवारी सकाळी एका हल्लेखोराने आत्मघाती स्फोट घडवला. त्याने स्फोटकाने भरलेली ऑटोरिक्षा भरबाजारात उडविली. यात दोन पोलिसांसह बारा जण ठार आणि ३५ जण जखमी झाले. गेल्या ४८ तासांतील पाकिस्तानातील हा दुसरा मोठा आत्मघाती हल्ला आहे.

वायव्य पाकिस्तानातील खैबर पख्तुनख्वा प्रांतातील लक्की मारवत जिल्ह्यात एका हल्लेखोराने आठवडी बाजारात स्फोटकांनी भरलेली ऑटोरिक्षा उडवली. हा स्फोट नौरंग बाजारमधील फाटक चौकात झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. घटनेनंतर बचाव पथकाने जखमींना तातडीने रुग्णालयात हलवले. डॉक्टरांनी दोन पोलिसांसह बारा जणांना मृत घोषित केले, तर इतर ३५ नागरिकांवर उपचार सुरू आहे. जिल्हा पोलिस अधिकाऱ्याने प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, आत्मघाती हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेली आपली तीन चाकी ऑटोरिक्षा आठवली बाजारात घुसवली आणि तिचा स्फोट झाला. यात हल्लेखोर मारला गेला. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की, त्यामुळे आजूबाजूचा परिसर उद्ध्वस्त झाला. *(वृत्तसंस्था)*



### सुरक्षा दलाकडून शोधमोहीम सुरू

**बचाव पथकाचे अधिकारी शादाब खान म्हणाले, घटनेनंतर लगेचच मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले. रुग्णवाहिका आणि बचाव पथके तात्काळ घटनास्थळी पोहोचली. सर्व जखमींना उपचारासाठी सराई नौरंग येथील तहसील मुख्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अनेक जखमींची प्रकृती गंभीर आहे. हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने घेतलेली नाही. सुरक्षा दलाने परिसराला वेढा घातला असून शोधमोहीम सुरू आहे.**

### अहवाल सादर करण्याचे निर्देश

**खैबर पख्तुनख्वाचे मुख्यमंत्री मुहम्मद सुहेल आफ्रिदी यांनी हल्ल्याचा निषेध करीत म्हटले की, मी पोलिस महानिरीक्षकांना या घटनेवर सविस्तर अहवाल तयार करून सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दुःखाच्या प्रसंगी प्रांतिक सरकार पीडित कुटुंबांच्या पाठीशी उभे आहे आणि त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल. दरम्यान रविवारी पाकिस्तानच्या बन्नू जिल्ह्यात झालेल्या आत्मघाती हल्ल्यात २५ पोलिस ठार झाले होते.**

# ५९ वर्षांनंतर सोने खरेदीला लागणार ब्रेक

## पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला जनतेचा सकारात्मक प्रतिसाद

**जळगाव, दि. १२ मे-**

जगातील युध्दजन्य परीस्थितीला अनुसरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्षभर सोने खरेदी न करण्याचे आवाहन जनतेला केले आहे. तब्बल ५९ वर्षांपूर्वी तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी देशातील जनतेला अशाच प्रकारचे आवाहन केले होते. त्यामुळे विरोधकांकडून टीका सुरू असली तरी विदेशी चलन बचतीसाठी आणि देशातील आर्थिक परीस्थिती मजबूत करण्यासाठीचा हा प्रयत्न असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.



सोन्याच्या वैशिष्ट्यपूर्ण दागिन्यांमुळे आणि शुद्धतेमुळे जळगावची सोन्यासाठी विशेष ओळख आहे. देशभरात प्रसिद्ध असलेल्या जळगावच्या सराफ बाजारात लोक सोने खरेदीसाठी मोठ्या संख्येने येत असतात इथला सराफ बाजार देशभरात प्रसिद्ध आहे. येथील सोन्याची शुद्धता आणि व्यवहारातील विश्वासार्हता यामुळे म हाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, दक्षिण भारतातून ग्राहक सोने खरेदीसाठी जळगावात येत असतात. जळगावला सुवर्णनगरी देखील म्हटले जाते. या बाजारपेठेला तब्बल १६१ वर्षांची परंपरा आहे. १८६४ मध्ये राजमल लखीचंद ज्वेलर्सने जळगावच्या सराफ बाजाराची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर पुढील काळात ती मोठ्याप्रम ाणात विस्तारत गेली. आजमितीस जळगाव शहरात सुमारे १६० हून अधिक सुवर्ण पेढ्या व सुवर्ण मॉल्स आहेत. तर जिल्ह्याची आकडेवारी ८०० च्या वर पोहचली आहे.

### शुद्धता आणि गुणवत्ता

जळगावच्या सराफा बाजारात सोन्याची शुध्दता व गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची मानली जाते. तसेच इथले दागिने हस्तकलेचा उत्तम नमुना असतात. याची शोभा सौंदर्याला आणखीन उजळून टाकत असते. या ठिकाणी तयार होणारे दागिने हे बंगाली कारागिरी प्रमाणे बनत असतात. बारीक नक्षी त्याला तंतोतंत असे शोभणारे हिरे आणि सोन्याची शुद्धता या मुळे जळगावच्या सुवर्ण बाजारात रोज किमान ५० ते ६० किलो पेक्षा अधिक सोन्याची विक्री होते, असंही व्यावसायिक सांगतात.

### ब्रिटिशकाळापासून ओळख

खानदेशचा प्रदेश हा ब्रिटिश काळाच्या पूर्वीपासूनच सुपीक म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या परिसरात औद्योगिक विकास झपाट्याने झाला. त्यामुळे ब्रिटिश काळात इथल्या लोकांच्या हातात पैसा खेळू लागला आणि त्यामुळे इथे सुवर्ण बाजारपेठ स्थिरावल्याचे सांगितले जाते. जळगावात शोरूम संस्कृतीची मुहूर्तमेढ आर. सी. बाफना या फर्मने रोवली. त्यामुळे महाराष्ट्रातूनच नव्हे तर शेजारच्या गुजरात, मध्यप्रदेशमधून देखील अनेक सोने खरेदीसाठी इथे येऊ लागले.

### पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला असोसिएशनचा पाठींबा

युध्दजन्य परीस्थितीमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला वर्षभर सोने खरेदी करू नये आणि इंधन बचतीचे आवाहन केले आहे. या आवाहनानंतर सोने बाजारात पडझड झाली. त्याचा परिणाम स्थानिक पेठांवरही होण्याची शक्यता सराफ व्यावसायिकांनी वर्तविली आहे. असे असले तरी देशाच्या पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाला सराफ व्यावसायिक असोसिएशनने पाठींबा दिला असून या निर्णयाचे स्वागत देखील केले आहे.

### ५९ वर्षांपूर्वीही झाला होता निर्णय

देशाच्या तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी देकील सन १९६७ म्हणजेच ५९ वर्षांपूर्वी देशातील जनतेला राष्ट्रीय शिस्त म्हणून सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी देशातील आर्थिक परीस्थिती मोठी बिकट होती. सध्याच्या परीस्थितीत भारत आर्थिकदृष्ट्या मजबूत स्थितीत असला तरी विदेशी चलन बचतीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला जनतेकडून सकारात्म क प्रतिसाद मिळू लागला आहे.

### हौस म्हणून सोने खरेदीला ब्रेक

आर. सी. बाफना ज्वेलर्सचे पप्पूशेठ बाफना यांच्याशी याविषयी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, लग्नकार्यासाठी सोने खरेदी हवी त्याप्रमाणात सुरू आहे. केवळ हौस म्हणून होणारी सोने खरेदी या दोन दिवसात कमी झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

# दक्षिण कॅलिफोर्नियाची महापौर चीनची एजंट

## तपासात माहिती उघड, पदाचा दिला राजीनामा

◆ **वॉशिंग्टन, १२ मे**

दक्षिण कॅलिफोर्नियामधील अर्केडिया शहराच्या महापौर ५८ वर्षीय आयलिन वांग यांनी चीन सरकारसाठी बेकायदेशीर एजंट म्हणून काम केल्याची माहिती तपासात समोर आल्यानंतर त्यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करण्यात आला. त्या दोषी आढळल्यास १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.



वांग यांच्यावर एप्रिल महिन्यात परदेशी सरकारचे बेकायदेशीर एजंट म्हणून काम केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. अधिकृत तपासात वांग यांनी अमेरिकन सरकारला कोणतीही पूर्वसूचना न देता चिनी अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून बीजिंगच्या बाजूने लेख प्रकाशित केला. त्यांनी चिनी सरकारच्या अजेंडानुसार काम केले. वांग आणि त्यांचे सहकारी माईक सन यांनी एक संकेतस्थळ सुरू केले. याच्या उद्देश चिनी अमेरिकन समुदायापर्यंत पोहोचणे आणि चीन सरकारच्या फायद्याचा मजकूर प्रसिद्ध करणे हा होता अशी माहिती तपासात उघड झाल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले.

जून २०२१ मध्ये, वांग यांनी त्यांच्या संकेतस्थळावर चिनी वाणिज्य दूतावासाचे एक पत्र प्रसिद्ध केले होते. यामध्ये उइगर मुस्लिमांवरील अत्याचार आणि छळवणुकीचे वृत्त फेटाळून लावले होते. *(वृत्तसंस्था)*

## अग्रलेख...

# भविष्य घडवणे म्हणजे काय?

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी विकास प्रकल्पांना विरोध दर्शविण्यासाठी दाखल केल्या जाणाऱ्या याचिकांबद्दल तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. न्यायालयाची ही भूमिका खरोखर योग्य आणि समजून घेण्यासारखी आहे. देशाला रस्ते, उद्योग, धरणे, रेल्वेमार्ग, विमानतळ, ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक शहरे हवी आहेत. लाखो लोकांच्या रोजगाराचा, अर्थव्यवस्थेच्या वाढीचा आणि देशाच्या भविष्याचा प्रश्न त्याच्याशी जोडलेला आहे. विकास थांबवून कोणताही समाज पुढे जाऊ शकत नाही, हे सत्यच आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केलेला मुद्दा योग्यच आहे यात वाद नाही. मात्र, या विषयाची दुसरी बाजूही आहे आणि ती फार अस्वस्थ करणारी आहे. आज जगभरात विकासाची जी व्याख्या रूढ झाली आहे, ती प्रचंड काँक्रिटीकरण, वेग, उत्पादन आणि बाजारपेठ याभोवती फिरताना दिसते. मोठे पूल, उंच इमारती, सहा-आठपदरी महामार्ग, विस्तीर्ण औद्योगिक वसाहती यांनाच प्रगतीचे प्रतीक मानले जाते. पण या चकाकणाऱ्या विकासाच्या मागे नष्ट होत असलेली जंगले, टेकड्या, सुकणाऱ्या नद्या, हरवत जाणारे पक्षी, तापत जाणारी जमीन आणि विस्थापित होणारी माणसं फारशी कुणाच्या नजरेत येताना दिसत नाहीत. खरे तर विकास आणि पर्यावरण हे एकमेकांचे शत्रू नाहीत. पण आपण त्यांना ज्या पद्धतीने हाताळतो आहोत, त्यामुळे हा संघर्ष निर्माण झाला आहे. प्रत्यक्षात प्रश्न आहे विकासाच्या पद्धतीचा.

एखादा रस्ता जंगल फोडूनच जावा का? एखादा उद्योग नदी प्रदूषित करूनच का उभा राहावा? शहरांचा विस्तार फक्त झाडे तोडूनच व्हावा का?...या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याऐवजी आपण अनेकदा विकास विरुद्ध पर्यावरण अशी सरळ मांडणी करतो. त्यामुळे या विषयाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलतो. मुसळधार पावसात दरडी कोसळू लागल्या. उत्तराखंडमधील आपत्ती असो किंवा हिमाचलमधील भूस्खलन म्हणजे निसर्गाने वेळोवेळी दिलेले इशारे आहेत. पश्चिम घाटात जंगलतोड वाढली आणि पावसाचे चक्र बदलले. शहरांमध्ये तर नद्या गटारांमध्ये बदलल्या आहेत. पावसाचे पाणी झिरपण्यासाठी जागाच उरली नाही आणि मग थोड्या पावसातही पूर येऊ लागले. आपण निसर्गाशी किती बेफिकीरपणे वागलो आहोत, याची ही उदाहरणे आहेत. विकासाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे विस्थापन. मोठे प्रकल्प उभे राहताना हजारो लोक आपली जमीन, घरे व जीवनपद्धती गमावून बसतात. जंगले संपतात किंवा कमी होतात. कागदावर नुकसानभरपाई मिळते; पण विस्थापित लोकांच्या संस्कृतीचे काय होते? आदिवासी भागात हा प्रश्न अधिक तीव्र आहे. जंगल हे त्यांच्यासाठी फक्त संसाधन नसते. ते त्यांचे जग असते. विकासाच्या नकाशांमध्ये या जंगलांची ओळख अडथळा म्हणूनच दिसते. तंत्रज्ञानाने माणसाला मोठी शक्ती दिली; पण त्याचबरोबर एक भ्रमही दिला की, आपण निसर्गावर पूर्ण नियंत्रण मिळविले आहे. ही भावना अतिशय धोकादायक आहे. कारण निसर्गाला जिंकण्याचा प्रयत्न अखेरीस माणसालाच हरवून टाकतो, हे वारंवार सिद्ध होत आले आहे. हवामान बदल ही त्याचीच किंमत आणि ती आपण मोजत आहोत. तापमान वाढत आहे, ऋतू बदलत आहेत, पाणीटंचाई गंभीर होत आहे. समुद्र किनाऱ्यावरील शहरे धोक्यात आली आहेत. ही संकटे अचानक निर्माण झालेली नाहीत; ती विकासाच्या चुकीच्या मॉडेलचे आणि एकूणच मानवजातीने निसर्गाशी केलेल्या घातक खेळाचे परिणाम आहेत.

आजच्या मुलांना आपण कोणती पृथ्वी देणार आहोत, हा प्रश्न आता केवळ भावनांपुरता मर्यादित राहिलेला नाही; तो अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. झाडे ऑक्सिजन देतातच. ती हवामानाचे संतुलनही राखतात. नद्या पाणीपुरवठा करतात. शिवाय त्या संस्कृतीही निर्माण करतात. पर्वत-टेकड्या ही फक्त पर्यटनस्थळे नसतात, ते संपूर्ण मानवतेचा आधारस्तंभ असतात. निसर्ग हा केवळ स्रोत नाही. त्याचे नुसते दोहन करायचे नसते. त्याला सोबत घेऊन चालायचे असते. विकासाच्या नव्या व्याख्यांमध्ये या जाणिवा हरपत आहेत. परिणामांबद्दल वेगळे बोलायची गरज नाही. म्हणूनच विकासाची व्याख्या नव्याने समजून घेण्याची वेळ आली आहे. विकास म्हणजे फक्त जीडीपी वाढ नव्हे. विकास म्हणजे माणसाचे जीवन अधिक सन्मानाने, सुरक्षितपणे आणि संतुलितपणे जगता येणे. विकास म्हणजे शहरे चांगल्या पद्धतीने वाढणे, तेथील जीवनाचा दर्जा चांगला असणे. माणसे वाढत आहेत. झाडेही वाढायला हवीत. ती वाढताना दिसत नाहीत. उलट असलेली कमी होताना दिसतात. उद्योग उभे राहायला हवेत, पण नद्याही जिवंत राहायला हव्यात. कारखान्यांच्या माध्यमातून रोजगार हवा, पण प्रदूषण होऊ नये. विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या हक्कांवर वर्तमानाने मिळविलेला ताबा नसतो. आपण शाश्वत विकास हा शब्द वारंवार वापरतो; पण तो केवळ भाषणांपुरताच राहतो. प्रत्यक्षात शाश्वत विकास म्हणजे प्रत्येक निर्णय घेताना पुढच्या पन्नास-शंभर वर्षांचा विचार करणे. एखादा प्रकल्प उभा राहताना त्याचा पर्यावरणावर, स्थानिक समाजावर, पाण्यावर, हवामानावर काय परिणाम होईल, याचा प्रामाणिक अभ्यास होणे गरजेचे आहे. पर्यावरणीय मंजुरी ही फक्त औपचारिकता असता कामा नये. ती समाजाशी केलेली नैतिक बांधिलकी असावी.

या विषयात न्यायालयांची भूमिकाही महत्त्वाची आहे. अनेक वेळा न्यायालयांनी पर्यावरण संरक्षणासाठी ऐतिहासिक निर्णयही दिले आहेत. न्यायालयांकडून विकास प्रकल्पांना सतत प्रश्नांकित केले जाऊ शकत नाही. तसे होणे योग्यही नाही. त्यांचे काम संतुलन राखण्याचे आहे. शासन, उद्योग आणि समाज या तिन्ही स्तरांवर प्रामाणिकपणा नसेल, तर न्यायालयांच्याही मर्यादा आहेत. प्रश्न असा आहे की, आपण कोणत्या प्रकारचा समाज घडवू इच्छितो?... फक्त उपभोगावर उभा राहिलेला समाज की संवेदनशीलतेवर उभा राहिलेला समाज? निसर्गाशी नाते तुटले की माणूस आतूनही कोरडा होतो. आज शहरांमध्ये वाढती मानसिक अस्वस्थता, ताणतणाव आणि एकटेपणाही काही प्रमाणात निसर्गापासून दूर जाण्याशी जोडलेला आहे. हिरवाई हरवली की मनातील उष्णता वाढते. भारतीय संस्कृतीने निसर्गाला नेहमीच पूजनीय मानले. नदीला माता म्हटले, झाडांना देवत्व दिले, पर्वतांना पवित्र मानले. या परंपरांमध्ये केवळ श्रद्धा नव्हती. त्यामागे पर्यावरणाच्या रक्षणाचा शहाणपणा होता. आधुनिकतेच्या धावपळीत आपण ते शहाणपण विसरत चाललो आहोत. विज्ञान-विकास आणि परंपरा यांचा संघर्षच व्हावा, हे आवश्यक नाही. उलट दोघांच्या समन्वयातूनच उद्याचे भविष्य घडू शकते. भविष्य म्हणजे केवळ अधिक डिजिटल, अधिक वेगवान आणि अधिक उपभोगवादी जग नव्हे. भविष्य म्हणजे अधिक मानवी, अधिक संतुलित आणि अधिक जबाबदार जग. जिथे मानवाला शांतपणे व चांगल्या वातावरणात मोकळे जगता येईल. शुद्ध हवा, पाणी मिळवण्यासाठी खटाटोप करावा लागणार नाही. विकासाचा अर्थ फक्त काही लोकांच्या संपत्तीत वाढ करणे नव्हे. सर्वांच्या जीवनमानात सुधारणा म्हणजे विकास होय. त्यासाठी निसर्ग आणि माणूस यांच्यातील नाते सहजीवनाचे असायला हवे. तसे ते आता-आतापर्यंत होते. आता सारेच बदललेले दिसते. एकीकडे उठसूठ विकास प्रकल्पांना विरोध होतो तर दुसरीकडे विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा नाश केला जातो. कुणाचीही बाजू घेण्याचे कारण नाही. विकास हवाच, पण पर्यावरणाची शुद्धता आणि शाश्वतता राखूनच हवा. निवड आपल्यालाच करायची आहे. आपण भविष्य घडवायला निघालो आहोत म्हणजे श्वास सुद्धा घेता येणार नाही, असा तुंबलेला, अस्वच्छ, कुबट असा भवताल मागे सोडून जाणार आहोत का, हे एकदा तपासून पाहिले पाहिजे. भविष्य म्हणजे पुढच्या पिढ्यांसाठी सोडलेली संपत्ती एवढाच अर्थ नव्हे. आपल्या मुलांना-नातवंडांना, त्यांच्याही पुढच्या अनेक पिढ्यांना मोकळा श्वास घेता येईल असे वातावरण आपण त्यांच्यासाठी निर्माण करू शकणार असू तर आपल्याला भविष्याचा खरा अर्थ कळतो, असे म्हणता येईल. पुढच्या काळात आपली कर्तबगारी किती मोठे प्रकल्प उभारले यावरून नव्हे, तर किती नद्या वाचवल्या, किती जंगले जपली आणि विकासाच्या धावण्यात माणुसकी व निसर्ग दोन्ही जिवंत ठेवले का, यावरूनच ठरेल. ▮

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# 'गंगा एक्सप्रेस वे'च्या निमित्ताने...

'गंगा एक्सप्रेस वे' हा एक स्वतंत्र रस्ता नसून, तो अनेक महामार्ग, एक्सप्रेस वे आणि कनेक्टिव्हिटी प्रकल्पांना जोडणारा एक मध्यवर्ती कणा आहे. मेरठपासून प्रयागराजपर्यंतचा हा मार्ग राज्यातील १२ महत्त्वाच्या जिल्ह्यांना जोडतो; पण त्यापलीकडे जाऊन तो संपूर्ण उत्तर भारतातील वाहतूक व्यवस्थेला नव्याने आकार देतो. मेरठजवळ हा मार्ग 'दिल्ली-मेरठ एक्सप्रेस वे'शी जोडला जातो. त्यामुळे दिल्ली आणि 'एनसीआर'मधून थेट या 'एक्सप्रेस वे'वर प्रवेश मिळतो. परिणामी, दिल्ली ते प्रयागराज हा दीर्घ आणि थकवणारा प्रवास आता निम्म्या वेळेत पूर्ण होऊ शकतो. वेळेची ही बचत केवळ प्रवाशांसाठी सोयीची नसून आर्थिक हालचालींना वेग देणारी ठरते. व्यापार, मालवाहतूक आणि उद्योग यांना याचा थेट फायदा होतो. आग्रा, लखनऊ आणि कानपूरसारख्या शहरांना या मार्गामुळे अखंड द्रुतगती मार्ग मिळतो. एका 'एक्सप्रेस वे'वरून दुसऱ्यावर सहजपणे जाण्याची क्षमता ही भविष्यातील वाहतूक व्यवस्थेची गरज आहे आणि गंगा एक्सप्रेस वे ती गरज पूर्ण करताना दिसतो. पूर्वेकडील उत्तर प्रदेशासाठी या प्रकल्पाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. या 'एक्सप्रेस वे'चा विस्तार उत्तराखंडकडे नेण्याची कल्पनादेखील महत्त्वाची आहे. हरिद्वार आणि हृषीकेशसारख्या धार्मिक स्थळांशी थेट जोडणी झाल्यास, प्रयागराज आणि हरिद्वार यामधील अंतर केवळ भौगोलिक न राहता आर्थिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे माध्यम बनेल. दिल्ली, हरयाणा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश आणि पुढे बिहारपर्यंत पसरलेला हा कॉरिडॉर उद्योग, व्यापार आणि गुंतवणुकीसाठी नवे दरवाजे उघडतो. 'गंगा एक्सप्रेस वे'चा भविष्यातील विस्तार, विशेषतः प्रयागराज ते बलिया हा टप्पा, या प्रकल्पाला आणखी व्यापक बनवतो. बिहारच्या सीमेशी थेट संपर्क निर्माण झाल्यास, हा मार्ग केवळ राज्यांतर्गत न राहता, आंतरराज्य आर्थिक वाहतुकीचा मुख्य मार्ग बनेल. यामुळे उत्तर भारतात एक नवीन आर्थिक पट्टा तयार होण्याची शक्यता आहे.

'गंगा एक्सप्रेस वे' हे उत्तर प्रदेशच्या विकासाच्या मॉडेलमध्ये झालेल्या बदलाचे प्रतीक आहे. विकासाच्या पारंपरिक पद्धतींपासून दूर जाऊन, कनेक्टिव्हिटीला केंद्रस्थानी ठेवून विकास साधण्याचा हा प्रयत्न आहे. रस्ते सक्षम होतात, तेव्हा उद्योग येतात; उद्योग आल्यावर रोजगार निर्माण होतो आणि रोजगार निर्माण झाला की समाजात स्थैर्य आणि प्रगती येते. मेरठपासून प्रयागराजपर्यंत सुमारे ५९४ किलोमीटर लांबीचा हा महामार्ग राज्याच्या पश्चिम आणि पूर्व भागाला



एकाच धाग्यात बांधतो. सुमारे ३६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करून उभारण्यात येत असलेला हा प्रकल्प भारतातील सर्वांत मोठ्या 'ग्रीनफील्ड एक्सप्रेस वे'पैकी एक मानला जातो. 'गंगा एक्सप्रेस वे'च्या उभारणीसाठी होणाऱ्या खर्चामध्ये केवळ रस्त्याचे बांधकाम समाविष्ट नाही, तर जमीन संपादन, आधुनिक सुरक्षा प्रणाली, सेवा सुविधा आणि भविष्यातील विस्ताराच्या शक्यता यांचा समावेश आहे. त्यामुळे हा खर्च केवळ खर्च म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. तो राज्याच्या भविष्यातील आर्थिक क्षमतेमध्ये केलेली दीर्घकालीन गुंतवणूक आहे. 'गंगा एक्सप्रेस वे' ची खरी ताकद त्याच्या कनेक्टिव्हिटीमध्ये आहे. मेरठ, हापूर, बुलंदशहर, संभल, अमरोहा, बदायूं, शाहजहांपूर, हरदोई, उन्नाव, रायबरेली, प्रतापगड आणि प्रयागराज अशा सुमारे बारा जिल्ह्यांना हा मार्ग थेट जोडतो. याशिवाय या मार्गाच्या आसपास असलेली शेकडो गावे अप्रत्यक्षपणे या नेटवर्कचा भाग बनतात. आजपर्यंत ग्रामीण भागातील उत्पादने मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचणे कठीण होते; परंतु या 'एक्सप्रेस वे'च्या माध्यमातून ही दरी कमी होणार आहे. शेतमाल, लघुउद्योग उत्पादने आणि स्थानिक संसाधने आता कमी वेळात आणि कमी खर्चात मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचू शकतील. दळणवळणाच्या दृष्टीने पाहता हा 'एक्सप्रेस वे' राज्यासाठी क्रांतिकारक ठरणार आहे. मेरठ ते प्रयागराज हा प्रवास सध्या दहा ते बारा तासांचा असतो, तो कमी होऊन सहा ते सात तासांवर येईल. ही केवळ वेळेची बचत नाही, तर आर्थिक कार्यक्षमतेची वाढ आहे. मालवाहतुकीचा वेळ कमी झाल्यामुळे उद्योगांना जलद पुरवठा साखळी तयार करता येईल. यामुळे उत्पादन खर्च कमी होईल आणि स्पर्धात्मकता वाढेल. दीर्घकालीन दृष्टीने हे उत्तर प्रदेशाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात अधिक सक्षम बनवेल.

या प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तो एक आर्थिक कॉरिडॉर म्हणून विकसित होण्याची क्षमता ठेवतो. 'एक्सप्रेस वे'च्या दोन्ही बाजूंना औद्योगिक क्लस्टर, लॉजिस्टिक पार्क, गोदामे आणि सेवा उद्योग विकसित होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने यासाठी नियोजनही सुरू केले आहे. यामुळे टेक्सटाईल, अन्न प्रक्रिया, औषधनिर्मिती आणि इतर उद्योगांना चालना मिळेल. गुंतवणूकदारांसाठी सुलभ पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नवीन उद्योग उभारले जातील. त्याचा थेट परिणाम रोजगारनिर्मितीवर होईल. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरही लॉजिस्टिक्स, सेवा, हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि औद्योगिक क्षेत्रात हजारो संधी निर्माण होतात. ग्रामीण भागातील युवकांना त्यांच्या स्वतःच्या परिसरात रोजगार उपलब्ध झाल्यास शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होऊ शकते. त्यामुळे सामाजिक स्थैर्य वाढण्यास मदत होईल. 'गंगा एक्सप्रेस वे'चा परिणाम सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही दिसून येईल. प्रयागराजसारखे धार्मिक आणि ऐतिहासिक शहर अधिक जवळ येईल. कुंभमेळ्यासारख्या मोठ्या धार्मिक कार्यक्रमांदरम्यान वाहतुकीचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येईल. पर्यटनाला चालना मिळाल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होईल. 'एक्सप्रेस वे'च्या आसपासच्या भागात जमीनदर वाढण्याची शक्यता आहे. नवीन टाऊनशिप, औद्योगिक क्षेत्रे आणि निवासी प्रकल्प विकसित होऊ शकतात. नियोजित शहरीकरणाला चालना मिळाल्यास अनियंत्रित शहरवाढीवर नियंत्रण ठेवता येईल. यामुळे दीर्घकालीन शाश्वत विकास साधता येईल.

तांत्रिक आणि सुरक्षा सुविधांच्या बाबतीतही हा 'एक्सप्रेस वे' आधुनिकतेचे उदाहरण ठरतो. आपत्कालीन परिस्थितीत विमान उतरवता येईल अशी एअर स्ट्रीप, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन्स, ट्रॉमा सेंटर आणि विश्रांती केंद्रे यांसारख्या सुविधा या मार्गावर उपलब्ध आहेत. यामुळे हा मार्ग आजच्या गरजांसाठीच नव्हे, तर भविष्यातील वाहतुकीसाठीही तयार आहे. अशा प्रकारचे प्रकल्प केवळ पायाभूत सुविधा उभारण्यापुरते मर्यादित नसतात, तर संपूर्ण प्रदेशाच्या भवितव्याला दिशा देतात. योग्य नियोजन, अंमलबजावणी आणि व्यवस्थापन यांचा समतोल राखला गेला, तर 'गंगा एक्सप्रेस वे' उत्तर प्रदेशाला देशाच्या विकासाच्या अग्रस्थानी नेण्याची क्षमता ठेवतो. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# 'समर' नव्हे, 'संस्कार' कॅम्प!

जे सगळे करतात, तेच आपण करायचं ही आमची मानसिकता! शेजारची लेकरं म्हणे मोठे पैसे भरून उन्हाळी शिबिराला जातात. समर कॅम्प असे त्याचे नाव! म्हणून मग आमच्याही मुलाने जावं, असा आग्रह असतो. पण या आग्रहात 'त्या' मुलाचं भविष्य असते का हो? असे असताना आजही आधुनिकतेच्या या मायाजाळात युवा पिढीत ग्रामीणसह शहरी भागात संस्कार रुजविण्याचे काम करताहेत, वारकरी घडविणारे बाल संस्कार शिबिरे. समर कॅम्पच्या तुलनेत याचा गजावाजा नसतो, पण माणूस म्हणून पिढी तयार करण्याची क्षमता अपार असते.

आज समाजात वावरताना आपण जे पाहतो, ते चित्र विदारक आहे. घरातून मिळणारे संस्कार संपत चालले आहेत. पैसा मिळविण्याच्या नादात नोकरीनिमित्त घराबाहेर राहणारे आई-वडील, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरात दिसत नसलेले आजी-आजोबा हरविलेल्या संस्काराचे कारण आहे. मुलं मोबाईलच्या आहारी गेले आहेत. माध्यमे त्याच्यासाठी संस्काराची पेटी झाली असून माध्यमातील पात्र त्यांचे आदर्श ठरू पाहात आहेत. यातूनच संस्कार पाझरूलागले आणि पिढी नको त्या मार्गाने निघाली. लहान लहान मुलेच नव्हे, मुलीसुद्धा व्यसनाच्या आहारी गेल्या. मानसन्मान, वडीलधाऱ्यांचा आदर, आमची संस्कृती, देशभक्ती ही पिढी विसरली आणि आज संस्कार रुजविण्याची गरज निर्माण झाली. महाराष्ट्राच्या मातीला संतांच्या विचारांचा सुगंध आहे आणि या सुगंधाचा खरा वारसदार म्हणजे आपली 'युवा पिढी.' आजच्या धकाधकीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात जेव्हा संस्कारांची जपणूक करणे कठीण झाले आहे, तेव्हा 'वारकरी बाल संस्कार शिबिरे' एक आशेचा किरण म्हणून समोर आली आहेत. आज गावागावांत वारकरी बाल संस्कार शिबिरांचं आयोजन होत आहे. कुठे गुरुदेव सेवा मंडळ असेल ते कुठे आणखी कुठल्या संस्थेचा पुढाकार. सगळ्यांचा हेतू एकच आणि स्पष्ट; तो म्हणजे संस्कारक्षम पिढी घडविणे. तिथे स्वीमिंग पूल नसतो. आधुनिक साधनांचा सहवास नसतो, ना आरामदायी वातावरण. पण तेथे होणाऱ्या हरिनामापासून ते शुभंकरोतीपर्यंतची दिनचर्या समर कॅम्पमधील आधुनिकतेलाही मागे टाकून जाते.

*'देह जावो अथवा राहो' पांडुरंगी दृढ भावो'*

हा विचार केवळ अभंगापुरता मर्यादित नसून तो जगण्याचा एक मार्ग आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. येथे वारकरी संप्रदायाने केवळ भक्तीच शिकवली नाही, तर माणुसकी आणि संस्कारांचे धडे दिले आहेत. आजच्या विज्ञानाच्या युगात आपली युवा पिढी जागतिक स्तरावर प्रगती करीत असताना, त्यांना आपल्या मुळांशी जोडून ठेवण्याचे काम वारकरी बाल संस्कार शिबिरे अत्यंत प्रभावीपणे करीत आहेत. वारकरी बाल संस्कार शिबिर म्हणजे केवळ टाळ-मृदंगाचा सराव नव्हे, तर ती एक जीवन जगण्याची कार्यशाळा आहे. येथे शिस्त, नीतिमत्ता आणि सामाजिक जबाबदारी यांचे बाळकडू दिले जाते. मुलांमध्ये वेळेचे नियोजन आणि शिस्त निर्माण करते. ज्ञानेश्वरी गाथा आणि भागवत धर्माच्या तत्त्वांचे सोप्या भाषेत केलेले विवेचन मुलांना आपल्या समृद्ध परंपरेची ओळख करून देते. आजच्या काळात पालकांसमोर सर्वात मोठे आव्हान आहे ते म्हणजे मुलांना व्यसनांपासून आणि विघातक प्रवृत्तींपासून दूर ठेवणे. वारकरी शिबिरे यावर रामबाण उपाय ठरत आहेत. लहानपणापासूनच सात्त्विक आहार आणि विचारांची सवय लागल्यामुळे ही मुले कोणत्याही चुकीच्या मार्गाला जाण्याचा प्रश्नच नसतो.

*'तुका म्हणे जे जे भेटे, ते ते मानिजे दैवत'*

या उक्तीप्रमाणे प्रत्येक माणसात देव पाहण्याची दृष्टी या शिबिरात मिळते. संस्कार हे केवळ मानसिक नसून ते एक प्रकारचे संरक्षणदेखील आहेत. ज्या मुलाचे विचार शुद्ध असतात, त्याचे आचरण कधी भरकटत नाही. ध्यान, धारणा आणि नामस्मरणामुळे मुलांची एकाग्रता वाढते. ताणतणावाच्या काळात खचून न जाता धैर्याने सामोरे जाण्याचे बळ वारकरी विचार देतात. शिबिरातून बाहेर पडलेला युवक हा समाजाचा एक जबाबदार घटक असतो. तो पर्यावरणाचे रक्षण करतो, गरजूंना मदत करतो आणि स्त्रीशक्तीचा सन्मान करतो. हेच खऱ्या अर्थाने समाजाचे संरक्षण आहे.

वारकरी असणे म्हणजे जुनाट विचारांचे असणे नव्हे; उलट वारकरी विचार हे जगातील सर्वात प्रगत विचार आहेत, जे समता, बंधुता आणि प्रेमाची शिकवण देतात. एकूणच, वारकरी बाल संस्कार शिबिरे ही भविष्यातील 'आदर्श नागरिक' घडविणारी टांकसाळ आहे. ही केवळ धार्मिक केंद्रे नसून ती राष्ट्र निर्मितीची केंद्रे आहेत. आज आपल्या मुलांच्या हातात लहानपणीच या संस्कारांची 'पताका' दिल्यास भविष्यात आपल्या पिढीबद्दल चिंता आणि पश्चात्ताप करण्याची वेळच आपल्यावर येणार नाही, हे नक्की! ▮

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# सप्तद्वीप आणि सप्तसागर...!

आपल्या विविध पुराणानुसार ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली. त्यात आपली पृथ्वी महत्त्वाचा घटक आहे. श्रीमद्भगवत महापुराण, विष्णू, वराह, मार्कंडेय पुराणात याबाबत उल्लेख आहेत. या पृथ्वीचे सात द्वीप आणि सप्तार्णव कसे निर्माण झाले याची कथाही पुराणात आली आहे.

पृथ्वीच्या परिवलनामुळे दिवस रात्र होतात. स्वायंभुव मनुपुत्र राजे प्रियव्रत यांना पृथ्वीवर अर्ध्या भागात प्रकाश त्याच वेळी अर्ध्या भागात अंधार ही गोष्ट खटकली आणि पृथ्वीवर कुठेच अंधार नको या हेतूने त्यांनी स्वतःच ज्योतिर्मय रथ तयार करून प्रतिसूर्याप्रमाणे ज्या भागावर अंधार तिथे उजेड निर्माण करण्यासाठी आपला रथ नेत सात फेऱ्या मारल्या. त्यामुळे त्याच्या रथाच्या चाकाने सात प्रचंड चाकोल्या आणि खड्डे पडले. ते सात खड्डे म्हणजे सप्तार्णव अर्थात सप्त सागर. त्यामुळे समुद्राने वेढलेले सात भूभाग पडले. त्यांना द्वीप म्हणू लागले. ते द्वीप राजा प्रियव्रताने आपल्या सात पुत्रांना वाटून दिले. विष्णुपुराणातील पुढील श्लोकात त्यांची नावे आहेत.

जम्बू-प्लक्ष-शाल्मलि-कुश-क्रौञ्च- शाक-पुष्कर-नामानि,
सप्त-द्वीपाः पृथिव्याः, ते सप्त-सागर-परिवेष्टिताः।

ते सप्त सागर आणि सप्त द्वीप आजही आहेत. जंबुद्वीप, प्लक्षद्वीप, शाल्मलीद्वीप, कुशद्वीप, क्रौंचद्वीप, शाकद्वीप आणि पुष्कर द्वीप ही ती सप्तद्वीपांची नावे आहेत. खाऱ्या पाण्याचा लवण सागर, ऊसाच्या रसासारख्या पाण्याचा इक्षू सागर, मदिरेसारख्या पाण्याचा सुरा सागर, तुपासारख्या पाण्याचा घृत सागर, दह्यासारख्या पाण्याचा दधि सागर, दुधासारख्या पाण्याचा क्षीर सागर, गोड पाण्याचा स्वादु जल किंवा शुद्धोदक सागर. सप्त सागरांच्या वेढ्यामुळे आपण पृथ्वीला 'सप्तद्वीप वसुंधरा'' म्हणतो.

१) पौराणिक द्वीपानुसार सप्त द्वीपांपैकी सर्वांत प्रथम द्वीप म्हणजे जंबुद्वीप. प्रियव्रतांनी हा द्वीप आपला पुत्र अग्निध्र याला दिला. ज्यामध्ये देवभूमी अखंड भारत, आशिया खंडातील भूभाग येतो. जंबुद्वीप लवण सागराने वेढलेला प्रदेश आहे. एक लक्ष योजन भूभाग राजा अग्निध्र यांनी आपल्या नऊ पुत्रांना नऊ समान भागात विभाजित करून वाटून दिले. ज्याला पुराणात नऊ वर्ष म्हटले. त्यांच्या पुत्रांच्या नावावरून भारत वर्ष, हरी वर्ष, भद्राश्व वर्ष, केतुमाल वर्ष इत्यादी भाग पडले. आपण राजा अग्निध्र यांनी त्यांच्या ज्येष्ठ पुत्र भारताला दिलेल्या भारत वर्षात राहतो. भारतवर्ष जांबुद्वीपाचा नववा भाग आहे. भरतवर्षे, भरतखंडे, जंबुद्वीपे, दंडकारण्ये असे आपण संकल्पात म्हणतो. जंबुद्वीपातील प्रत्येक वर्षात एक पर्वत आहे. जसे हिमाद्री, गंधमादन, निलगिरी, सुमेरू इत्यादी. या द्वीपांवर जंबू वृक्ष म्हणजे जांभळाची झाडे इतक्या विपुल प्रमाणात होती की ती फळे नदीत पडून ते पाणी जांभूळ रसासारखे होऊन त्या नदीला जंबू नदी नाव पडले. म्हणून हा जंबुद्वीप.

२) यातील दुसरा द्वीप प्लक्षद्वीप असून तो पौराणिक इक्षुरससागराने वेढला आहे. जंबुद्वीपापेक्षा दुप्पट मोठा म्हणजे दोन लक्ष योजने विस्तारित हा द्वीप राजा प्रियव्रताने आपला पुत्र वपुष्मान याला दिला होता. त्याने आपले सात पुत्र गोमेद, ऋषभ, वैभ्राज, सोमक इत्यादींना वाटून दिला. त्यांच्या नावावरूनच त्या त्या भागाला गोमेद वर्ष, ऋषभ वर्ष अशी नावे पडली. प्रत्येक वर्षात एक मोठी नदी होती. अमृता, शिखी, अनुतप्ता इत्यादी त्यांची नावे असून या प्रदेशात प्लक्ष वृक्षाची म्हणजे पारस पिंपळ वृक्षाची अरण्ये होती म्हणून याला प्लक्षद्वीप संबोधित असत. तज्ज्ञांच्या मते, दक्षिण अमेरिका खंड प्लक्षद्वीप तर इक्षुरस सागर म्हणजे अटलांटिक समुद्र आहे.

३) शाल्मली द्वीप. शाल्मल म्हणजे काटशेवर वृक्ष ज्याच्या फळातून रेशमी कापूस निघतो. ही झाडे अधिक असल्यामुळे याला शाल्मली द्वीप म्हणतात. प्रियव्रताचे पुत्र यज्ञबाहू यांच्या वाट्याला आलेला हा प्रदेश त्यांनी त्यांच्या सात पुत्रांना वाटून दिला. त्यांच्या नावावरूनच या भागांना सुरोचन वर्ष, रमणक वर्ष, आप्यायन वर्ष अशी नावे पडली. हा द्वीप पौराणिक सूरासागराने वेष्टित आहे. तज्ज्ञांच्या मते ऑस्ट्रेलिया खंड व सूरासागर म्हणजे पॅसिफिक महासागर होय.

४) पुढील द्वीप कुशद्वीप असून हा प्रदेश कुश नावाच्या गवताने आच्छादित होता म्हणून कुशद्वीप. हा द्वीप पौराणिक घृतसागराने अधिक वेढला गेला. प्रियव्रत राजाचे पुत्र हिरण्यरेत यांच्या वाट्याला आला होता. त्यांनी या द्वीपाचे सात भाग म्हणजे सातवर्ष आपल्या सात पुत्रांना वाटून दिले. त्यामुळे या द्वीपाचे वसुवर्ष, विविक्त वर्ष, वसू वर्ष, नाभिगुप्त वर्ष इत्यादी भाग असून त्या प्रत्येक वर्षात एक पर्वत नामे चक्र, चित्रकूट, देवानिक इत्यादी आणि एक नदी-देवगर्भा, मंत्रमाला, मधुकुल्या इत्यादी नद्या होत्या. सध्याचा अंटार्क्टिका खंड हा भाग असून घृतसागर म्हणजे कॅस्पियन समुद्र होय.

५) पुढील द्वीप म्हणजे क्रौंच द्वीप. क्रौंच पक्ष्यांचे इथे प्रचंड प्रमाणात वास्तव्य असून पौराणिक दधीसागर किनाऱ्यावर हा द्वीप आहे. राजा प्रियव्रताने आपला पुत्र घृतपृष्ठ याला आणि त्यांनी आपले सात पुत्र मेघपृष्ठ, सुधामा, मधुरूह, लोहितार्ण इत्यादींना वाटून दिल्यामुळे त्यांच्याच नावे सप्तभाग म्हणजे सप्त वर्ष आहेत. या प्रत्येक वर्षात एक अशा अभया, तीर्थवती, पवित्रवती, आर्यका अशा नद्या तर सर्वतोभद्र, नंद, नंदन, वर्धमान अशी पर्वतांची नावे आहेत. सध्याचा आफ्रिका खंड आणि दधीसागर म्हणजे हिंदमहासागर हा भाग आहे असे तज्ज्ञांचे मत आहे.

६) पुढील द्वीप आहे शाकद्वीप. क्षीरसागराने वेढलेला हा द्वीप शाक म्हणजे सागवान वृक्षांचा प्रदेश. इथे राहणाऱ्यांना शक म्हणतात म्हणून द्वीपाचे नाव शाकद्वीप आहे. राजा प्रियव्रताने आपला पुत्र मेघातिथी याला आणि त्याने आपले सात पुत्र पुरोजव, मनोजव, पवामान, धूम्राणिक इत्यादींना वाटून दिल्यामुळे त्यावरून तेथील वर्ष आहेत. प्रत्येक वर्षात एक प्रमुख नदी जसे अनघा, निजधृती, पंचपदी, अपराजिता इत्यादी आणि प्रत्येक वर्षात एक पर्वत ईशान, उरूशृंग, देवपाल इत्यादी पर्वत आहेत. तज्ज्ञांच्या मते, युरोप खंड म्हणजे हा भाग आणि क्षीरसागर म्हणजे बाल्टिक सागर आहे.

७) सातव्या द्वीपाचे नाव आहे पुष्कर द्वीप. लक्षावधी पाकळ्यांच्या कमळासारखा दिसतो म्हणून हा पुष्कर द्वीप. पौराणिक स्वादुजल सागराचा हा प्रदेश. प्रियव्रत राजाने हा प्रदेश वितिहोत्र नावाच्या पुत्राला दिला. त्याने आपल्या दोन पुत्रांना रमणक आणि धातकी यांना समान वाटून दिला. पुष्कर द्वीपावर एक महाप्रचंड उंच मानसोत्तर पर्वत आहे. त्यामुळे या द्वीपाचे दोन नैसर्गिक भाग पडतात. सूर्याचे उत्तरायण आणि दक्षिणायन याच पर्वतामुळे पडले अशी धारणा आहे. सध्याचा उत्तर अमेरिका खंड म्हणजे पुष्करद्वीप आणि स्वादुजल म्हणजे आर्क्टिक महासागराचा भाग आहे असे तज्ज्ञांचे मत आहे.

आपली पुराणे, रामायण, महाभारत 'इतिहासं पुरातनम्' म्हणून साक्ष आहेत. दिलीपराजे, रघुराजे त्यानंतर भगवान श्रीराम, भीष्म पितामह इत्यादींनी सप्तद्वीपांवर अधिराज्य करून सप्तद्वीपाधिपती चक्रवर्ती सम्राट झाल्याच्या पुराणात नोंदी आहेत. 'वसुधैव कुटुंबकम्' ही केवळ पुस्तकातील भावना नसून ती प्रत्यक्षात कृती होती हे सप्तद्वीप समन्वयातून लक्षात येईल. ▮

९८२२२६२७३५

## 'नीट' कधीतरी नीट होणार का?

भारतातील सर्वांत मोठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा 'नीट' २०२६ रद्द होण्याच्या निर्णयाने देशात खळबळ उडाली आहे. ३ मे रोजी झालेली परीक्षा ज्या पद्धतीने वादाच्या भोवऱ्यात अडकली व अखेर रद्द करावी लागली, त्यावरून एकच प्रश्न विचारला जात आहे की देशातील सर्वांत महत्त्वाची परीक्षा पद्धत कधीतरी नीट म्हणजेच सुरळीत होईल का? नॅशनल टेस्टिंग एजन्सीने यंदा परीक्षेसाठी कडेकोट बंदोबस्त केला होता. ५जी जॅमर्स, एआय-असिस्टेड सीसीटीव्ही, बायोमेट्रिक पडताळणी आणि जीपीएस ट्रॅकिंग असलेल्या वाहनांतून प्रश्नपत्रिकांची ने-आण... इतकेच नव्हे तर साध्या ड्रेस कोडवरूनही कडक नियम लादले गेले होते. अर्ध्या बाह्यांचे कपडे, बुटांना बंदी अशा नियमांमुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. विद्यार्थ्यांचे पूर्ण हाताचे कपडे सुद्धा फाडण्यात आले. कपड्यांना असलेल्या बटन सुद्धा काढण्यात आल्या पण, इतक्या हायटेक सुरक्षेला राजस्थान कथित पेपर फुटीच्या घटनांनी सुरुंग लावला. ३ मे रोजी २३ लाख विद्यार्थ्यांनी दिलेली ही परीक्षा सुरक्षित असल्याचा दावा एनटीएने केला होता, मात्र त्यानंतर राजस्थान आणि उत्तराखंडमधून समोर आलेल्या प्रश्नपत्रिकांमधील साम्यामुळे पेपर फूट प्रकरण समोर आले. राजस्थानच्या तपासात १३५ प्रश्न तंतोतंत जुळल्याचे समोर आल्यानंतर राजकीय दबाव वाढला आणि अखेर एनटीएने फेरपरीक्षेचा निर्णय घेतला. २०२४ मध्येही नीट परीक्षा वादात सापडली होती. बिहारमधील पेपर फुटीचे आरोप आणि १५०० हून अधिक विद्यार्थ्यांना मिळालेले ग्रेस मार्क्स यामुळे सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घ्यावी लागली होती. मात्र, त्यावेळी केवळ विशिष्ट विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा झाली होती. पण २०२६ मध्ये परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. तब्बल २३ लाख विद्यार्थ्यांच्या कष्टावर पेपर फुटीच्या घटनेने पाणी फेरले आहे. नीट परीक्षा केवळ डॉक्टर बनण्याचे साधन नाही, तर ती मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलांच्या जिद्दीचे प्रतीक आहे. पण वारंवार होणारे घोळ पाहता, गुन्हेगारांना वचक बसेल अशी शिक्षा करावी अन्यथा, नीटचा हा घोळ देशातील गुणवत्तेला ग्रहण लावेल.

**वैभव बावनकर**/नागपूर. ९५४५७४५५८०

## वाचक पत्रे

### त्यांना वठणीवर आणा

'तुष्टीकरणाला खतपाणी घालणाऱ्या शक्ती सक्रिय : पंतप्रधान मोदी' ही बातमी वाचली. या वक्तव्यात नवीन काही नाही. गेल्या हजारो वर्षांचा भारताचा इतिहास बघितला तर अशा शक्ती देशात अस्तित्वात आहेत. धर्म, जातपात, पंथ, भाषा आणि प्रांत अशा मुद्द्यांवर जनतेमध्ये फोडा आणि झोडा धोरण राबवून भारतातील विविध धर्मीयांना एकमेकांविषयी भीती दाखवणे आणि सत्तेची मलई खाण्याचा ठेका स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिशांकडून काँग्रेसच्या नेत्यांनी घेतला होता आणि आजही ते याच मुद्द्यावर आपले राजकारण करत आहेत. या सत्कार्यात त्यांना सहकार्य करण्यासाठी इंडिया आघाडी नावाची एक टोळी तयार झाली आहे. देशात अराजकता माजवण्याची एकही संधी ते सोडत नाहीत. देशात हिंसाचार करून सत्ता बळकावण्यासाठी काँग्रेसचे नेते उघडपणे जनतेला बंड करण्याचे आवाहन करतात. लोकसभेतील विरोधी पक्षनेते विदेशात जाऊन भारतविरोधी शक्तींच्या गाठीभेटी घेतात. पाकिस्तानी अतिरेकी हल्ल्यानंतर पाकिस्तानी भाषा बोलून पाकिस्तानचा बचाव करतात. अतिरेक्यांच्या मृत्यूनंतर आसवे ढाळतात. चीनच्या कम्युनिस्ट पार्टीबरोबर काँग्रेस गुप्त करार करते. देशातील अर्बन नक्षलवादी आणि विचारवंत आपापल्या परीने देशात अशांतता माजवण्याचा, सरकारविरोधी वातावरण निर्माण करण्याचा उघडपणे प्रयत्न करतात. अशा कितीतरी गोष्टी आहेत की ज्या केंद्र सरकारला ठावूक आहेत.

पण अशा देशविरोधी शक्तींविरोधात कारवाईची गरज आहे. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या विरोधात देशद्रोही खटले भरून त्यांना वठणीवर आणले पाहिजे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### शालेय विद्यार्थी मराठीत अडकले

यावर्षी दहावी बोर्डाचा निकाल लागला. त्यामध्ये मराठी विषयामध्ये ९४ हजार विद्यार्थी अनुत्तीर्ण झालीत. खरोखर हे मराठी माणसाचं दुर्दैव आहे आणि त्या मुलांच्या आई-बापाचं पण दुर्दैव आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला, शाळेमध्ये मराठी सक्ती झाली तरीही मराठीचं मराठीपण शाळेमध्ये कुठे दिसून आलं नाही, विशेष म्हणून पहिलीपासून ते दहावीपर्यंत मराठी विषयाचे जे शिक्षक असतील त्यांनी मराठी विषय चांगला शिकविण्याचा प्रयत्न करावा. सध्या काय होत आहे की बेस्ट फाईव्हमध्ये मराठी विषयात जरी अनुत्तीर्ण असला तरी तो उत्तीर्ण होतो. बेस्ट फाईव्ह जरी असलं तरी बोर्डाने मराठी अनिवार्य ठेवावं असं वाटतं. खरोखर बोर्डाने मराठीसाठी काही नियम करायला हवेत. महाराष्ट्रमध्ये मराठी आपली मातृभाषा असून जर त्या विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असतील तर मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला असून त्याचा काय उपयोग? ▮

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापूर विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे उद्यापासून टप्प्याटप्प्याने आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. १२ मे-**

महाराष्ट्र विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या निर्णयानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील कर्मचारी १४ मेपासून टप्याटप्याने आंदोलन करतील.

अकृषि विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे, विद्यापीठातील उर्वरित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, सातवा वेतन आयोगानुसार रजा रोखीकरण अदा करणे व अन्य न्यायिक प्रलंबित मागण्याबाबत तात्काळ व ठोस निर्णय न झाल्यास टप्याटप्याने आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना कळविले आहे. त्यानुसार विद्यापीठाचे कुलगुरु, प्र-कुलगुरु व कुलसचिव यांना पुअहो सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटना, कास्ट्राईब संघटना, चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना व ऑफिसर्स फोरम यांच्या वतीने संयुक्तरित्या सविस्तर निवेदन देण्यात आले. यावेळी अध्यक्ष सुनिल थोरात, रवी शिंदे, प्रशांत चोरमले , रविकांत हुक्केरी, संतोष क्षिरसागर, भागवत घंटे, कांचन आघाव, उज्वला दंतकाळे , रवी हिप्परगी, अरविंद कोळेकर, किरण कराळे आदी उपस्थित होते.

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज.नं. २२/२०२६ नि.नं.५
पुढील नेमली ता. २०/०६/२०२६

### बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात

**श्री. बालाजी कुंडलिक ठोंबरे**
वय - ५० वर्षे, धंदा - सलून
रा. मु.पो. बेदराई विहीरीजवळ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** **- सामनेवाला**

**अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेचा जाहीर प्रगटीकरण**

ज्याअर्थी यातील अर्जदार हे मयत साधु शिवराम ठोंबरे यांचा सख्ख्या भावाचा मुलगा असून मयत शिवराम ठोंबरे यांचे पुतणे आहेत. मयत कै. साधु शिवराम ठोंबरे यांचा मृत्यू दि. २५/१२/२००९ रोजी मयत झालेला आहे. तसेच यातील अर्जदाराचे वडिल कै. कुंडलिक शिवराम ठोंबरे हे दि. २८/०१/२०२१ रोजी मयत झालेले आहे. व यातील अर्जदाराची आई कै. सिताबाई कुंडलिक ठोंबरे या दि. ०८/०९/१९९५ रोजी मयत झालेल्या आहेत. कै. कुंडलिक शिवराम ठोंबरे, व कै. सिताबाई कुंडलिक ठोंबरे अर्जदार हे एकमेव त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्याचे कायदेशीर हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकरीता बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात अर्जदारानी अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी मयत कै. कुंडलिक शिवराम ठोंबरे व कै. सिताबाई कुंडलिक ठोंबरे यांना इतर कोणी वारस जवळचे नाहीत असेल तर त्याचे काही म्हणणे असल्यास जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलेली तारीख २०/०६/२६ रोजी मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे व हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानीशी दाखल करावी. अन्यथा मुदतीत कोणाचीही हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे. हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले असे. ता. २९/०४/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब**
**बार्शी, जि. सोलापूर**

---

## जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील विशेषतः तालुका दक्षिण सोलापूर, मौजे सादेपूर येथील तमाम नागरिकांना सदरहू जाहीर नोटीसीने कळवण्यात येते कि, **मिळकतीचे वर्णन** : अ) डी व सब डी सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे सादेपूर येथील गट क्र. ८६/२/२ यांसी क्षेत्र ० हे २० आर यांसी चतुःसीमा पूर्वेस गट क्र.८७/१, दक्षिणेस गट क्र.८६, पश्चिमेस - सादेपूर - निम्बर्गी रोड, उत्तरेस गट नं.८६,

वर नमूद मिळकत हि मयत कृष्णाजी मारुती चौधरी यांना महाराष्ट्र शासनाने वहिवाटन्याकरिता भोगवटदार वर्ग २ म्हणून दिलेली होती. पुढे जाऊन कृष्णाजी मारुती चौधरी मयत झाल्यानंतर त्यांचे वारसदार म्हणून पत्नी रुक्मिणीबाई व मुलगी सुलक्षणा यांची नावे सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी लागलेली होती. त्यानंतर रुक्मिणीबाई यादेखील मयत झाल्यानंतर त्यांचे नाव ७/१२ उताऱ्यावरून कमी झाले आहे. मयत कृष्णाजी यांना मुलगी सुलक्षणा हिचेशिवाय कल्पना, शीलवंत, शेखर अशी इतर अपत्ये होती. पैकी शेखर हा मयत आहे. सदर मिळकत हि वर नमूद भोगवटदारांना वहिवाटने अवघड झाल्याने त्यांनी सक्षम महसूल अधिकाऱ्याचे परवानगीकरिता कार्यवाही सुरु करून वर नमूद मिळकत आमचे अशिल श्रीमती सायली संजयकुमार वाघमारे यांना कायम खुषखरेदी देण्याच्या हेतू उददेशाने आमच्या अशीलांशी बोलणी करून काही रक्कम इसारा दाखल स्विकारुन आमचे अशिलांच्या हक्कात रीतसर इसारापावती लिहून दिलेली आहे. तेव्हा सदर मिळकती वर कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास किंवा वर नमूद मिळकत कोणत्याही गहाण, दान, बक्षिसपत्र, कोर्ट हुकूमनामा, पोटगी, लीस, खरेदीखत, अगर अन्य व्यवहाराचा भाग असल्यास व तशी कोणाची हरकत असल्यास योग्य त्या कागदपत्रांसह खालील नमूद पत्यावर ७ दिवसांच्या आत कळवावे, अशी हरकत न आल्यास आमचे अशील पुढील व्यवहार करतील, व तदनंतर कोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली असे. ता.०६/०५/२०२६

**अशीलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. अजय दिनकर रणश्रृंगारे**
**चेंबर नं. ४३, पहिला मजला, लॉयर्स चेंबर्स,**
**सोलापूर जिल्हा न्यायालय आवार, सोलापूर**

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

डि ।। व सब डी ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथील हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्व्हे नं. २२३, यांसी नवीन सर्व्हे नं. ५२ यापैकी विष्णू नगर भाग २ या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं. ३८, यांसी महानगरपालिका मिळकत क्र. ६५२९५४ यांसी हद्द पूर्वपश्चिम ३० फुट, दक्षिणोत्तर ३० फुट असे एकूण क्षेत्र ९०० चौ.फुट किंवा ८३.६४ चौ.मी. इतके आहे. यात १० १० फुट मापाची चोहो बाजूने व वरती पन्हाळी पत्रे घातलेल्या दोन खोल्या असून बाकीची जागा खुली आहे.

यासी चतुः सीमा खालीलप्रमाणे :-
पूर्वेस : रस्ता — पश्चिमेस : प्लॉट नं. ३७
दक्षिणेस : प्लॉट नं. ४० — उत्तरेस : प्लॉट नं. ३६

सदर वर नमूद प्लॉट जागा अलमास आफताब शेख यांच्या मालकी कब्जे वाहिवाटीचे आहे. तरी प्लॉटजागेचे मालक यांनी आमचे अशिल यांना सदर प्लॉट जागा विक्री करण्याचे ठरवून व्यवहार केलेला आहे. तरी त्या अनुषंगाने वर नमूद प्लॉट जागा ही निर्वेध निजोखमी असल्याबाबतची हमी सदरहू मालकाने आमचे अशिसास दिलेली आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचीही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध गहाण, दान, लिज, लीन, टाच, पोटगी व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ४ (आठ) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वर नमूद प्लॉटजागा ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही, कसलीही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही, कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

दिनांक: /०५/२०२६

**सही/-**
**अशिलांतर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. नुजहत रहिमान शेख**
ऑफिस. नं. ११ स्टार चॉईस कॉम्प्लेक्स,
काजळ नगर, मजरेवाडी, होटगी रोड, सोलापूर
मो. ९५२७९११९१२

---

## श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

**श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैदराबाद रोड,**
**सोलापूर. फोन नं. २३७४६७८**

### टेंडर नोटीस

श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर या संस्थेस सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता स्टेशनरी खरेदी करावयाची आहे व आवश्यक असणारी छपाई छापून घ्यावयाची आहे. तरी ज्यांना स्टेशनरीचे पुरवठा करावयाचा आहे व छपाई काम करावयाचे आहे. त्यांनी आपली दरपत्रक दिनांक २०/०५/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य कार्यालयात आणून द्यावेत.

या संबंधीची स्टेशनरी साहित्यांची यादी तसेच छपाई यादी व छपाईचे नमुने श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर मुख्य कार्यालय, श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैदराबाद रोड येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

**जा.नं. :- स्टेशनरी व छपाई/१९८**
**दिनांक :- १२/०५/२०२६**

**सही/-**
**सचिव** **सभापती**
**श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**

---

## Classifieds

### Vacancy

Vacancy available for Sales Engineer / Marketing Executive. Swaraj Pneumatics mobile: 8380050483

### पाहिजेत

**जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात घरगुती काम करण्यासाठी २५ ते ३५ वयोगटातील महिला पाहिजे.**
**संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

---

## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

सोलापूर जिल्हातील तमाम लोकांना विशेषतः मंगळवेढा तालुक्यातील मौजे मंगळवेढा, ता. मंगळवेढा येथील लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** :- जिल्हा सोलापूर, तालुका मंगळवेढा पैकी मौजे मंगळवेढा येथील शेतजमीन गट नं. ४२५८ क्षेत्र ०३ हे. २३ आर, आकार १४ रु. ०५ पैसै येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत.

सदर मिळकत ही बाळासाहेब नामदेव बाबर, रावसाहेब नामदेव बाबर, ज्ञानेश्वर अशोक बाबर, अतुल अशोक बाबर, विजया उत्तम बाबर, नागेश उत्तम बाबर, रुपाली नागनाथ बहिरे, राणी संतोष आदमिले, स्वाती पांडूरंग मोरे यांचे समाईकातील मालकीची मिळकत आहे. सदरची संपूर्ण मिळकत ही आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या संदर्भात आमचे अशिलाची व त्यांचेत वर नमुद मिळकती संदर्भात साधकबाधक चर्चा होऊन खरेदी-विक्रीचा व्यवहार ठरुन सदर व्यवहारापोटी आमचे अशिलाने त्यांना इसारा रक्कम दिलेली असून ती रक्कम त्यांनी स्विकारलेली आहे. तसेच सदरील खरेदी व्यवहाराची उर्वरीत रक्कम खरेदीखतावेळी देणेची आहे.

वर नमुद मिळकतीबाबत व आमचे अशिलासोबत झालेल्या व्यवहाराबाबत व इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत कोणाचाही हक्क, हितसंबंध करार, गहाण, दान, साठेखत, करार, बोजा, मृत्यूपत्र, खरेदी विक्री, कोर्ट केसेस, बँक कर्ज किंवा अन्य कोणत्याही हस्तांतरणाबाबतचा व्यवहार असेल तर किंवा कोणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३ दिवसांचे आत लेखी हरकत नोंदविण्यात यावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीनीबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून सदर मिळकतीच्या खरेदीसंदर्भात खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी. मुदतीनंतर येणाऱ्या तकारीचा विचार केला जाणार नाही.

कुणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहिर नोटीस दिली असे. दि. १३/०५/२०२६

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. ऋषीकेश अरविंद क्षीरसागर**
**(बी.ए., एल.एल.बी)**
**मंगळवेढा दिवाणी व फौजदारी न्यायालय,**
**मंगळवेढा. मो. ७०२८५७७३०३**

---

# विक्री अधिकारी यांचे कार्यालय

**द्वारा : श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-को-ऑप सोसायटी लि. बार्शी. शाखा - वैराग**
**पत्ता : ७३९/१७, पाटील प्लॉट, निकिता हॉटेलजवळ, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर ४१३४११**

**जा.क्र कायदा विभाग/२८९/०४/२०२६** **दि : २८/०४/२०२६**

## स्थावर मालमत्ता विक्रीसाठी विक्री सुचना

**(बहुराज्यीय सहकारी संस्था नियम २००२ मधील नियम ३७ (११) व या मधील इतर तरतुदी पहा)**

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ व नियमामधील तरतुदीनुसार कलम ९७ व नियम २ (१०) नुसार शक्ती प्रदानित विक्री अधिकाऱ्याने जप्त केलेली स्थावर मालमत्तेची विक्रीची जाहिर सूचना याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषत कर्जदार / जामीनदारांना नोटीस देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सदर कायद्याअंतर्गत कलम ९७ व नियम २ (१०) नुसार शक्ती प्रदानित विक्री अधिकारी यांनी कर्जदाराकडून / जामीनदारांकडून थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी थकबाकीदारांच्या स्वतःच्या नावाने असलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यात आला आहे. मालमत्ता जशा व जेथे आहेत तशा आणि ज्या परिस्थितीत आहेत तशा आणि ज्ञात व अज्ञात बोजासह त्याची जाहिर लिलावाने विक्री करण्यात येत आहे. खाली नमुद केलेल्या स्थावर मालत्तेचा जाहिर लिलाव सदर अधिनियम व त्या खालील नियमामधील अटी व शर्ती व नियमातील तरतुदीनुसार करण्यात येईल. खाली स्थावर मालमत्तेचा तपशील, लिलाव विक्रीची तारीख, वेळ व ठिकाण देण्यात येत आहे. लिलाव खालील अटी व शर्तीवर करण्यात येईल.

| कर्जदार/ जामीनदार तारण मिळकतदार यांचे नाव पत्ता | दिनांक २८/०४/२०२६ अखेर येणे बाकी | मिळकत क्रमांक | तारण स्थावर मालमतेचा तपशील | राखीव किंमत | लिलावाचे ठिकाण, लिलाव तारीख, लिलाव वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **श्री राजेंद्र नेताजी पालकर (कर्जदार),** मौजे रस्तापूर, ता. बार्शी, जि. सोलापूर | ३,२०,८८२/- | मौजे रस्तापूर हद्दीतील मिळकत नं. १३४ | ०.४७.०० हे. आर. | **रु. १०,२०,०००** | श्री भगवंत मल्टीस्टेट, गांधी चौक, वैराग दिनांक :- २२/०५ /२०२६ वेळ :- सकाळी ११ वाजता |
| श्री दिगंबर दत्तात्रय बरबडे मौजे - रस्तापूर, ता. बार्शी, जि. सोलापूर | ३,२०,८८२/- | मौजे रस्तापूर हद्दीतील मिळकत नं-३२३/२ | ०१ हे ५७ आर | | |
| श्री अमोल बबन कासार मौजे वैराग ता. बार्शी, जि. सोलापूर | ३,२०,८८२/- | | | | |

सहदुय्यम निबंधक वर्ग २ बार्शी यांच्या मूल्यांकन प्रमाणपत्राप्रमाणे
जमिनीचा शासनदरा प्रमाणे बाजार भाव दर रु. **२,३६,६४०/-**

**खाजगी /संस्था नियुक्त मूल्यांकनकार**
श्री. साहिल शरद खडके (BE CIVIL) यांनी या मालमत्तेत बाजारभावाप्रमाणे दिलेली आजची किंमत बाजारभाव दर **रु. १०,२०,०००/-**

बहुराज्यीय सहकारी अधिनियम २००२ व नियम २००२ नुसार विक्रीसाठी वैधानिक ३० दिवसाची विक्री सूचना गहाणखत करणार / कर्जदारांना लिलावापूर्वी पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची शेवटची संधी दिली जात आहे. तसे न झाल्यास वरील वेळापत्रकानुसार जप्त केलेली मालमत्ता विकली जाईल.

**सुचना** : सर्वांना असे ही सुचित करण्यात येते की, धनको / उपरोक्त संस्थेचे विक्री अधिकारी यांनी कर्जदार व जामीनदार यांना (ज्यांच्या मालमत्ता लिलावाने विक्री करावयाच्या आहेत त्यांना) नोंदणीकृत पोष्टाने नोटीसा पाठविल्या आहेत. ज्यांना नोटीस प्राप्त झाली. त्यांनी इतर कर्जदार व जामीनदार यांना त्याची कल्पना द्यावी. त्याचप्रमाणे व्यापक प्रसिध्दी म्हणून ही नोटीस नामांकीत दैनिकामध्ये देखील प्रकाशित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

१) लिलावात भाग घेणाऱ्यांना / लिलाव बोली बोलणाऱ्यांना लिलाव सुरु होण्यापूर्वी राखीव किंमतीच्या १०% अनामत रक्कम भरावी लागेल.
२) स्थावर मालमत्तेच्या राखीव किंमती पेक्षा कमी रक्कमेत विक्री केली जाणार नाही.
३) ज्या व्यक्तिच्या नावे लिलाव पूर्ण होईल / जो व्यक्ती सर्वपेक्षा जास्त बोली बोलेल त्या व्यक्तीस लिलाव बोलीच्या २५% रक्कम लिलावाच्या नंतर त्याच दिवशी ताबडतोब भरावी लागेल किंवा बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ मधील तरतुदीनुसार कालावधी दिला जाईल, लिलाव बोलीची बाकी राहिलेली ७५% रक्कम व मुद्रांक शुल्काची रक्कम विक्री कायम केलेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत भरावी लागेल. न भरल्यास खरेदीदाराने भरणा केलेली २५% रक्कम व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच अशा परिस्थितीत खरेदीदाराचा संबंधित मालमत्तेवर कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.
४) लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना स्थावर मालमत्तेची पाहणी संस्थेच्या कामकाजाच्या दिवशी आठवड्यातून दोन दिवस मंगळवार व बुधवार या दिवशी दुपारी ३ ते ४ च्या वेळेत करता येईल, त्याकरिता आमच्या शाखेचे शाखाधिकारी **श्री. नवनाथ गुणवंतराव भोसले** मो.नं. ८८०५३२५९५९ यांच्याशी संपर्क साधावा.
५) कोणतीही पूर्व सूचना न देता, लिलाव, विक्री स्थगित व रद्द करण्याचे अधिकार, विक्री अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
६) वरील मालमत्तेवरील शेतसारा, नगर परिषद कर, लोकल कर, लाईट बिल व इतर कराची जबाबदारी खरेदीदारावर राहील.
७) स्थावर मालमत्तेची विक्री जेथे आहे, जशी आहे, जशा परिस्थितीत आहे तशी या तत्वावर करण्यात येणार आहे. जर या मालमत्तेवर काही बोजा असेलं तर त्यासह ही विक्री करण्यात येईल.
८) यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या अनुमतीनंतर पूर्ण केला जाईल.
९) लिलाव प्रसंगी मोबाईल वापरण्यास प्रतिबंध राहील, तसेच बयाणा रक्कम भरलेल्या भागधारकांनाच प्रवेश देण्यात येईल. नियमाचे उल्लंघन, आर्थिक क्षमता, लिलावाच्या वेळी गोंधळ घालणे, सार्वजनीक शांततेचा भंग करणे इ. कारणास्तव कोणत्याही क्षणी लिलाव तहकूब करण्याचा अधिकार विक्री अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

**बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ अंतर्गत वैधानिक सुचना :-**

कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे अशी ही संधी देण्यात येते की, त्यांनी उपरोक्त संस्थेची एकूण थकबाकी लिलावाची बोली बोलण्यापूर्वी अदा करावी. त्यात ते अयशस्वी झाल्यास तसेच थकबाकीच्या वसुलीसाठी विक्रीच्या रकमेतून वसुल न झाल्यास शिल्लक रक्कम जर असेल तर कर्जदार / जामीनदार यांच्याकडून शिल्लक पूर्ण येणे बाकी व पुढील व्याज आणि खर्चासह वसुल केली जाईल, याची नोंद घ्यावी.

**टिप** : अधिक माहितीसाठी विक्री अधिकारी **श्री. मिलिंद सिद्राम कांबळे** मो.नं. ८८०५३७५९५९
**पत्ता** : निकिता हॉटेल शेजारी, कुर्डूवाडी रोड, बार्शी जि. सोलापूर पिन - ४१३४११ यांच्याशी संपर्क करावा.

**दिनांक: २८/०४/२०२६**
**ठिकाण : बार्शी**

**शिक्का**

**सही/-**
**मिलिंद सिद्राम कांबळे**
**(कलम - ९२ मधील तरतुदीप्रमाणे नियुक्त)**
**श्री भगवंत मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी, लि. बार्शी**

**प्रतिलिपी : कर्जदार, जामीनदार, सर्व संबंधीतांना व नोटीस बोर्डवर डकवण्यासाठी**

१) **राजेंद्र नेताजी पालकर (कर्जदार)** मु. पो. रस्तापूर ता. बार्शी
२) **दिगंबर दत्तात्रय बरबडे (जमीनदार)** मु. पो. रस्तापूर ता. बार्शी.
३) **अमोल बबन कासार (जमीनदार)** मु. पो. वैराग ता. बार्शी
४) **तहसीलदार तहसील कार्यालय,** बार्शी जि. सोलापूर
५) **मंडल अधिकारी** मौजे रस्तापूर ता. बार्शी जि. सोलापूर
६) **ग्राममहसुल अधिकारी (तलाठी सज्जा कार्यालय)** मौजे रस्तापूर ता. बार्शी जि. सोलापूर
७) **सरपंच** मौजे रस्तापूर ता. बार्शी जि. सोलापूर
८) **पोलीस पाटील** मौजे रस्तापूर ता. बार्शी जि. सोलापूर
९) **तंटामुक्ती अध्यक्ष** मौजे रस्तापूर ता. बार्शी जि. सोलापूर

---

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**'इंद्रभुवन' पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ,**
**डॉ. आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१**

### ई-लिलाव सुचना क्र. ०१

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिका मालकीचे असलेल्या शॉपिंग सेंटरमधील मेजर व मिनी गाळे १० वर्षांसाठी भाडे तत्वावर देणेकामी मा. आयुक्त यांचे मान्यतेने जाहिर ई-लिलावाद्वारे भाडेदर मागविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) 2026-MH-34301 | 9) 2026-MM-34318 | 17) 2026-MH-34310 |
| 2) 2026-MH-34302 | 10) 2026-MH-34320 | 18) 2026-MH-34307 |
| 3) 2026-MH-34303 | 11) 2026-MH-34321 | 19) 2026-MH-34309 |
| 4) 2026-MH-34306 | 12) 2026-MH-34322 | 20) 2026-MH-34314 |
| 5) 2026-MH-34308 | 13) 2026-MH-34323 | 21) 2026-MH-34315 |
| 6) 2026-MH-34311 | 14) 2026 MH-34324 | 22) 2026-MH-34316 |
| 7) 2026-MH-34312 | 15) 2026-MH-34325 | 23) 2026-MH-34317 |
| 8) 2026-MH-34313 | 16) 2026-MH-34300 | 24) 2026-MH-34319 |

| | |
|---|---|
| ई लिलाव प्रसिध्द वेबसाईट | www.eauction.gov.in |
| ई-लिलाव प्रसिध्द दिनांक | दि. १३/०५/२०२६ सकाळी १०.०० वाजता |
| ई-लिलाव प्रवेश फी भरावयाची मुदत | दि. १३/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दि. २२/०५/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| लिलावधारकाची कागदपत्रे तपासून पात्र-अपात्र ठरविणे | दि. २५/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दि. २७/०५/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| पात्र लिलावधारकास बोली लावणेची मुदत | दि २८/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ई-लिलाव प्रवेश फी किंमत | मेजर गाळा - र.रु. ५,०००/- मिनी गाळा - र.रु. २,०००/- |

**सही/-**
**(वीणा पवार)**
**अति. आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी**
**भुमी व मालमत्ता कार्यालय, सो.म.पा.**

---

## विक्री अधिकारी यांचे कार्यालय,

**द्वारा- श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., बार्शी.,**
पत्ता - ७३९/१७, पाटील प्लॉट, निकिता हॉटेल जवळ, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर. ४१३ ४११.
संपर्क - ९०११६९२८५८ / ९८८१९२६२९६ / ८८०५३७५९५९ ईमेल: sbmbarshi@gmail.com

जा.क्र कायदा विभाग/लवाद/३०/बार्शी/२०२६-२७. दि.- ०७/०५/२०२६

### जप्त केलेली स्थावर मालमत्ता विक्रीसाठी विक्री सूचना

(MSCS Rule, २००२ नियम ३७ (३) (११) व उपनियम मधील तरतुदी पहा)

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ व नियमामधील तरतुदीनुसार कलम ९७ व नियम २ (x) शक्ती प्रदानित विक्री अधिकाऱ्याने जप्त केलेली स्थावर मालमत्तेची विक्रीची जाहीर सूचना याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदार/ जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेली जप्त केलेली मालमत्ता सदर कायद्याअंतर्गत कलम ९७ व नियम (x) ती शक्ती प्रदानित विक्री अधिकारी यांनी कर्जदाराकडून/ जामीनदाराकडून थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी थकबाकीदारांच्या स्वतःच्या नावाने असलेल्या स्थावर मालमत्तेवर जप्ती बोजाची नोंद झाली आहे. सदर मालमत्ता ''जशी व जेथे असतील तशा ''(As Is Where Is), ''जे आहेत ते ''(As Is What Is) आणि ''जे काही आहे ते ''(Whatever There Is) आणि ज्ञात व अज्ञात बोजासह (Known, Unknown Encumbrance) जाहीर लिलावाने विक्री करण्यात येणार आहे. खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव सदर कायदा व खालील अटी व शर्ती व नियमातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

| कर्जदार/जामीनदार/ मिळकतदार यांचे नाव व पत्ता | अखेर येणे बाकी दिनांक - ०७/०५/२०२६ | स्थावर मालमत्तेचा तपशील | लिलावाचे ठिकाण, तारीख, वेळ |
|---|---|---|---|
| कर्जदार:- श्री. रामहरी लक्ष्मण नलगे रा. खामगाव ता. बार्शी जि. सोलापूर जामीनदार:- १) श्री. राजेंद्र चंद्रभान नलगे रा. खामगाव ता. बार्शी २) श्री. मारुती आबाराव नाईकनवरे रा. खामगाव ता. बार्शी | कर्ज खाते क्र. SHO-५५ चे रक्कम रुपये येणे बाकी - ६३,९२७/- | श्री. रामहरी लक्ष्मण नलगे मौजे पिंपळगाव (पांगरी) यांचे सर्वे/गट नं.: १२६/३ मधील क्षेत्र ०.७६ आर चतु:सीमा:- पूर्व- श्री. बाळासाहेब देशमुख पश्चिम - श्री. अक्षय आण्णा नलगे दक्षिण - नदी उत्तर - श्री. राजेंद्र चंद्रभान नलगे | तारीख - १२/०६/२०२६ वेळ -सकाळी ११.०० ठिकाण - श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., बार्शी., ७३९/१७, पाटील प्लॉट, निकिता हॉटेल जवळ, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर. |
| **राखीव किंमत:- रुपये- १५,२०,०००/- (पंधरा लाख वीस हजार फक्त)** | | | |

बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ अंतर्गत वैधानिक सूचना:- बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ व नियमानुसार विक्रीसाठी वैधानिक ३० दिवसाची विक्री सूचना कर्जदारांना लिलावापूर्वी पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची शेवटची संधी दिली जात आहे. तसेच न झाल्यास वरील वेळापत्रकानुसार सुरक्षित मालमत्ता विकली जाईल तसेच कर्जदारांना मालमत्तेच्या आत असलेल्या सर्व जंगम वस्तू काढून घेण्याची विनंती करत आहे.

सूचना - कृपया लक्षात घ्या की, सुरक्षित धनको सर्व कर्जदार/जामीनदार यांना स्पीड पोस्ट/नोंदणीकृत पोस्टाने विक्री सूचना/नोटीस पाठविणार आहे. जर ती कोणत्याही पक्षांना प्राप्त झाली नाही, तर विक्री नोटीसचे हे प्रकाशन पर्यायी सेवा पद्धत म्हणून मानले जाऊ शकते. कर्जदार आणि जामीनदारांनी याद्वारे श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. बार्शी शाखा - बार्शी ची एकूण थकबाकी बोली बोलण्यापूर्वी अदा करावी. त्यात अयशस्वी झाल्यास, थकबाकीच्या वसुलीसाठी विक्रीच्या रक्कमेतून वसूल न झाल्यास, शिल्लक रक्कम असल्यास ती कर्जदार/जामीनदार यांच्याकडून पूर्ण येणे बाकी व पुढील व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल याची नोंद घ्यावी.

अटी व शर्ती -१) लिलावात सहभागी होणाऱ्या बोलीदारांना लिलाव सुरू होण्यापूर्वी रू. २५,०००/- अनामत रक्कम (EMD) जमा करावी लागेल आणि स्वतःचे KYC व आर्थिक कागदपत्रे शाखेत सादर करावी लागतील. २) जप्त केलेली मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा कमी किमतीत विकली जाणार नाही. ३) ज्याच्या नावे लिलाव मंजूर होईल, त्याला लिलावाच्या बोलीच्या २५% रक्कम लिलाव संपल्यानंतर लगेच किंवा एम.एस.सी.एस. (MSCS) कायद्याच्या तरतुदीनुसार कालावधी विक्री अधिकाऱ्याच्या अनुमतीने दिला जाईल. ४) लिलाव बोलीची बाकी राहिलेली ७५% रक्कम व मुद्रांक शुल्काची रक्कम विक्री कायम केलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत भरावी लागेल. न भरल्यास खरेदीदाराने भरलेली २५% रक्कम व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच अशा परिस्थितीत खरेदीदाराचा संबंधित मालमत्तेवर/रक्कमेबाबत कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क/दावा राहणार नाही. ५) लिलावात सहभागी होऊ इच्छिणारे व्यक्ती संस्थेच्या कामकाजाच्या दिवशी मंगळवार आणि बुधवार रोजी दुपारी ३:०० ते ४:०० या वेळेत जप्त केलेल्या मालमत्तेची पाहणी करू शकतात. अधिक माहितीसाठी आमचे बार्शी शाखेचे व्यवस्थापक श्री. कुंभारे एस. यु. (९८८१९२६२९६) यांच्याशी संपर्क साधावा. ६) विक्री अधिकाऱ्याला, कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्वसूचना न देता, कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा लिलाव स्थगित/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार आहे. ७) वरील मालमत्तेवरील महसूल कर, शेतसारा, स्थानिक कर, वीज बिल आणि इतर कोणत्याही करांची जबाबदारी खरेदीदाराची राहील; संस्था कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही. ८) स्थावर मालमत्तेची विक्री ''जेथे आहे, जशी आहे'' या तत्त्वावर आणि जर आणि काही बोजा असेल तर त्यासह करण्यात येईल. यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या अनुमतीनंतरच पूर्ण केला जाईल. ९) लिलाव प्रसंगी मोबाईल वापरण्यास प्रतिबंध राहील तसेच बयाणा रक्कम भरलेल्या भागधारकांनाच प्रवेश देण्यात येईल. नियमांचे उल्लंघन, आर्थिक क्षमतेचा अभाव, सार्वजनिक शांतता भंग, किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव लिलाव कोणत्याही वेळी तहकूब करण्याचा अधिकार विक्री अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. १०) विक्रीची पुष्टी केली जाईल आणि विहित नमुन्यानुसार विक्री प्रमाणपत्र केवळ खरेदीदार (विक्रेता)/अर्जदार (अर्जदारांच्या) नावावरच जारी केले जाईल आणि ते इतर कोणत्याही नावाने जारी केले जाणार नाही. नोंदणीसाठी उपनिबंधक यांच्याकडे विक्री प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी खरेदीदाराची असेल. ११) आयकर कायद्यातील नियमानुसार पात्र विहीत TDS सर्वोच्च बोलीदाराने भरणे बंधनकारक आहे. (बोली रक्कम वगळून). अधिक माहितीसाठी विक्री अधिकारी श्री. भोसले एन.जी मो.नं. ९०११६९२८५८ विक्री अधिकारी यांचे कार्यालय बार्शी येथे संपर्क करावा.

**दिनांक - ०७/०५/२०२६**
**ठिकाण - बार्शी**

**सही/-**
**विक्री अधिकारी,**
**सहकार मंत्रालय, सहकार संस्थेचे केंद्रीय निबंधक, न्यू दिल्ली. यांनी बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा कलम ९७ नियम २ (x) नुसार, द्वारा श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी लि, बार्शी करिता शक्ती प्रदानित.**






## महत्त्वाचे

### महेंद्र सिंह धोनी युरोपमध्ये खेळणार?

**मुंबई :** महेंद्र सिंह धोनीने या हंगामात आयपीएलचा एकही सामना खेळला नसला, तरीही या भारताच्या माजी कर्णधाराची



लोकप्रियता संपूर्ण क्रिकेट विश्वात आजही अजोड आहे,. आगामी युरोपियन टी-२० प्रीमियर लीगमध्ये (ईटीपीएल) भारताच्या या माजी कर्णधाराला खेळताना पाहणे मला मनापासून आवडेल, असे ईटीपीएलचे सह-संस्थापक व अभिनेता अभिषेक बच्चन यांनी स्पष्ट केले आहे. ईटीपीएलमध्ये कोणत्या भारतीय क्रिकेटपटूला खेळताना पाहणे तुम्हाला सर्वाधिक आवडेल, असा प्रश्न वृत्तसंस्थेने विचारला असता बच्चन यांनी डब्लिन येथून बोलताना कोणताही संकोच न करता महेंद्र सिंह धोनीचे नाव घेतले. बीसीसीआयसोबत करारबद्ध असलेल्या भारतीय क्रिकेटपटूंना आयपीएलच्या बाहेर खेळण्याची परवानगी नाही. आम्हाला याची उणीव भासेल. ते संघात असते तर खूप छान झाले असते, असे बच्चन म्हणाला. बीसीसीआयच्या सध्याच्या नियमांनुसार, भारतीय पुरुष क्रिकेटपटू भारतीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांमधून निवृत्त झाल्यानंतरच परदेशी टी-२० लीगमध्ये सहभागी होऊ शकतात. ■

### राष्ट्रीय ओपन रॅन्किंग कुस्तीत महिलांचे बाद फेरीचे सामने सुरू

**गोंडा :** भारतीय कुस्ती महासंघाने मंगळवारी, गोंडा येथील नंदिनीनगर महाविद्यालयात आयोजित वरिष्ठ खुल्या क्रमवारी कुस्ती स्पर्धेतील पुरुषांच्या ग्रीको-रोमन कुस्ती प्रकारातील स्पर्धा पूर्ण केल्या. ग्रीको-रोमन प्रकारातील पदकविजेते निश्चित झाल्यानंतर, या स्पर्धेचा टप्पा आता महिलांच्या कुस्ती प्रकाराकडे वळला आहे. यामध्ये महिला कुस्तीपटू बाद फेरीच्या माध्यमातून पुढे जात असून, आपली राष्ट्रीय क्रमवारी निश्चित करण्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. ग्रीको-रोमन विभागात कुस्तीपटूंनी १० वेगवेगळ्या वजनी गटांमध्ये स्पर्धा केली, याद्वारे त्यांची देशांतर्गत क्रमवारी निश्चित करण्यात आली. महिलांच्या कुस्ती स्पर्धा आता बाद फेरीच्या अंतिम टप्प्याकडे सरकल्या आहेत. ५७ किलो वजनी गटात, काजल चौधरीने उपांत्यपूर्व फेरीत मुस्कानचा पराभव करून विजय मिळवला असून, आता तिचा सामना शिवानीशी होईल; शिवानीने सुहानीचा पराभव करून या फेरीत प्रवेश केला आहे. रीनाने निशा सैनीचा पराभव करून उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. उपांत्य फेरीत तिचा सामना हंसिका लांबाशी होईल.

### विनेशला स्पर्धा खेळण्याची परवानगी द्या : साक्षी मलिक

**नवी दिल्ली :** ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती साक्षी मलिक हिने विनेश फोगाटला खंबीर पाठिंबा दर्शविला आहे. विनेशला आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पुनरागमन करता यावे, यासाठी तिला विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची परवानगी द्यावी, असे आवाहन तिने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांना केले आहे. विनेशने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मधून अपात्र ठरल्यानंतर अवघ्या काही तासांतच निवृत्तीची घोषणा केली होती. गेल्या वर्षी जुलैमध्ये तिला पुत्ररत्न प्राप्त झाले आणि त्यानंतर काही काळाने तिने निवृत्तीचा निर्णय मागे घेतला. आता जवळपास २० महिन्यांनंतर ती क्रीडाक्षेत्रात पुनरागमन करण्याच्या तयारीत आहे. विनेशला पाठवलेल्या १५ पानांच्या कारण दाखवा नोटीसमध्ये, भारतीय कुस्ती महासंघाने या कुस्तीपटूला किमान २६ जून २०२६ पर्यंत कोणत्याही अधिकृत स्पर्धा किंवा कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास अपात्र घोषित केले होते. या बंदीमुळे, उत्तर प्रदेशातील गोंडा येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय वरिष्ठ खुल्या मानांकन स्पर्धेमध्ये सहभागी होण्यास विनेशला विशेषतः मनाई करण्यात आली आहे.

### टी-२० विश्वचषकासाठी शबनिमचे पुनरागमन

**केप टाऊन :** दक्षिण आफ्रिकेची वेगवान गोलंदाज शबनिम इस्माईलने मंगळवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून घेतलेली निवृत्ती मागे घेतली. १२ जून ते ५ जुलै या कालावधीत इंग्लंडमध्ये होणाऱ्या आयसीसी २०२६ महिला टी-२० विश्वचषकासाठी दक्षिण आफ्रिकेच्या १५ सदस्यीय संघात तिची निवड करण्यात आली आहे. लॉरा वॉल्व्हार्ड हिच्या नेतृत्वाखालील प्रोटियाज संघात ३७ वर्षीय इस्माईलचा समावेश आहे. इस्माईलने अखेरचा सामना फेब्रुवारी २०२३ मध्ये केपटाऊन येथे झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेचे प्रतिनिधित्व करताना खेळली होती. इस्माईलच्या नावावर ११३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव आणि १२३ बळींचा राष्ट्रीय विक्रम जमा आहे. तिच्यासोबतच मारिझान कॅप आणि डेन व्हॅन निकर्क या देखील संघात सामील होतील. या दोघी अनुक्रमे आजारपणातून आणि पोटरीच्या दुखापतीतून सावरल्यानंतर संघात परतल्या आहेत. यष्टीरक्षक-फलंदाज कराबो मेसो ही देखील मनगटाच्या दुखापतीतून सावरल्यानंतर संघात परतली आहे. ■

# सुंदरची 'सुदर्श'नीय अर्धशतके

**गुजरात टायटन्स ५ बाद १६८**

◆ **अहमदाबाद, १२ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात मंगळवारी येथे खेळल्या जात असलेल्या सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या आयपीएल सामन्यात सलामीवीर साई सुदर्शन (६७) व वॉशिंग्टन सुंदरच्या (५०) दमदार अर्धशतकाच्या बळावर गुजरात टायटन्सने २० षटकांत ५ बाद १६८ धावा उभारल्या आणि हैदराबादसमोर विजयासाठी १६९ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले.

गुजरातला १६८ धावांवर रोखताना विदर्भाच्या प्रफुल्ल हिंगे व बिहारच्या साकिब हुसेनने प्रत्येकी २ बळी घेतले.

सनरायझर्सचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून यजमान गुजरात टायटन्सला प्रथम फलंदाजी करण्याचे निमंत्रण दिले.

**प्रफुल्ल हिंगेचे दोन षटकांत दोन बळी**

सलामीवीर बी. साई सुदर्शनने जोस बटलरच्या साथीने गुजरात टायटन्सच्या डावाची सुरुवात करीत नाही, तोच सनरायझर्स हैदराबादचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विदर्भाचा मध्यम गोलंदाज प्रफुल्ल हिंगेने पुन्हा एकदा प्रभावी मारा केला आणि गुजरात टायटन्सला दोन जबरदस्त हादरे दिले. पदार्पणात चार बळी घेतल्यानंतर विदर्भाच्या प्रफुल्ल हिंगेचा काळ फारसा चांगला जात नव्हता. परिणामी, तो सनरायझर्स हैदराबादच्या अंतिम बारा खेळाडूंमधून बाहेर पडला होता, पण या खेळपट्टीवर प्रफुल्ल हिंगेने आपले कौशल्य दाखवून दिले आहे.



प्रफुल्ल हिंगे १७ धावांत २ बळी



साई सुदर्शन (४४ चेंडूंत ६७ धावा)

प्रफुल्लने तिसऱ्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर कर्णधार शुभमन गिलला क्लासेनकडे, तर सहाव्या षटकातील पहिल्या चेंडूवर जोस बटलरला ईशान किशनकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. अचानक, हिंगेने २ धावांत २ घेतले आणि गुजरातची ५.१ षटकांत २ बाद २६ धावा अशी अवस्था झाली.

साई सुदर्शनने एक बाजू सांभाळीत निशांत सिंधू (२२) आणि वॉशिंग्टन सुंदरच्या साथीने आपले अर्धशतक साजरे केले आणि संघाचा डाव सावरण्याचा चांगला प्रयत्न केला. साकिब हुसेनने साई सुदर्शनला हिंगेकडून झेलबाद करीत रोखले. तोपर्यंत गुजरात टायटन्सने १९.५ षटकांत १६४ धावांचा टप्पा गाठला होता. साई सुदर्शनने ४४ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह ६१ धावांची खेळी केली. पुढे वॉशिंग्टन सुंदरने ३३ चेंडूंत ७ चौकार व एका षट्कारसह ५० धावा करताच त्याला साकिब हुसेनने ईशान किशनकडून झेलबाद केले. जेसन होल्डर (नाबाद ११) व राहुल तेवतियाने (नाबाद ४) गुजरातला २० षटकांत ५ बाद १६८ अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारून दिली. हैदराबादकडून प्रफुल्ल हिंगेने १७ धावांत २ बळी, तर साकिब हुसेनने ३७ धावांत २ बळी टिपले. पॅट कमिन्सला एक बळी टिपण्यात यश मिळाले. ◂(वृत्तसंस्था)

# छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धा बदलापूरमध्ये आजपासून

**राज्यभरातील ३८४ खेळाडूंचा सहभाग** ● **२३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे** ● **अंतिम सामना १७ मे रोजी रंगणार**

◆ **बदलापूर, १२ मे**

प्रतिष्ठेच्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेसाठी बदलापूर शहर सज्जा झाले असून १३ ते १७ मे २०२६ कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेसाठी राज्यातील ८ विभागातील ३८४ खेळाडूंचा थरार रंगणार आहे.




क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलिबॉल संघटना व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १३ मे रोजी सायंकाळी ६ वाजता हेंद्रेपाडामधील बदलापूर जिमखाना मैदानावर होणार आहे. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा रूचिता घोरपडे, क्रीडा सचिव रणजीतसिंह देओल, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, क्रीडा आयुक्त शीतल तेली -उगले आदी उपस्थित राहणार आहेत.

तब्बल २ वर्षांनंतर होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेसाठी राज्यभरातील खेळाडूंचे आगमन बदलापूर नगरीत झाले आहे. ८ विभागातील ३८४ खेळाडू, ३२ मार्गदर्शक, ३२ व्यवस्थापक, एकूण ४४८ जणांचे पथक स्पर्धेसाठी सज्ज झाले आहे. स्पर्धेत कोल्हापूर, लातूर, अमरावती, संभाजीनगर, पुणे, नागपूर, मुंबई व नाशिक या संघात चुरशीच्या लढती रंगणार आहे. १८ व २१ वर्षांखालील युवकांचा व्हॉलिबॉलचा थरार प्रथमच बदलापूरमध्ये पहाण्यास मिळणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदके देणार येणार आहे. साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील विजयी व पराभूत संघ, उपांत्य फेरीतील प्रत्येक विजयी व पराभूत संघ, अंतिम फेरीतील विजयी संघ व अंतिम फेरीतील उपविजयी संघाला रोख बक्षिसे देण्यात येणार असल्याची माहिती उपसंचालक नवनाथ फरताडे यांनी दिली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सोलापूरच्या रणरागिणींची जळगाववर मात

## राज्य महिला क्रिकेट : विभावरी देवकते 'साम नावीर'

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मे -**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतर-जिल्हा क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या महिला संघाने आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. विभावरी देवकते आणि भक्ती पवार यांच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर सोलापूरने जळगावचा ८ गडी राखून धुव्वा उडवला. अवघ्या ५२ धावांचे लक्ष्य सोलापूरने १०.३ षटकांत सहज पार केले.



नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या जळगाव संघाला सोलापूरच्या शिस्तबद्ध माऱ्यासमोर अक्षरशः शरणागती पत्करावी लागली. सोलापूरच्या भक्ती पवारने ४ षटकांत अवघ्या ७ धावा देत ३ बळी टिपले, तर विभावरी देवकतेने १६ धावांच्या मोबदल्यात ३ फलंदाजांना तंबूत धाडले.

जळगावकडून केवळ साक्षी गोरे (१२ धावा) हिलाच दुहेरी धावसंख्या गाठता आली. इतर फलंदाज अपयशी ठरल्याने जळगावचा संपूर्ण संघ १६ व्या षटकात ५२ धावांत गारद झाला.

**आर्या आणि साक्षीची आक्रमक फटकेबाजी**

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना सोलापूरच्या सलामीवीरांनी मैदानावर वर्चस्व गाजवले. आर्या उमापने अवघ्या १९ चेंडूत ४ चौकारांच्या मदतीने २६ धावांची वेगवान खेळी केली. तिला साक्षी वाघमोडेने (१८ धावा) भक्कम साथ देत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवले. सोलापूरने १०.३ षटकांत २ बाद ५६ धावा करत दिमाखदार विजय मिळवला. उत्कृष्ट गोलंदाजीचे प्रदर्शन करत ४ षटकांत १ निर्धाव षटक टाकून १६ धावांत ३ बळी घेणाऱ्या विभावरी देवकते हिला 'सामनावीर' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

**संक्षिप्त धावफलक: जळगाव:** १६ षटकांत सर्वबाद ५२ (साक्षी गोरे १२; भक्ती पवार ३/७, विभावरी देवकाते ३/१६) **पराभूत विरुद्ध सोलापूर:** १०.३ षटकांत २ बाद ५६ (आर्या उमाप २६, साक्षी वाघमोडे १८)

# सोलापूर जिल्हा बास्केटबॉल संघ निवड चाचणी १८ मे रोजी

**सोलापूर, दि. १२ मे -**

महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या १६ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्य बास्केटबॉल स्पर्धामध्ये सोलापूर जिल्ह्याचा संघ सहभागी होणार आहे.

या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनने जिल्हा संघाच्या निवडीसाठी निवड चाचणी १८ मे २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता सोलापूर येथील सेलिब्रेशन बास्केटबॉल क्रीडांगणावर पार पडणार आहे. या चाचणीसाठी ०१/०१/२०१० किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू पात्र असतील. निवड प्रक्रियेबाबत किंवा अधिक माहितीसाठी खेळाडूंनी दिनेश सारंगी (९३५९४४४८५३) किंवा नवीद मुन्शी (९२२६९३४८८०) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव साकिब शेख यांनी केले आहे.

**थायलंड ओपन बॅडमिंटन**

# सात्त्विक-चिरागचा थरारक विजय

◆ **बँकॉक, १२ मे**

मंगळवारी येथे सुरू असलेल्या थायलंड ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष दुहेरीच्या पहिल्याच सामन्यात अव्वल मानांकित जोडी सात्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टीने इंडोनेशियाच्या मुह पुत्रा एर्वियानस्या व बागास मौलाना या जोडीच्या कडव्या आव्हानाचा यशस्वी सामना करीत तीन गेमच्या थरारक लढतीत विजय मिळवला.

जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या या भारतीय जोडीने मुह आणि बागास या जोडीचा १९-२१, २३-२१, २१-१० असा ६४ मिनिटांत पराभव केला.

दुसऱ्या गेममध्ये ही भारतीय जोडी ११-१६ अशी पिछाडीवर पडली होती; मात्र त्यानंतर सलग सात गुण मिळवत त्यांनी सामन्याचे चित्रच पालटून टाकले. मुह व बागासने जोरदार पुनरागमन करत गुणसंख्या १८-१८ अशी बरोबरीत आणली, परंतु सात्त्विक व चिरागने आपला संयम कायम राखत गेममध्ये बरोबरी साधली.दुसरा गेम अत्यंत चुरशीचा ठरला. मध्यंतराच्या वेळी भारतीय जोडीने अवघ्या तीन गुणांची निसटती आघाडी घेतली. मात्र, त्यानंतरच्या खेळात इंडोनेशियाच्या जोडीने वर्चस्व गाजवले आणि १७-१४ अशी आघाडी घेतली. भारतीय जोडीने निकराचा लढा देऊनही, हा सामना अखेर निर्णायक (तिसऱ्या) गेमपर्यंत पोहोचला.



सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी

तिसऱ्या गेममध्ये सात्त्विक व चिरागने आपले पूर्ण वर्चस्व सिद्ध केले. त्यांनी ११-५ अशी मोठी आघाडी घेत सामना सहजपणे जिंकला. पुढील फेरीत या भारतीय जोडीचा सामना मलेशियाच्या ब्रायन जेरेमी गूंटींग आणि मुहम्मद हैकल या जोडीशी होईल.

तत्पूर्वी, मलेशियाच्या ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या ली झी जिया याने पात्रता फेरीत भारताच्या मानव चौधरीचा २१-१९, २१-१८ असा पराभव केला.

मिश्र दुहेरीच्या पात्रता फेरीत, भारताच्या एम. जगलान आणि एल. जगलान या जोडीला चायनीज तैपेईच्या त्साई फू चेंग आणि सुंग यू ह्सुआन यांच्याकडून ११-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला; तर महिला एकेरीच्या पात्रता फेरीत, थायलंडच्या वाय. केतक्लिएंग हिने भारताच्या ए. शहापूरकरचा २१-५, २१-७ असा सहज पराभव केला. ◂(वृत्तसंस्था)

# महापौर चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करा

## पी.एम. क्रिकेट क्लबची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मे-**

शहरातील युवकांना क्रिकेटच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने पी.एम. क्रिकेट क्लब सोलापूरच्या वतीने महापौर चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे.



तसे निवेदन क्लबचे अध्यक्ष परमेश्वर माळगे यांनी महापौर विनायक कोड्याल यांना दिले. या वेळी सभागृह नेते नरेंद्र काळे उपस्थित होते. त्यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे की, शहरातील अनेक युवक क्रिकेट खेळाकडे मोठ्या उत्साहाने वळत असून टेनिस बॉल क्रिकेट हा सर्वसामान्य तरुणांमध्ये अत्यंत लोकप्रिय खेळ बनला आहे. महापौर चषक स्पर्धेच्या आयोजनामुळे युवकांना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळेल तसेच त्यांच्यात शिस्त, संघभावना आणि खेळाडूवृत्ती विकसित होण्यास मदत होईल. तसेच शहरातील विविध भागातील संघ एकत्र आल्याने सामाजिक ऐक्य वाढण्यास मदत होईल व युवकांचा कल खेळ व आरोग्याकडे वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. महानगरपालिकेमार्फत अशा स्पर्धांचे आयोजन झाल्यास शहरातील क्रीडा क्षेत्राला मोठी चालना मिळेल.

'स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चषक' १९ वर्षाखालील बुद्धिबळ स्पर्धा

# मानस व सृष्टी गायकवाडला अजिंक्यपद

## विविध वयोगटात श्लोक, नैतिक, आयुष, संस्कृती, पृथा व ज्ञानदा अव्वल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मे -**

'स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चषक' १९ वर्षाखालील जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेत मानस व सृष्टी गायकवाड या बंधु-भगिनींनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर विजेतेपद प्राप्त केले. अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय खेळाडू मानस गायकवाड याने सात पैकी सात गुण प्राप्त करत विजेतेपद पटकाविले तर मुलींच्या गटात आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त सृष्टी गायकवाड हिने उत्कृष्ट खेळ करत पाच पैकी साडेचार गुण मिळवून तसेच टायब्रेकमध्ये सरस बोकोल्स गुणपद्धतीच्या आधारे विजेतेपद व आकर्षक चषक पटकाविला. अन्य वयोगटात मुलांमध्ये श्लोक चौधरी, नैतिक होटकर, आयुष बदवणे तसेच मुलींमध्ये मंगळवेढ्याची संस्कृती जाधव, बार्शीची पृथा ठोंबरे व ज्ञानदा सांगुळे यांनी आकर्षक खेळ करत अनुक्रमे १४, ११ व ८ वर्षांखालील गटांचे जेतेपद मिळविले.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर चेस अकॅडमी तसेच चॅम्प चेस स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने झालेल्या या स्पर्धेत श्रेयस कुदळे, अधिराज म्हेत्रे व देवदत्त



पटवर्धन यांचे प्रत्येकी सहा गुण झाल्यामुळे टायब्रेकमध्ये बोकोल्स गुणपद्धतीवर अनुक्रमे दुसरा, तिसरा व चौथा क्रमांक प्राप्त झाला. मुलींच्या गटात आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे हिने ४.५ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर बार्शीची आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अनन्या उलभगत व राष्ट्रीय खेळाडू सान्वी गोरे यांनी प्रत्येकी चार गुणांसह तिसरा व चौथा क्रमांक पटकावित सोलापूर जिल्हा संघातील स्थान निश्चित केले. या चौघींचीही निवड पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

छत्रपती शिवाजी प्रशाला व ज्युनिअर आणि सिनियर नाईट कॉलेज येथील राजर्षी शाहू सभागृहात संपन्न झालेल्या या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे प्रो-कुलगुरू लक्ष्मीकांत दामा अध्यक्षस्थानी होते. तरुण भारतचे वृत्तसंपादक व विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजितकुमार संगवे, टाटा मोटर्सचे जनरल मॅनेजर विकास गायकवाड, स्पर्धेचे संयोजक तथा विद्यापीठ सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा. सचिन गायकवाड, आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, राष्ट्रीय पंच संतोष पाटील, अतुल कुलकर्णी तसेच वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक चषक व पदके देऊन गौरविण्यात आले. विजेत्या खेळाडूंचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर आदींनी अभिनंदन केले.

**अंतिम निकाल (अनुक्रमे १ ते ५ क्रमांक, गुण व बोकोल्स गुणांसह**

**१९ वर्षे वयोगट (खुला):** मानस गायकवाड - ७, श्रेयस कुदळे- ६ (३३.५), अधिराज म्हेत्रे- ६ (२९), देवदत्त पटवर्धन- ६(३१.५), नागेश राजमाने- ५. **मुली:** सृष्टी गायकवाड - ४.५ (१५), स्वराली हातवळणे- ४.५ (१४.५), अनन्या उलभगत- ४ (१३), सान्वी गोरे-४ (१२.५), साक्षी पाटील- ३.

**१४ वर्षे वयोगट मुले:** श्लोक चौधरी - ६, आयुष जानगवळी- ५ (२९.५), युवराज गायकवाड- ५ (२९), श्रेयस कंदीकटला- ५ (२६.५), नमन रंगरेज- ५ (२४). **मुली:** संस्कृती जाधव- ३.५, ओजस्वी बोराळे- ३ (१३), दूर्वा महिंद्रकर- ३ (११.५), श्रेया शिंदे- २ १०), आद्या कुमार- २ (९).

**११ वर्षे वयोगट मुले:** नैतिक होटकर - ५ (३०), मयूर स्वामी- ५ (२८), श्रेयश इंगळे- ५ (२६.५), हिमांशू व्हनगावडे- ५ (२५), ओम राऊत- ४.५. **मुली:** पृथा ठोंबरे- ३.५, मनस्वी क्षीरसागर- ३, आर्वी सदाफुले - २ (१२), रूही दलाल - २ (८.५)

**८ वर्षे वयोगट मुले:** आयुष बदवने- ४.५, कृष्णराज पटाले- ४, अद्विक ठोंबरे- ३ (१९), विराज शेंडगे- ५, ३ (१८.५), ओम सारवडकर- ३(१७.५). **मुली:** ज्ञानदा सांगुळे- ३, त्रिशा पडुळे- २ (१३), ईशा पटवर्धन- २ (११.५), अधिरा रोकडे- २ (९.५), शार्वी गांधी- १

# कृषी अधिकारी संतोष कोयले यांचा पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ मे-**

तालुक्यात खरीप हंगामात कृषी क्षेत्रात राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेत तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांना पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

बार्शी तालुक्यात खरीप हंगामात सर्व पिकाखालील क्षेत्र सुमारे १ लाख ५ हजार हेक्टर असून, त्यापैकी तब्बल ९० टक्के म्हणजे जवळपास ९१ हजार २२८ हेक्टर क्षेत्र सोयाबीन पिकाखाली आहे. याशिवाय तूर, उडीद आणि मूग या पिकांचेही मोठे क्षेत्र तालुक्यात आहे. सध्या तालुक्यात सोयाबीनचे सरासरी उत्पादन प्रति एकरी ७ ते ८ क्विंटल इतके मिळत असले, तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हे उत्पादन वाढविण्याचा यशस्वी प्रयत्न कृषी विभागाने केला आहे. विशेषतः रुंद सरी- वरंबा पद्धत (बीबीएफ) आणि टोकन पद्धतीने लागवड या तंत्रज्ञानांचा प्रभावी प्रचार व प्रसार करण्यात आला. पारंपरिक पेरणीच्या तुलनेत या पद्धतींमुळे प्रति एकरी ३ ते ४ क्विंटल उत्पादन वाढ निश्चित होत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फायदा होत आहे. टोकन पद्धतीमध्ये मजुरांची




अडचण भासत असली तरी त्यावर उपाय म्हणून कृषी विभागामार्फत ५० टक्के अनुदानावर टोकन यंत्र उपलब्ध करुन देण्यात आले. या यंत्राच्या सहाय्याने एक मजूर एका दिवसात किमान दोन एकर क्षेत्रावर लागवड करु शकतो. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा वेळ, श्रम आणि खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी प्रेरित करत कृषी विभागाने जवळपास १३ हजार हेक्टर क्षेत्रावर बीबीएफ व टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड करण्यास यश मिळवले. या प्रभावी कामगिरीची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली असून, तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांच्या नियोजनबध्द व शेतकरी हिताच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# पंढरपूर, सातारा येथे एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यास मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ मे-**

पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येथे वारी आणि दर्शनासाठी येणाऱ्या माजी सैनिकांच्या सोयीसाठी त्याचप्रमाणे सातारा येथेही एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी व्यवहार्यता पडताळून प्रस्ताव पाठविण्यास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मान्यता दिली. माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनस्थापनेसाठीच्या विशेष निधी (महाराष्ट्र) समितीची ५० वी वार्षिक बैठक राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली लोकभवन येथे झाली. या बैठकीत माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांनाही मान्यता देण्यात आली.

पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संतोष कुमार, महाराष्ट्र, गोवा व गुजरात प्रभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल डी. एस. कुशवाहा, रिअर डमिरल शंतनु झा, एअर व्हाइस मार्शल प्रशांत वडोदकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सैनिक कल्याण संचालक तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित



होते. राज्यपाल हे माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना यासाठीच्या विशेष निधी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणे. पुनर्स्थापना उपक्रमांना संस्थात्मक पाठबळ देणे, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक गरजांची पूर्तता करणे, निधीच्या योग्य व पारदर्शक वापरावर देखरेख ठेवणे या उद्देशाने ही समिती कार्य करते. या बैठकीत लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिकांसाठी विश्रामगृहे, महासैनिक हॉल व लॉन्स तसेच पुणे येथील सैनिक कल्याण संचालनालयातील अशासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच किमान वेतन कायद्यानुसार करण्यात आलेल्या वेतन पुनर्निर्धारणालाही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील तसेच धुळे येथील मिलिटरी बॉईज हॉस्टेलचे माजी सैनिक विश्रामगृहात रूपांतर करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या अखत्यारीतील लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिक विश्रामगृहे तसेच महासैनिक हॉल व लॉन्स येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासही समितीने कार्योत्तर मान्यता दिली.

या निर्णयामुळे ऊर्जा बचतीसह पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना मिळणार आहे. याशिवाय दुरुस्ती व नवीन बांधकामांच्या ब्लॉक अंदाजपत्रकांबाबतही समितीने चर्चा करून सविस्तर अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मंजुरी देण्याचे अधिकार राज्य कार्यकारी समितीस प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी समितीमार्फत व्यावसायिक स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्याचे निर्देश देऊन या उपक्रमांमध्ये माजी सैनिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा अशी सूचना केली.

मंत्री शंभूराज देसाई यांनी सातारा येथे माजी सैनिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे सांगितले. या प्रस्तावास राज्यपालांनी सहमती दर्शवून पंढरपूरसह सातारा येथील केंद्रासाठी आर्थिक आणि अनुषंगिक बाबी तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

## मंगळवेढा बसस्थानकावर प्रवाशी महिलेचे दागिने लंपास

**मंगळवेढा, दि. १२ मे-**

मंगळवेढा बसस्थानकावर पुणे-विजापूर या एस.टी. बसमध्ये महिला चढत असताना तिची ५० हजार रुपयांची बोरमाळ चोरटयाने लंपास केली. फिर्यादी पांडुरंग साळुंखे (रा.पंढरपूर) हे व त्यांची आई दि.९ मे रोजी दुपारी ३ वाजता मंगळवेढा बसस्थानकावर पुणे-विजापूर या एस.टी. बसमध्ये चढत असताना वृध्देच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची ५० हजार रुपयांची बोरमाळ चोरटयाने हातोहात चोरुन नेली. या प्रकरणी मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल असून पोलीस हवालदार पवार हे तपास करीत आहेत. मंगळवेढा बसस्थानकावर महिला प्रवाशांच्या गळ्यातील सोने चोरुन नेण्याच्या अनेक घटना वर्षभरात घडल्या आहेत. एकाही चोरट्याला पकडण्यात यश न आल्याने त्यांच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



# ... तर भारत जागतिक महासत्ता होईल

## -अप्पर पोलिस आयुक्त शिंदे ; बार्शीत 'जागर' महोत्सवाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ मे-**

आळस आणि व्यसनाधीनतेपासून दूर राहिल्यास भारत जागतिक महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही. 'जागो हिंदुस्तानी' सारख्या कार्यक्रमातून देशभक्तीची भावना कलेच्या माध्यमातून दृढ झाली आहे, असे प्रतिपादन मीरा भाईंदरचे अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे यांनी केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा बार्शीच्यावतीने आयोजित जागर महोत्सवाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. यावेळी कोल्हापूरच्या स्वरनिनाद या वाद्यवृंद मंचांनी देशभक्तीवर गाण्यातून बार्शीकरांना मंत्रमुग्ध केले. तीन दिवसांच्या या जागर महोत्सवाचा प्रारंभ पुणे येथील श्रीपाद पद्माकार व गिरीश जाधव निर्मित विनोद रत्ना दिग्दर्शित 'चिरंजीव परफेक्ट बिघडला' या नाटकाच्या सादरीकरणातून झाला. जागर महोत्सवाचा शुभारंभ बार्शीचे आमदार दिलीप सोपल, अभिनेते विघ्नेश जोशी, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, नागपूरच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना आडके घाणेगांवकर, सामाजिक कार्यकर्त्या उज्ज्वला सोपल व गायिका जयश्री काळे यांच्या हस्ते झाला.

श्रेयश जोशी, समृद्धी कुलकर्णी व वैभव रंधवे यांनी प्रमुख भूमिका वठवलेल्या या नाटकात करिअरच्या मागे धावणाऱ्या परफेक्शनिस्ट स्त्रीच्या महत्त्वाकांक्षा आणि तिला अभिप्रेत असणारा प्रॅक्टिकल आणि परफेक्ट जोडीदार यांच्या शोधातून निर्माण झालेला यंत्रमानव आणि आधुनिक काळातील ताण-तणाव यांचे दर्शन प्रेक्षकांना झाले.दुसऱ्या दिवशी कोल्हापूरच्या स्वरनिनाद प्रस्तुत शब्दसुरांच्या झुल्यावर हा मराठी अभिजात गाण्यांची सुरेल परंपरा असलेला कार्यक्रम सादर केला. भारतभूषण शेंबेकर यांच्या निवेदनाला बार्शीकरांनी उत्स्फूर्त दाद दिली.

याप्रसंगी सोलापूर नाट्य परिषदेचे विजय साळुंखे, अजय दासरी, समद फुलमामडी, दिलीप कोरके, तेजस्विनी कदम व यतिराज वाकळे उपस्थित होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा बार्शीचे अध्यक्ष सोमेश्वर घाणेगांवकर यांना 'डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी अमरावती' या संस्थेतर्फे घोषित जीवनगौरव पुरस्काराबद्दल सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी नाट्य परिषद शाखा बार्शीचे उपाध्यक्ष राजा माने, प्रमुख कार्यवाह विजयश्री पाटील, अनिल जोशी, सूर्यकांत वायकर, प्रशांत ढोले, सतीश होनराव, ममता चोप्रा, उल्का डोंबे यांनी परिश्रम घेतले. निवेदन बार्शी नाटय शाखेच्या प्रमुख कार्यवाह विजयश्री पाटील यांनी केले. कार्यक्रम बार्शीच्या यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृहात पार पडला.

## निधन वृत्त...

### बबनराव चौगुले



**वेळापूर, दि. १२ मे-**

उघडेवाडी (ता. माळशिरस) येथील व खंडाळी सोसायटीचे सेवानिवृत्त सचिव बबनराव रामचंद्र चौगुले (वय ७०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. ते उघडेवाडी गावचे माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य नितीन चौगुले यांचे वडील होत.

### मंदाकिनी कांबळे



**सोलापूर, दि. १२ मे-**

विजापूर रोड परिसरातील रहिवासी श्रीमती मंदाकिनी भारत कांबळे यांचे आज सायंकाळी ५.४५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले आहे. जिल्हा परिषदेतील लेखा विभागातील अधिकारी श्रीयुत हरेश म्हेत्रस यांच्या त्या सासुबाई होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### लक्ष्मीकांत जोशी



**बार्शी दि. १२ मे-**

येथील शिवाजीनगर भागात राहणारे शेखर, संतोष (सेंच्युरी स्टोअर्स) व मनोज जोशी यांचे वडील लक्ष्मीकांत विश्वनाथ जोशी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मंगळावर पेठेतील मोक्ष धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सुमन मेंते



**सोलापूर, दि. १२ मे-**

केदारनाथ रेसिडेन्सी मुरारजी पेठ येथील रहिवासी श्रीमती सुमन शिवशंकर मेंते (वय ७९) यांचे दीर्घ आजाराने मंगळवार दिनांक १२ मे रोजी दुपारी निधन झाले. लिंगायत स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. किचन किंगचे संजीव मेंते यांचे त्या मातोश्री होते.

### प्रमिला चिंता



**सोलापूर, दि. १२ मे-**

येथील प्रमिला जगन्नाथ चिंता यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी आज मंगळवार दि. १२ मे रोजी दुपारी ३:४० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंतयात्रा बुधवार दि.१३ मे रोजी सकाळी ९:३० वाजता इंदिरा वसाहत, भवानी पेठ येथील राहत्या घरातून निघणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक भास्कर चिंता यांच्या त्या मातोश्री होत्या.

### राजेंद्र भास्करे



**अकलूज, दि. १२ मे-**

अकलूज येथील राजेंद्र दत्तात्रय भास्करे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगा, दोन भाऊ परिवार आहे. कासार गल्ली येथे जुन्या काळापासून त्यांचे घडाळ्याचे व इलेक्ट्रॉनिकचे दुकान आहे.

### लक्ष्मीबाई नायकुडे



**अकलूज, दि. १२ मे-**

नायकुडे वस्ती-संग्रामनगर येथील लक्ष्मीबाई नरहरी नायकुडे वार्धक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९३ वर्षांच्या होत्या.त्यांचे पश्चात तीन मुले,एक मुलगी, सुना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार भाग्यवंत लक्ष्मण नायकुडे यांच्या त्या चुलत भावजय होत्या.

# भग्न दगडांपासून अखंड श्रध्देपर्यंत : 'सोमनाथ'ची गाथा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनस्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती-हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथ-चंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली. प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे.



दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी-लाकूड आणि गवताची-असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती. इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या-१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०-५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तींच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे-सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले. पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे. त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२-८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले. १८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन भक्ती आणि लज्जा असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२-१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे. जुनागढ प्रशासन आणि जाम साहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या.

सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली. यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल. दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही. १५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे. त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण-मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता. सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे-पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो-

**आम्ही अजूनही येथे आहोत.**
**आम्ही स्मरण ठेवतो.**
**आम्ही पुन्हा उभारतो.**
**आम्ही टिकून राहतो.**

**ब्रिजेश सिंह**
प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# सोलापुरात दोन कोटींचे मेफेड्रोन जप्त

## दोघांना अटक, चार दिवसांची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मे-**

खबरीकडून मिळालेल्या माहितीवरून शहर गुन्हे शाखेच्या पथकाने मोदी मुस्लिम कब्रस्तान समोरील व्हीआयपी रोडवर एका कारमधून २ कोटी रुपयाचा ९५० ग्रॅम अंमली पदार्थाचा साठा (मेफेड्रोन) जप्त केला आहे. कारवाईत दोघांना अटक करून एका महिलेसह चार जणांविरुध्द सदर बजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचे पोलिस उपायुक्त गोहर हसन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही कारवाई आज मंगळवारी सकाळी सहा वाजता झाली असून रिजवान शब्बीर खान (वय-२८, रा. नई जिंदगी), साहिल सिकंदर पिरजादे (वय २५, रा.मंत्री चंडक नगर) या दोन मुख्य आरोपींना अटक केली आहे. दोन्ही आरोपींना दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले. दोघांनाही चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. इतर आरोपींची नावे अफजल मुर्शद (रा. मुस्लीम कब्रस्तान जवळ, सोलापूर) आणि साहिल सिकंदर पिरजादे याची पत्नी कायनात साहील पिरजादे ऊर्फ कायनात साहिल खान ( वय-३०, मुळ पत्ता- रुम नं.- ३८४, जनता सेवक सोसायटी, एल.जे. रोड माहीम (पश्चिम), मुंबई, सध्या रा. फ्लॅट नं. ४०६ अल्तमश अपार्टमेंट मंत्रीचंडक नगर, सोलापूर) अशी असून आरोपी अफजल मुर्षद हा फरार झाला आहे.



मंगळवारी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास, व्हीआयपी रोडवरील संगमेश्वर कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका संशयास्पद कारमध्ये अंमली पदार्थ असल्याची गोपनीय माहिती पोलीस शिपाई भारत पाटील यांना मिळाली.होती. पोलिसांनी मोदी कब्रस्तान ते संगमेश्वर कॉलेज या मार्गावर मॉर्निंग वॉक करत असल्याचे भासविले. त्यांना अपेक्षित असलेली कार थांबलेली दिसली अन् त्या वॉकिंग करणाऱ्या सपोनि दत्तात्रय काळे व त्यांच्या पथकाने कारला घेराव घातला. कारची तपासणी केली असता चालकाच्या सीट शेजारील ड्रॉव्हरमध्ये एका प्लास्टिक पिशवीत पांढऱ्या रंगाचे स्फटीक सापडले. तपासणीअंती ते अमली पदार्थ असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी या कारवाईत १ कोटी ९० लाख रुपये किमतीचे ९५० ग्रॅम मेफेड्रोन व १० लाख रुपये किमतीची मोटार कार जप्त केली आहे.

# अतिक्रमण कारवाई अंतर्गत बेवारस दोन रिक्षा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सो२लापूर, दि. १२ मे-**

शहरातील फॉरेस्ट आणि राजेंद्र चौक परिसरात महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने आज कारवाई केली. यामध्ये बेवारस दोन रिक्षा जप्त करण्यात आल्या तर चार चाकी तीन हात गाड्या जागेवरच निष्काशीत केल्या. बेवारस रिक्षा जप्त करण्याची कारवाई महापालिकेकडून पहिल्यांदाच केली आहे.

सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच सार्वजनिक ठिकाणी अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्याची कारवाई महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने नियमितपणे करण्यात येत आहे. त्याचबरोबर रस्त्यावरील बेवारस वाहनेही जप्त करण्याची मोहीम सुरू केली आहे. आज महापालिकेच्या पथकाने फॉरेस्ट येथील मच्छी मार्केट जवळील बेवारस एक रिक्षा जप्त केली. तेथील चार चाकी तीन हात गाड्या जागेवर निष्कासित केल्या. खोके जागेवर निष्कासित केले. त्यानंतर राजेंद्र चौकातील बेवारस एक रिक्षा जप्त केली. बेवारस रिक्षा जप्त करण्याची कारवाई महापालिकेकडून पहिल्यांदाच होत आहे.

पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही कारवाई करण्यात आली. शहरात अतिक्रमण आढळून आल्यास कारवाई करण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी महापालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

# 'होर्मुज'च्या धगीत सरकारच्या 'मायेची सावली'

**स्ट्रेट ऑफ होर्मुज बंद झाल्यामुळे देशाच्या सरकारला दररोज १००० कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत आहे. मोदी सरकारच्या दूरदृष्टीमुळे सर्व घरांमध्ये चुली पेटत राहिल्या आणि वाहने धावत राहिली. परिस्थिती पाहता ऊर्जा संकट वाढण्याची शक्यता आहे. जनतेची समज आणि सहकार्यच सरकारला या संकटाशी लढण्याचे बळ देईल.**



घर-कुटुंब असो वा कोणताही देश, आकस्मिक आपत्ती कोणावरही आणि कधीही येऊ शकते. गेल्या काही दिवसांत इराण आणि अमेरिका यांच्यातील युध्दामुळे 'होर्मुज'ची सामुद्रधुनी (Strait of Hormuz) बंद झाली, ज्यामुळे जहाजांची ये-जा थांबली. युध्दाच्या सुरुवातीच्या काळात असे वाटले होते की, तेल आणि वायूच्या टंचाईमुळे सर्वत्र हाहाकार माजेल, परंतु भारतात तसे झाले नाही. सर्व घरांमध्ये चुली पेटत राहिल्या, वाहने चालत राहिली आणि मुलांचे शिक्षणही सुव्यवस्थितपणे सुरु राहिले. हे सर्व केवळ म्हणूनच शक्य झाले कारण आपला कुटुंबप्रमुख, आपला रक्षक जबाबदार आणि दूरदर्शी आहे.

केंद्र सरकारने कुशल नेतृत्वाखाली या संकटाच्या काळात आपल्या बुध्दिमत्तेचा परिचय देत वाढत्या किंमतींचे ओझे स्वतःवरच मर्यादित ठेवले आणि जनतेला त्या त्रासाची झळ पोहचू दिली नाही. वास्तविकता अशी आहे की, आपल्या तेल कंपन्यांना दररोज १,००० कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. थोडक्यात सांगायचे तर, या युध्दामुळे सरकारला ६८,००० कोटी रुपयांचे प्रचंड नुकसान झाले आहे. युध्दाचा भार आपल्या तेल साठ्यांवरही पडत असून, त्यांची पातळी सतत खाली जात आहे आणि ती टिकवून ठेवण्यासाठी गुंतवणुकीची आवश्यकता भासत आहे. या सर्वांचा परिणाम सरकारच्या केंद्रीय उत्पादन शुल्कावरही (Central Excise) होत आहे. म्हणजेच तीन वेगवेगळ्या दिशांनी भारताला आर्थिक फटका बसत आहे.

**नागरी कर्तव्य आणि सरकारी संवेदनशीलता :** मोठ्या नुकसानीमुळे खालावणारी अर्थव्यवस्था वेळेत सुधारणे आवश्यक आहे आणि त्यासाठी सरकारसोबतच प्रत्येक नागरिकाने आपले उत्तरदायित्व समजून घेणे गरजेचे आहे. अशा कठीण काळात, जेव्हा आर्थिक झळ प्रत्येक घरापर्यंत पोहोचली असती आणि वाहने उभी राहण्याची वेळ आली असती, तेव्हा कोणत्याही सरकारसाठी हा आर्थिक भार जनतेवर टाकून मोकळे होणे सोपे होते. परंतु, संवेदनशील केंद्र सरकारने केवळ जनतेला दिलासाच दिला नाही, तर आपल्या धोरणात्मक कौशल्याने जनतेला अशी छत्रछाया दिली, ज्यामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत होण्यापासून वाचले. युध्द न थांबल्यामुळे जागतिक ऊर्जा संकट सतत वाढत आहे आणि होर्मुजचा मार्ग मोकळा होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भविष्यात युध्दविराम झाला तरी परिस्थिती सावरण्यासाठी किमान चार महिने लागतील, ज्यामुळे तेल आणि वायूचे दर दीर्घकाळ उच्च पातळीवर राहू शकतात. परंतु युध्दाच्या या अकराव्या आठवड्यात सरकारने अवलंबलेले सध्याचे मॉडेल जर पुढे नेले, तर त्याचे विपरित परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होऊ लागतील.

**आपल्यासमोर असलेली तीन मोठी आव्हाने :** या परिस्थितीत आपल्यासमोर प्रामुख्याने तीन आव्हाने आहेत. तेल साठा (Strategic Reserves) भारताचा तेल साठा आज ५.३३ दशलक्ष टन आहे, जो सुमारे दोन आठवड्यांची गरज पूर्ण करू शकतो. आयईए (IE) मानक ९० दिवसांचे आहे. चंडीखोल, पादुर आणि बिकानेरमध्ये ६.५ दशलक्ष टनांचा दुसरा टप्पा बांधकामाधीन आहे, जो जलद गतीने पूर्ण करावा लागेल. तसेच, जपान आणि दक्षिण कोरियानंतर भारत हा ३० दिवसांच्या एलपीजी (LPG) साठ्याची योजना आखणारा एकमेव देश आहे. रिफायनिंग आणि घरगुती उत्पादनः आपल्याला आपली रिफायनिंग क्षमता वाढवावी लागेल. यासाठी आधीच पावले उचलली गेली आहेत. नुमालीगड, जिथे ३४,००० कोटी रुपये खर्चून ३ ते ९ एमएमटीपीए (MMTP) विस्तार होत आहे, तो वेळेपूर्वी कार्यान्वित करावा लागेल. बाडमेरचा प्लांट आता सुरू झाला आहे. तसेच घरगुती कच्च्या तेलाचे उत्पादन, जे आज मागणीच्या केवळ १२ टक्के आहे, ते वाढवावे लागेल.

**इथेनॉल ब्लेंडिंग :** आज २० टक्के इथेनॉल मिश्रण करून देश १.५ लाख कोटींहून अधिक परकीय चलन वाचवू शकत आहे. या कठीण काळात पर्यायी इंधनाद्वारे एलपीजीची मागणी दररोज ७० ते ७५ हजार टनांनी कमी केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, हे केवळ पीएनजी (PNG), रॉकेल, इंधन तेल आणि बायोगॅसची पर्यायी व्यवस्था संकट येण्यापूर्वीच तयार असल्याने शक्य झाले आहे.

**निष्कर्ष :** या क्षेत्रातील संशोधकांचे असे मानणे आहे की, आजच्या तुलनेत येणारा काळ अधिक कठीण असेल. तेव्हा आपल्याला या संकटकाळात केलेल्या खर्चातून सावरण्यासोबतच भविष्यात आपल्याला बळकटी देणाऱ्या योजनांमध्ये गुंतवणूकही करावी लागेल. जागतिक संकटाच्या या काळात जेव्हा जवळपास सर्वच देशांत पेट्रोलचे दर वाढले, श्रीलंका आणि पाकिस्तानमध्ये चार दिवसांचा कामाचा आठवडा करण्यात आला, फिलिपिन्समध्ये राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी लागू करण्यात आली, तेव्हा भारतात जनजीवन सामान्य राहिले. भारतात ना इंधनाचे रेशनिंग झाले, ना 'वर्क फ्रॉम होम'ची सक्ती झाली, ना शाळा बंद झाल्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पेट्रोलचे दरही वाढले नाहीत. हे करून दाखवणे सोपे नव्हते, परंतु आपल्या पंतप्रधानांच्या कुशल नेतृत्वाखाली वर्तमान सरकारने शिवाप्रमाणे युद्धाचे सर्व विष (Jab) स्वतः प्राशन केले. आपल्या नागरिकांनाही हे समजून घ्यावे लागेल की ही सुखाची स्थिती कायम राहणार नाही.

बदलत्या काळानुसार आपल्याला आपली कार्यपद्धती बदलावी लागेल. जनतेचे सहकार्य आणि समज हीच ती किल्ली आहे जी आपल्याला येणाऱ्या संकटांशी लढण्याचे बळ देईल.

# ऊर्जा संकटात सरकार बनले ढाल

होर्मुज मार्ग बंद झाल्यामुळे जग ऊर्जा संकटाच्या आगीत होरपळत आहे. मोदी सरकारने आपल्या चातुर्याने या संकटाची झळ जनतेपर्यंत पोहोचू दिली नाही, स्वतः भार उचलला. भारतात सर्व कामे नेहमीप्रमाणे सुरळीत पार पडली. जनतेलाही संयम राखून देशाची साथ द्यावी लागेल. जागतिक युद्ध आणि होर्मुज संकटाचा परिणाम आज संपूर्ण जग अनुभवत आहे.



युध्दाच्या झळा केवळ सीमेपुरत्या मर्यादित नाहीत, तर त्यांचा परिणाम प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरापर्यंत, प्रत्येक वाहनाच्या चाकापर्यंत आणि प्रत्येक कुटुंबाच्या बजेटपर्यंत पोहोचला आहे. अनेक देशांमध्ये पेट्रोल-डिझेलच्या किमती इतिहासातील सर्वोच्च पातळीवर पोहोचल्या आहेत, पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागल्या आहेत, महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे आणि सरकारे आपल्या नागरिकांच्या रोषाला सामोरे जाण्यास भाग पडली आहेत.

परंतु याच उलथापालथीच्या दरम्यान, आज युध्द सुरू होऊन साधारण ११ आठवडे उलटल्यानंतरही भारतात जीवनाची गती सामान्य राहिली, करोडो कुटुंबांच्या चुली पेटत राहिल्या, वाहने चालत राहिली. हे आपोआप घडले नाही. यामागे असे एक धोरण, अशी तयारी आणि असा संवेदनशील विचार होता ज्याने जागतिक वादळासमोर भारतीय नागरिकांना ढालीप्रमाणे संरक्षण दिले. जेव्हा जग ऊर्जा संकटाच्या आगीत होरपळत होते, तेव्हा मोदी सरकार एका पालकाप्रमाणे आपल्या नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. ज्याप्रमाणे द्वापर युगात भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलून ब्रजवासीयांचे रक्षण केले होते, त्याचप्रमाणे या कठीण काळात सरकारने वाढत्या जागतिक किमतींचा आणि आर्थिक दबावाचा मोठा हिस्सा स्वतःवर घेतला, जेणेकरून त्याचा भार थेट जनतेच्या ताटापर्यंत, स्वयंपाकघरापर्यंत आणि खिशापर्यंत पोहोचू नये.

हेच कारण आहे की आज हे संकट केवळ आर्थिक व्यवस्थापनाची कथा राहिलेली नाही, तर संवेदनशील शासन, दूरदर्शी नेतृत्व आणि नागरिकांप्रती असलेल्या जबाबदारीचे उदाहरण बनले आहे. जगभरातील वाढत्या किमतींचे ओझे थेट जनतेवर टाकणे हा सर्वात सोपा मार्ग होता आणि अनेक देशांनी तसेच केले, परंतु भारताने हा मार्ग निवडला नाही. मोदी सरकारने स्वतः प्रचंड आर्थिक दबाव सोसला जेणेकरुन सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरावर आणि दैनंदिन जीवनावर कमीत कमी परिणाम व्हावा. सरकारने पेट्रोलवर साधारण २४ रुपये प्रति लिटर आणि डिझेलवर ३० रुपये प्रति लिटर इतका भार सहन केला. २८ फेब्रुवारीनंतर जागतिक स्तरावर पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत प्रचंड वाढ नोंदवली गेली. युरोप आणि आशियातील अनेक देशांमध्ये पेट्रोल ३० ते ३५ टक्क्यांनी महाग झाले, तर भारतात कोणताही बदल केला गेला नाही. हाँगकाँगमध्ये आज पेट्रोल सर्वात महाग आहे. तिथे एका लिटरची किंमत सुमारे २९५ रुपयांवर पोहोचली आहे, जी २८ फेब्रुवारीनंतर २५ टक्क्यांनी वाढली आहे. सिंगापूरमध्ये दर ३० टक्क्यांनी वाढून सुमारे २४० रुपये प्रति लिटर झाला आहे. नेदरलँड्समध्ये पेट्रोल २२५ रुपये प्रति लिटरवर पोहोचले आहे, जी २८ टक्क्यांची वाढ आहे. युध्दग्रस्त इस्रायलमध्ये पेट्रोल ३० टक्क्यांनी महाग होऊन १८५ रुपये प्रति लिटरवर पोहोचले आहे. दुसरीकडे, भारतात अजूनही पेट्रोलची किंमत ९५ रुपये प्रति लिटर आहे.

दररोज सुमारे १,००० कोटी रुपयांचा तोटा सहन करणे ही साधी गोष्ट नाही. आतापर्यंत सुमारे ६८,००० कोटी रुपयांचा भार सरकार आणि तेल कंपन्यांनी स्वतःवर घेतला आहे. हा आकडा त्या संवेदनशील विचाराचा पुरावा आहे, ज्यामध्ये मोदी सरकारने आधी नागरिकांची काळजी केली आणि नंतर स्वतःच्या तिजोरीची. विचार करा, जर हे संकट कोणत्याही तयारीशिवाय आले असते तर काय परिस्थिती झाली असती? स्वयंपाकाचा गॅस महाग झाला असता, वाहतूक खर्च वाढला असता, महागाई प्रत्येक घरापर्यंत पोहोचली असती आणि मध्यम वर्गापासून गरिबांपर्यंत सर्वांचेच बजेट कोलमडले असते.

परंतु २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर परिस्थिती बदलू लागली. गेल्या काही वर्षांत ऊर्जा सुरक्षेबाबत जी दूरगामी तयारी करण्यात आली, तीच आज देशाची ढाल बनून उभी आहे. तेल साठे तयार करण्यात आले, इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण वाढवण्यात आले, पर्यायी इंधन नेटवर्क विकसित झाले आणि रिफायनिंग क्षमतेचा विस्तार सुरू झाला. पर्यायी इंधनाच्या माध्यमातून एलपीजीची मागणी दररोज ७० ते ७५ हजार टनांनी कमी करण्यात आली. हे केवळ म्हणूनच शक्य झाले कारण पीएनजी, रॉकेल, इंधन तेल आणि बायोमासची पर्यायी पायाभूत सुविधा संकटापूर्वीच तयार होती. जपान आणि दक्षिण कोरियानंतर भारत हा एकमेव असा देश आहे जो ३० दिवसांच्या एलपीजी साठ्याची योजना आखत आहे.

या युध्दामुळे निर्माण झालेल्या संकटावरून हे दिसून येते की, ही आपली आजची गरज आहे. आज भारताकडे ५.३३ दशलक्ष टनाचा धोरणात्मक (Strategic) तेल साठा आहे आणि दुसऱ्या टप्प्यांतर्गत चंडीखोल, पादुर आणि बिकानेरमध्ये अतिरिक्त साठवणूक क्षमता तयार केली जात आहे. ह्या केवळ योजना नसून देशवासियांना भविष्यातील संकटांपासून सुरक्षित ठेवण्याची ही तयारी आहे. इथेनॉल मिश्रणाच्या धोरणानेही या कठीण काळात देशाला मोठा दिलासा दिला आहे. २० टक्के मिश्रणामुळे भारत परकीय चलनाची मोठी बचत करू शकत आहे. संकटाच्या काळात पर्यायी इंधन व्यवस्थेद्वारे एलपीजीच्या मागणीत दररोज ७० ते ७५ हजार टनांपर्यंत घट करण्यात आली. ही पावले दर्शवतात की, सरकारने केवळ आजसाठीच नव्हे, तर येणाऱ्या वर्षांसाठीही सुरक्षेचा मार्ग तयार केला आहे.

युध्द अजूनही सुरूच आहे. येणाऱ्या काळात कठीण निर्णय घ्यावे लागू शकतात. परंतु देशाने हे विसरता कामा नये की, जेव्हा पूर्ण जग दबावाखाली होते, तेव्हा भारत सरकारने आपल्या नागरिकांना एकटे सोडले नाही. सरकारने एका पालकाप्रमाणे आपली जबाबदारी निभावली. सरकारे केवळ योजना आणि घोषणांनी मोठी होत नाहीत, तर कठीण काळात आपल्या लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याने मोठी होतात. जागतिक संकटाच्या काळात भारताने हे करून दाखवले आहे.

हेच कारण आहे की आज देशाचा सामान्य नागरिक केवळ दिलासाच अनुभवत नाहीये, तर त्याच्या मनात हा विश्वासही दृढ झाला आहे की संकट कितीही मोठे असले तरी देश त्याच्या पाठीशी उभा आहे. तरीही, हे संकट अद्याप पूर्णपणे टळलेले नाही. देशातील नागरिकांनीही येणाऱ्या आव्हानांबाबत सजग, संयमित आणि तयार राहावे. ऊर्जा काटकसरीने वापरणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे. जागतिक संकटात ढाल बनलेल्या भारत सरकारला धैर्याने साथ देण्याची गरज आहे.




# आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपातून नवरा व जावेची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**



पत्नी राणी तानाजी चव्हाण हिचा मोटारसायकल विकत घेण्यासाठी व घर बांधण्यासाठी माहेरहुन पैसे आणण्यासाठी तिला त्रास दिला व तिला आत्महत्येस प्रवृत्त केले या आरोपावरुन तिचा पती तानाजी जनार्धन चव्हाण व जाउ रमाबाई शिवाजी चव्हाण दोघे (रा.बैरागवाडी ता.मोहोळ) यांच्याविरुध्द भरण्यात आलेल्या खटल्याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायालयात होऊन न्यायाधिशांनी सबळ पुराव्याअभावी दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

रमेश तानाजी साळुंखे (रा. वाफळे ता. मोहोळ) याने दि. ०१ जुलै २०२० रोजी मोहोळ पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत त्याची बहिण राणी हिचे लग्न आरोपी तानाजी चव्हाण याचेबरोबर सन २०१८ साली झाल्यानंतर नवऱ्याने व जावेने मोटारसायकलसाठी व घर बांधणीसाठी माहेरवरुन पैसे आणण्यासाठी त्याच्या बहिणीला त्रास दिला व त्यामुळे त्याच्या बहिणीने दि. २९ जून २०२० रोजी विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली असा आरोप केला होता. मयत राणी ही विहीरीवर कपडे धुण्यास गेली असताना पाय घसरुन विहीरीत पडली व तिचा अपघाती मृत्यु झाला असे आरोपीपक्षाचे म्हणणे होते. मोहोळ पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या प्रथम खबरीमध्ये राणीचा अपघाती मृत्यु झाला असे नमुद करण्यात आले होते. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. श्रीहरी कुरापाटी, ॲड. किरण गवळी यांनी काम पाहिले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### नशेमध्ये तोल जाऊन पडलेल्या व्यक्तीचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि.१२ मे -**
दारूच्या नशेमध्ये तोल जाऊन पडल्याने जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी पहाटे चार वाजता मृत्यू झाला. नागेश शिवण्णा कंचे (वय ५४ वर्ष , रा. नीलम नगर , एमआयडीसी रोड सोलापूर) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे . तो सात मे रोजी दुपारी राहत्या घरात दारूच्या नशेत तोल जाऊन पडला होता . यात डोक्याला मार लागल्याने त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात मुलगा सिद्धाराम याने त्याच दिवशी दुपारी दाखल केले असता त्याचा आज मंगळवारी पहाटे मृत्यू झाला.

---

### मोदी खाण्यात गळफास घेतलेल्या महिलेचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि.१२ मे -**



घरगुती वादातून गळफास घेतलेल्या एका ३९ वर्षीय महिलेचा उपचार दरम्यान येथील शासकीय रुग्णालयात सोमवारी सायंकाळी पाच वाजता मृत्यू झाला. रजनी श्रीनिवास म्हेत्रे (वय ३९ वर्षे, रा. मोदी खाना, सोलापूर ) असे त्या मयत महिलेचे नाव आहे . त्यांनी ९ मे रोजी रात्री अकरा वाजता राहत्या घरात घरगुती वादातून पत्र्याच्या वासाला ओढणीच्या साह्याने स्वतः गळफास घेतला होता . हा प्रकार निदर्शनास पडताच मुलगा प्रतीक याने आईला गळफास सोडवून उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत मध्यरात्री दाखल केले असता सदर महिलेचा उपचारादरम्यान सोमवारी सायंकाळी पाच वाजता मृत्यू झाला.

---

### मोटारकारला कट का मारलास म्हणून दुचाकी स्वाराला मारहाण

**सोलापूर, दि.१२ मे -**



मोटार कारला कट का मारलास असे म्हणून एका दुचाकी स्वराला तीन चार अज्ञात लोकांनी लाथाबुक्क्यनी मारहाण केल्याची घटना एसटी स्टँड समोरील क्रोमा शोरूम समोर घडली. अभिषेक धर्मराज कारंडे (वय२६ वर्ष, रा. यावली, तालुका मोहोळ) असे त्या मारहाण झालेल्या दुचाकी स्वाराचे नाव असून तो पाच मे रोजी दुपारी सोलापूर येथील एसटी स्टँड समोरून दुचाकी वरून निघाला असताना क्रोमा शोरूम जवळ बाजूने जाणाऱ्या कारला दुचाकीचा कट लागला .तेव्हा कार मधील अज्ञात लोकांनी त्याला गाडीला कट का मारला असे म्हणून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली . यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्याला मोहोळ येथील खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात भाऊ शिवलिंग याने सोम वारी दुपारी दाखल केले.

---

### मागील भांडणावरून तरुणाला कड्याने व लाथा बुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि.१२ मे -**



मागील भांडणाचा राग मनातून एका तरुणाला लोखंडी कडा व लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना रेल्वे लाईन येथील स्वराज्य वाशिंग सेंटर समोर सोमवारी रात्री नऊ वाजता घडली. आदित्य चंद्रकांत जाधव (वय १९ वर्ष, रा. १७० रेल्वे लाईन , सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून तो सोमवारी रात्री स्वराज वाशिंग सेंटर येथे असताना त्याला साहिल अडकूल ,स्वप्निल अडकूल व इतर दोघांनी मिळून कडा व लाथा बुक्क्याने मारहाण केली .यात चेहऱ्याला जखम झाल्याने त्याला उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयाचा नातेवाईक मोनालिसा फर्नांडिस यांनी रात्री दाखल केले.

---

### रामवाडी येथे एकाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि.१२ मे -**



अज्ञात कारणावरून एका ३९ वर्षीय इसमाने राहत्या घरात ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रामवाडी येथे सोमवार रोजी सायंकाळी सात वाजता उघडकीस आली. राहुल मल्लिनाथ गायकवाड (वय-३९, रा.रामवाडी, सोलापूर) असे त्या गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी राहुल यांनी घरामध्ये अँगलला गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले. ही खबर सलगर वस्ती पोलिसांना समजली असता पोलीस नाईक एस.आर.चौधरी यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात शव विच्छेदनासाठी रात्री दाखल केला.

# समायोजन, ई-केवायसी आणि शालार्थ प्रक्रियेवर ओढले ताशेरे

- जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा कारवाईचा कडक इशारा
- अन्यथा मे महिन्याचे वेतन अडकणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मे -**
जिल्हा परिषद शिक्षण विभागाने माहे मे २०२६ च्या वेतन प्रक्रियेसंदर्भात यंदा अत्यंत कडक भूमिका घेतली असून, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, ई-केवायसी, शालार्थ प्रणालीतील नोंदी आणि सेवा अभिलेखांचे डिजिटलायझेशन या बाबींमध्ये कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट संकेत प्रशासनाने दिले आहेत. नियमांचे पालन न करणाऱ्या शाळा आणि कर्मचाऱ्यांचे वेतन थांबण्याची शक्यता निर्माण झाली. शिक्षण विभागाच्या नव्या आदेशामुळे जिल्हाभरातील शाळांमध्ये खळबळ उडाली आहे.

वित्त विभागाच्या शासन परिपत्रकाच्या पार्श्वभूमीवर वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाने सर्व मुख्याध्यापकांना सविस्तर सूचना जारी केल्या आहेत. शालार्थ प्रणालीमध्ये तयार करण्यात आलेले माहे मे २०२६ चे नियमित वेतन देयक आवश्यक कागदपत्रांसह दि. १५ मे ते १८ मे दरम्यान सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दि. २० मेपर्यंत डी. डी. ओ-२ स्तरावर आलेली देयके ऑनलाईन



कन्सोलिडेट केली जाणार आहेत.

यंदाच्या प्रक्रियेत सर्वाधिक भर अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनावर देण्यात आला आहे. केवळ समायोजन आदेश निघाला म्हणजे प्रक्रिया पूर्ण झाली असे मानले जाणार नाही, तर संबंधित शिक्षकांची समायोजित शाळेमध्ये प्रत्यक्ष पोस्ट मॅपिंग, अटॅच-डिटॅच प्रक्रिया आणि शालार्थमधील नोंदी पूर्ण झाल्यानंतरच वेतन मंजूर केले जाणार आहे. त्यामुळे अनेक अतिरिक्त शिक्षकांचे वेतन आता या प्रक्रियेवरच अवलंबून राहणार आहे.

शिक्षण विभागाने स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, समायोजित शिक्षकांनी संबंधित शाळेत नियमानुसार रुजू होऊन सर्व प्रक्रिया पूर्ण केली नाही, तर त्यांचे वेतन काढता येणार नाही. त्यामुळे मूळ शाळा आणि समायोजित शाळांमध्ये आता कागदपत्रांची धावपळ सुरू झाली आहे. रुजू अहवाल, कार्यमुक्ती प्रमाणपत्र, शिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश आणि शेवटचे वेतन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे.

दुसरीकडे, ई-केवायसीचा मुद्दाही यंदा शिक्षण विभागाने गंभीरतेने घेतला आहे. शालार्थ प्रणालीतून वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी बँकेत जाऊन ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक करण्यात आले आहे. ज्या शिक्षकांची ई-केवायसी पूर्ण झालेली नाही, त्यांच्या वेतन प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे जून २०२६ च्या वेतनापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे आता सर्वांसाठी अनिवार्य झाले आहे.

डिजीटल सेवा पुस्तक अपूर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांनाही प्रशासनाने लक्ष्य केले आहे. ज्या शिक्षकांच्या सेवा नोंदी अपलोड झालेल्या नाहीत किंवा नाकारलेल्या आहेत, त्यांनी तातडीने कागदपत्रे अपलोड करून मंजुरी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा वेतन प्रक्रियेत अडचणी आल्यास त्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांवर राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### नियमबाह्य वेतनप्रक्रियेला बसणार आळा

शिक्षण विभागाच्या या कठोर भूमिकेमुळे जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये प्रशासनाविरोधात नाराजीचा सूर उमटत असला, तरी नियमबाह्य वेतनप्रक्रियेला आळा घालण्यासाठी ही मोहीम राबवली जात असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. दरम्यान, समायोजन, ई-केवायसी आणि शालार्थ प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी आता शिक्षक आणि मुख्याध्यापकांची धावपळ वाढली असून, आगामी काही दिवस शिक्षण विभागासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

### मंजूर पदांपेक्षा जास्त पदांचे वेतन नाही

प्रभारी मुख्याध्यापक असलेल्या शाळांनी स्वाक्षरी अधिकार पत्र जोडणे बंधनकारक करण्यात आले असून, मुदत संपलेल्या अधिकारावर कोणतेही देयक स्वीकारले जाणार नाही. तसेच मंजूर पदांपेक्षा जास्त पदांचे वेतन किंवा थकीत देयके अदा केली जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# माजी खासदार गंगाधर कुचन यांचे निधन



- ‘अश्विनी’ ला करण्यात आले देहदान
- मृत्युपश्चातही लोकांच्या सेवार्थ देह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मे-**
सोलापूरचे माजी खासदार, विणकररत्न गंगाधरपंत सिद्रामप्पा कुचन यांचे मंगळवार, दि.१२ मे २०२६ रोजी पहाटे ५ वाजता हृदयविकाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ९२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

पद्मनगर येथील निवासस्थानी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. हयात असताना त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार कुंभारी येथील अश्विनी हॉस्पीटलला देहदान करण्यात आले. लोकांच्या सेवेसाठी जीवन अर्पण केलेले गंगाधरपंत कुचन यांचे देहदान करण्यात आल्याने मृत्युपश्चातही ते जणू लोकांच्या सेवार्थ राहिल्याचे उपस्थितांतून चर्चा करण्यात येत होते.

सोलापूरसह राज्यभरात जवळपास २३ सहकारी सूतगिरण्या उभारणीमध्ये गंगाधरपंत कुचन यांचा सिंहाचा वाटा आहे. १९८० आणि १९८५ या दोन लोकसभा निवडणुकीत सोलापूर लोकसभा मतदारसंघातून ते काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडून आले होते. १९९१ च्या सुरुवातीला त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून भाजपचे तत्कालिन उमेदवार लिंगराज वल्याळ यांच्या विजयासाठी त्यांनी मोठे योगदान दिले होते. १९९५ च्या सुमारास पुन्हा एकदा काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला.

सोलापूर शहर-जिल्ह्यातील विविध पक्षातील राजकारणी कुचन यांचे मार्गदर्शन घेत असत. अश्विनी सहकारी रुग्णालय, श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालयच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. ते राज्य सहकारी बँकेवर अनेक वर्ष संचालक होते. पूर्वभागातील नागरी बँका, पतसंस्था, सूतगिरण्या, हैदराबाद रस्त्यावरील विडी घरकुल, पद्मशाली शिक्षण संस्था उभारणीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.

गेल्या पंधरा वर्षापासून ते सर्व प्रकारच्या सक्रिय राजकारणापासून लांब होते. मात्र घरामध्ये नित्य नियमित वृत्तपत्र वाचन, रेडिओवर बातम्या ऐकणे, विविध क्षेत्रातील माहिती घेणे, सहकार क्षेत्रातील संस्थांमध्ये बैठकांना उपस्थित राहून मार्गदर्शन करण्याचे काम सुरु होते. मंगळवारी त्यांची प्राणज्योत मालवली.

### वस्त्रोद्योगाला चालना देणारा कैवारी हरपला



सोलापूरचे माजी खासदार गंगाधरपंत कुचन यांच्या निधनाविषयी शोक व्यक्त करताना माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सांगितले की, त्यांच्या निधनाची बातमी कळताच अत्यंत दुःख झाले. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत व माझे जिवलग सहकारी होते. वस्त्रोद्योगाला चालना देणारा कैवारी हरपला. सोलापूर लोकसभा मतदारसंघातून दोन वेळा खासदार म्हणून निवडून आले होते. सोलापूर औद्योगिक बँक, नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून सर्व सामान्यांना बँकिंग प्रवाहात आणणारे आणि सोलापूर व यशवंत सहकारी सूत मिलच्या माध्यमातून कापड उद्योगाला चालना देणारे श्री.मार्कंडेय रुग्णालय व अश्विनी सहकारी रुग्णालय यांच्या माध्यमातून गोरगरिबांना वैद्यकीय सेवा मिळवून देणारे, जुना विडी घरकुल प्रकल्प, औद्योगिक वसाहत, एमआयडीसी निर्माण करण्यासाठी प्रयत्न केलेले, पूर्व भागातील विणकर व कामगार वर्गाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी आयुष्य वेचणारे एक सामान्य कार्यकर्ता ते खासदार पर्यंत प्रवास थक्क करणारे आहे. माझ्या व माझे कुटुंबीयांच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

### अभ्यासू, संयमी, दूरदृष्टी असलेले व्यक्तीमत्व



माजी खासदार गंगाधर कुचन यांच्या निधनाने समाजजीवनातील एक अभ्यासू, संयमी आणि दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व हरपले आहे. पद्मशाली समाजाच्या उन्नतीसाठी, सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी तसेच औद्योगिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. मला लढवय्या म्हणून संबोधत असत-प्रेरणा देत असत. तुझी तगमग आणि तडफ कायम ठेव, असे म्हणत असत. सर्वसामान्य माणसाशी नाळ जोडून काम करणारा नेता म्हणून त्यांची ओळख कायम राहील. मृत्यूनंतर देहदान करण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय हा समाजासाठी प्रेरणादायी आणि मानवतेचा संदेश देणारा आहे, असे माजी आमदार नरसय्या आडम यांनी शोक व्यक्त केला.



# आ. सुभाष देशमुख यांची महापालिका आयुक्तांबरोबर बैठक

## प्रलंबित कामांना गती देण्याच्या प्रशासनाला निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**
आ.सुभाष देशमुख यांनी मंगळवारी सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेत शहरातील विविध प्रलंबित नागरी प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी शहरातील पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, पथदिवे, ड्रेनेज, वाहतूक व्यवस्था तसेच प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

या बैठकीत विशेषतः शहरातील पाणीप्रश्न हा बैठकीचा प्रमुख मुद्दा ठरला. प्रभाग क्र. १९ मधील हिमगिरी नगर, कामाक्षी नगर, अंबिका नगर, ईश्वर नगर व उद्धव नगर या भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने टँकर अथवा बोअरवेलच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरू करण्याच्या सूचना आमदार देशमुख यांनी दिल्या. प्रभाग क्र. २६ मधील रेणुका नगर, प्रियंका नगर, प्रल्हाद नगर, पंचवटी नगर, सृष्टी नगर, रक्षक पार्क व सुभाष नगर येथे पाइपलाइन असूनही नियमित पाणीपुरवठा होत नसल्याचा मुद्दाही त्यांनी निदर्शनास आणून दिला.

हँडओव्हर न झालेल्या जुन्या सोसायट्यांमध्ये पथदिव्यांची व्यवस्था करणे, गॅस व ड्रेनेज पाइपलाइन खोदकामामुळे खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे, मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर स्पीड ब्रेकर बसविणे तसेच झोन कार्यालयांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी सूचना दिल्या. याशिवाय रेन वॉटर हार्वेस्टिंग’ संदर्भात जनजागृती अभियान राबविणे, मुख्य नगरांकडे जाणार्या मार्गांवर दिशादर्शक फलक बसविणे, कल्याणनगर येथील स्टॉर्म वॉटर लाईनचे प्रलंबित काम सुरू करणे, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करणे तसेच नाला क्र. १३-अ व १४ येथील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबतही चर्चा झाली.

आसरा ब्रिजचे सीमांकन, नाट्यगृह प्रस्ताव, एनटीपीसी निधीअंतर्गत मंजूर कामे तसेच डी-मार्ट ते विजापूर रोड आणि डी-मार्ट ते कुमठे रस्ता परिसरातील प्रलंबित कामांना गती देण्याच्या सूचनाही आमदार देशमुख यांनी यावेळी दिल्या. शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी बैठकीत दिले.

हद्दवाढ भागात अद्यापही रात्री-अपरात्री पाणीपुरवठा होत आहे. तोही कमी दाबाने होत आहे. याबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. रात्री पाणी आल्याने लोकांना त्रास होत आहे. अधिकार्यांनी अशा भागाची पहाणी करावी आणि पुढील वेळीस या भागात सकाळी पाणीपुरवठा करावा, असे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिला.

# महामार्ग प्रकल्पांचे ‘शिल्पकार’ ना. गडकरी उद्या सोलापुरात

- हजारो कोटींच्या कामांचा होणार शुभारंभ
- जिल्ह्यात विकासाची नवी पहाट उगवणार
- महामार्गांच्या जाळ्याने जिल्ह्याला मिळणार नवी दिशा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे -**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा गुरूवारी, १४ मे रोजी होणारा सोलापूर दौरा हा केवळ राजकीय कार्यक्रम नसून जिल्ह्याच्या विकासाला रोडमॅप ठरणार असल्याची चर्चा सुरू आहे. राज्यातील महत्त्वाच्या महामार्ग प्रकल्पांचे ‘शिल्पकार’ म्हणून ओळख असलेल्या ना. गडकरी यांच्या हस्ते हजारो कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांचे भूमिपूजन होणार असल्याने सोलापूर जिल्ह्याला विकासाची नवी दिशा मिळणार आहे.

संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या विकासकामांना चालना मिळणार असून, नाशिक-पंढरपूर आणि पंढरपूर-फलटण मार्गांचीही पाहणी गडकरी करणार आहेत. यावेळी स्थानिक प्रतिनिधी, अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रलंबित कामांबाबत माहिती घेणार असल्याचे सांगितले जाते. या विकासामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेलाही हातभार लागणार आहे. सुरत-चेन्नई महामार्ग हा सोलापूर जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प ठरत असून, तब्बल १५ हजार कोटी रुपयांच्या या महामार्गामुळे महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि दक्षिण भारतातील राज्यांमध्ये संपर्क अधिक गतिमान होणार आहे. मालवाहतूक, औद्योगिक गुंतवणूक आणि व्यापारासाठी हा महामार्ग ‘गेम चेंजर’ मानला जात आहे.



### अक्कलकोट-वागदरी रस्त्यासाठी ३५३ कोटी

अक्कलकोट ते वागदरी या मार्गाच्या दुपदरीकरणासाठी ३५३ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. सीमाभागातील हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. रुंदीकरणामुळे अपघातांचे प्रमाण कमी होऊन वाहतुकीची अधिक गतीने होणार आहे. ग्रीनफिल्ड महामार्गामुळे जिल्ह्याच्या विकासाला वेग येणार असल्याचे चित्र असून गडकरी यांच्या दौऱ्यामुळे सोलापूर जिल्हा राज्यातील महत्त्वाचे लॉजिस्टिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून पुढे येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### अक्कलकोटमध्ये होणार महामार्ग प्रकल्पाचे भूमिपूजन

दुपारी बारा वाजता अक्कलकोट येथे आयोजित कार्यक्रमात केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते चार महत्त्वाच्या महामार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन होणार आहे. या प्रकल्पांमुळे सोलापूर जिल्ह्याचे राज्यातील प्रमुख दळणवळण केंद्र म्हणून महत्त्व वाढणार असल्याचे मानले जात आहे.

### मोहोळ-वळसंग महामार्गाला गती

मोहोळ-वळसंग या ७१ किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे भूमिपूजनही गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. सुमारे ७५० कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे परिसरातील वाहतूक कोंडी कमी होणार असून रस्त्यामुळे शेतीमाल वाहतूक, उद्योग व्यवसाय आणि ग्रामीण भागातील संपर्क अधिक सुलभ होणार आहे.

# कायमस्वरूपी पाणी टंचाई टाळण्यासाठी भीमानदीवर बॅरेजेस बांधण्यात यावेत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१२ मे -**
भविष्यातील कायमस्वरूपी पाणी टंचाई टाळण्यासाठी भीमानदीवर बॅरेजेस बांधण्यात यावेत अशी मागणी सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांनी केली आहे.

उजनी धरणाच्या पाणीवाटप धोरणाप्रमाणे सद्या कालव्यातून पाणी सोडण्यात येत आहे. या प्रक्रियेत भिमानदीतून शेती सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत नाही. केवळ शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी पाणी सोडून त्या काळात वीज पुरवठा खंडित करण्याची पद्धत सुरु झाली आहे.

उजनी धरणाच्या निर्मितीवेळी विस्थापित बहुतांश धरणग्रस्ताचे पंढरपूर तालुक्यात पुनर्वसन करण्यात आले आहे. तालुक्यातील नदीकाठच्या बहुतेक शेतकऱ्यांच्या जमिनीचे वाटप धरणग्रस्तांना करण्यात आले आहे. त्यामुळे धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भिमानदीतून पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे.

नदीकाठच्या शेतकऱ्यांनी नदीवर पाणी परवाने काढून लाखो रुपये खर्चून दूरवर पाईप लाईन करून सिंचन व्यवस्था केली आहे. मात्र भिमानदीतून सिंचनासाठी कायमस्वरुपी पाणी सोडण्याऐवजी केवळ सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी उजनीतून पाणी सोडण्यात येते. त्याकाळात शेतीपंपाचा वीजपुरवठा बंद करण्यात येतो.

नदीकाठच्या गावातील बहुतेक ठिकाणी शेतीला पाणीपुरवठा करणारे कॅनल मोडण्यात आले आहेत. काही ठिकाणी त्याचा मागमोसही शिल्लक नाही. शेतकऱ्यांना सिंचनासाठी भिमानदी शिवाय कोणताही पर्याय उपलब्ध नाही, असेही त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी : १४३९

**बैल तेथें करबाडें। हें न चुके गा फुडें।**
**नेइजो कां वऱ्हाडे। समर्थाचेनि।।**

सत्वगुण हा अत्यंत चांगला गुण असला तरीही, अनेक माणसांकडे रजोगुणाने वास्तव्य केलेले आपणाला पाहायला मिळते. ज्यांच्याकडे रजोगुणाचे साम्राज्य असते, त्यांच्याकडे विषय भोगाला प्राधान्य असते. पसरलेली वाहुटळ जमिनीवरच्या चांगल्या वाईट पदार्थांना एकत्र करते. त्या प्रमाणे रजोगुणामुळे इद्रियांना चांगले वाईट विषय भोगण्यास मोकळीक मिळालेली असते. मांस भक्ष्यन, मदय प्राशन, परस्त्री, परपुरुष गमन, अशा प्रकारचा प्रसंग समोर आला तर रजोगुणी हे शास्त्रविरुध्द आहे, असे न म्हणता शेळी जसे समोर येइल ते खाते, तसे रजोगुणी आपल्या इंद्रियांना समोर येईल त्या विषयाचा उपभोग घेऊ देतो. अवघडातले अवघड छंद पूर्ण करण्याचे रजोगुणी व्यक्ती ठरवित असतो. सुदैवाने एखादा अवघड छंद लोकोपयोगी असेल तर, ते मी केले म्हणून मिरविण्यात रजोगुणीला आनंदच वाटतो. समुद्रात कितीही नदया येऊन सामावल्या तरी समुद्र पुरे झाले असे म्हणत नाही. अग्नीमध्ये कितीही लाकूड घातला, तरी अग्नीचे पोट भरत नाही. अगदी त्याप्रमाणे रजोगुणी व्यक्तिने कितीही विषयभोग घेतला तरी, आता विषय भोगणे पुरे झाले, असे तो कधीच म्हणत नाही. त्याच्या इंद्रियांच्या इच्छा सदैव अपु-याच असतात. याचे मन अतिशय चंचल असते ते कधीही स्थिर होत नाही. सतत ते विषयाच्या मागे धावतच राहते. एखादा भिकारी राजवाडयात राहिला म्हणून तो राजा होत नाही. तसे बाहेरुन सुंदर दिसणा-या पेहरावात, शरीरात रजोगुण राहिला म्हणून तो व्यक्ति सत्वगुणी होत नाही. रजोगुणी वृत्ती जो जोपासतो त्यांच्या वाटयाला दु:खाशिवाय कांही येत नाही. हे सांगतांना माउली म्हणतात, **बैल तेथें करबाडें। हें न चुके गा फुडे । नेइजो कां वऱ्हाडे। समर्थाचेनि ।।**



अर्थात, बैल म्हटले की तेथे कडबा हा आलाच ! बैल जरी श्रीमंताच्या वऱ्हाडाला जुंपला गेला तरी, त्याच्या नशिबाला लाडू पक्वाने मिळत नसतात. त्याच्या नशिबी कडबा हा ठरलेलाच आहे. अगदी त्या प्रमाणे, रजोगुण हा कितीही चांगल्या व्यक्तिच्या ठिकाणी गेला तरी तो चांगले फळ देत नाही. अर्थात तो आपली वृत्ती न बदलता विषयातच रंगतो. विषयभोगातच आनंद मानणारे, विषयभोगासाठी सातत्याने विषयांचा शोध घेणारे रजोंगुणीचे मन कधीही स्थिर राहत नसल्याने आत्मानंद नांवाचा प्रकार त्याच्या वाटयालाही येत नाही .विषय सुखात जे सुख मिळते, त्यापेक्षा दुसरे सुख असूच शकत नाही, असा याचा भ्रम असतो. रजोगुणी माणूस विषयभोंगात एवढा अडकला जातो की त्यातून बाहेर पडणे त्यासाठी अवघड होऊन बसलेले असते. रजोगुणातून बाहेर पडता येत नाही, असे मात्र नाही. पण रजोगुणी माणसाची इच्छाच त्यातून बाहेर पडण्याची नसते, त्यामुळे त्याला बाहेर काढणे अवघड असते. रजोगुणीनी जर बाहेर पडण्याची मानसिक तयारी ठेवली तर, त्यातून बाहेर पडणे कांही अवघड बाब नाही. माउलींचे मार्गदर्शन व ज्ञानेश्वरीचा सहवास लाभल्याने रजोगुणींना त्यातून सहज बाहेर पडता येइल. असे बाहेर पडून सत्वगुणांना स्विकारणे, हे केवळ त्या व्यक्तिसाठीच लाभदायक आहे असे नाही तर त्याच्याबरोबर इतरांसाठीही ते लाभदायक आहे. माउली सेवक असल्याने व माउलींच्या मार्गदर्शनावर चालणारे असल्याने आपण रजोगुणी निश्चितच नाहीत. आपल्यात भविष्यातही रजोगुण बळावणार नाहीत, असा आत्मविश्वास आपण बाळगू या.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद

# जिल्हा परिषदेत सोमवारी 'नो व्हेईकल डे'

### इंधन बचत आणि पर्यावरण संरक्षणासाठी लागणार वाहनांना ब्रेक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

वाढते वायू प्रदूषण, जागतिक तापमानवाढ आणि सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंधन बचतीचा संदेश देत जिल्हा परिषद सोलापूरने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्हा परिषदेमध्ये दर सोमवारी 'नो व्हेईकल डे' राबविण्यात येणार असल्याची घोषणा जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी केली आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेमधील पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रत्येक सोमवारी खासगी दुचाकी, चारचाकी तसेच शासकीय वाहनांचा वापर टाळायचा आहे. त्याऐवजी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, बस, सायकल, इलेक्ट्रिक वाहन किंवा पायी कार्यालयात येण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सध्याच्या युध्दजन्य परिस्थितीमुळे पेट्रोल, डिझेल आणि इंधनाचा काटकसरीने वापर करणे आवश्यक बनले आहे. त्याचबरोबर वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचेही जिल्हा परिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणारा हा उपक्रम केवळ इंधन बचतीपुरता मर्यादित नसून पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा असल्याचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्हा परिषद सोलापूरने हा निर्णय घेतल्याने प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्येही या उपक्रमाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

> जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या 'नो व्हेईकल डे' उपक्रमामुळे इंधन बचतीसोबतच पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश समाजात पोहोचणार आहे. त्यामुळे देशहितासाठी छोटंसं योगदान देऊया असा संदेश देत सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन अध्यक्ष दिपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी केले आहे.

## पालिकेच्या परिवहन समिती निवडीकडे लक्ष; २० मेच्या सभेत होणार फैसला?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

महापालिकेतील गेल्या दोन महिन्यांपासून रखडलेल्या परिवहन समिती सदस्यांच्या निवडीचा तिढा अखेर सुटण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. येत्या २० मे रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत परिवहन समितीच्या सदस्यांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती आहे. पक्षाच्या बैठकीत खूप बोर्ड काढण्याचे ठरले आहे मात्र याचा अंतिम निर्णय महापौर घेणार आहेत

परिवहन समितीवर वर्णी लावण्यासाठी विविध पक्षांतील इच्छुकांनी जोरदार लॉबिंग सुरू केले आहे. काही नगरसेवकांनी पक्षश्रेष्ठींकडे फिल्डिंग लावत आपली दावेदारी मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. परिवहन समितीमध्ये स्थान मिळवण्यासाठी अनेक इच्छुकांकडून पडद्यामागील हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, भाजपकडून स्वीकृत नगरसेवकाचे एक पद अद्याप रिक्त ठेवण्यात आले आहे. या पदावर कोणाची वर्णी लागणार याबाबतही राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे. पक्षासाठी काम केलेल्या एखाद्या निष्ठावान कार्यकर्त्याला संधी दिली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात असून २० मेच्या सभेतच याबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. महापालिकेतील आगामी राजकीय समीकरणांच्या दृष्टीने परिवहन समितीची निवड आणि स्वीकृत नगरसेवक पदाची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे २० मेची सर्वसाधारण सभा राजकीयदृष्ट्या विशेष चर्चेची ठरणार आहे.

## दीर्घकाळ गैरहजर कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घ्या



**राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांचे निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विभागातील दीर्घकाळ गैरहजर राहिलेल्या कर्मचाऱ्यांवर सहानुभूती दाखवून त्यांना पूर्ववत सेवेत घेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी स्थायी समिती सभापती सौ. रंजिता चाकोते यांना निवेदन दिले. महानगरपालिकेच्या सेवेतून ३० ऑक्टोबर २०२५ रोजी दीर्घकाळ अनुपस्थित राहिल्यामुळे काही कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले होते. या कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याबाबत ८ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णासाहेब बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. त्या बैठकीत संबंधित कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय झाल्याचे चंदनशिवे यांनी नमूद केले आहे. दरम्यान, या यादीतील काही कर्मचारी मयत झाले असून त्यांच्या वारसांना 'लाड कमिटी' अंतर्गत सेवेत सामावून घेण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच आयुक्तांनी केलेल्या कारवाईविरोधात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५६ (४) नुसार स्थायी समितीकडे अपील करण्याची तरतूद असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात विलंब क्षमापित करून संबंधित कर्मचाऱ्यांवरील शास्तीचा पुनर्विचार करावा व त्यांना एकदा माफ करून पुन्हा सेवेत घेण्यात यावे, अशी मागणी चंदनशिवे यांनी केली आहे.




## ए.जी.पाटील टेकफेस्टमध्ये विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांचा आविष्कार

**विविध स्पर्धांना उदंड प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

येथील विजापूर रोड, सैफुल जवळील शांती एज्युकेशन सोसायटी संचलित, ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे वार्षिक तांत्रिक महोत्सव ए. जी. टेकफेस्ट 2k26 अत्यंत उत्साहात आणि विद्यार्थ्यांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाला. या महोत्सवामध्ये विविध अभियांत्रिकी शाखांमधील विद्यार्थ्यांनी आपले तांत्रिक कौशल्य, कल्पकता आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

टेकफेस्ट अंतर्गत विविध विभागांमार्फत अनेक नाविन्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने: संगणक अभियांत्रिकी विभाग: पेपर प्रेझेंटेशन आणि व्हॅलोरंट गेमिंग स्पर्धा. मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग: कॅड वॉर आणि पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा. सिव्हिल अभियांत्रिकी विभाग: टॉवर बिल्डर्स आणि हाऊसी तंबोला कार्निव्हल. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग: रोबो रेस आणि बीजीएमआय गेमिंग अरेना.

या महोत्सवात सोलापूर शहर व जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानासोबतच नेतृत्वगुण, सांघिक भावना आणि स्पर्धात्मक दृष्टिकोन विकसित करण्याची सुवर्णसंधी मिळाली. सर्व सहभागी व विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक पारितोषिके आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले व प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी समन्वयक यांनी विशेष परिश्रम घेतले.महोत्सवाचे मुख्य समन्वयक म्हणून प्रा. कल्याणी मामड्याल यांनी काम पाहिले. तसेच प्रा. ए. आर. मळेकर, प्रा. पी. बी. साबळे, प्रा. आर. एस. होर्टीकर व प्रा. व्ही. एम. भोगडे यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. कार्यक्रमाची सुसूत्रता राखणे या कार्यक्रमाचे सर्व नियोजन प्रा. एन. पी. पाटील, प्रा. एस.एन. उपाध्ये, प्रा. एस.जे.लिगाडे व ए.एम.चिल्ला यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. १३ मे २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - वैशाख, कृ. एकादशी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- उ.भाद्रपदा (२४.१७)
योग - विष्कंभ (२०.५४)
करण - कौलव (२४.३०)
राहू काल : बुधवार
दु. १२.०० ते १.३०

दिनविशेष : १९५२: स्वतंत्र भारतातील संसदेचे पहिले अधिवेशन (राज्यसभा) भरले.
१९६२: भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सर्वोच्च 'भारतरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला.
१९६७: डॉ. झाकीर हुसेन यांनी भारताचे तिसरे राष्ट्रपती म्हणून कार्यभार सांभाळला.
१९५०: फॉर्म्युला वन वर्ल्ड चॅम्पियनशिपची पहिली शर्यत सिल्व्हरस्टोन येथे पार पडली.

## रामलिंग चौडेश्वरी देवी यात्रेस गुरुवारपासून प्रारंभ

**सोलापूर, दि. १२ मे-**

शुक्रवार पेठेतील श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रोत्सवास गुरुवार दि. १४ पासून सुरुवात होणार असून त्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शहर उत्तरचे आ. विजयकुमार देशमुख यांच्या निधीतून श्री चौडेश्वरी मंदिरासमोर बांधण्यात आलेल्या भव्य सभा मंडपाचा लोकार्पण सोहळा मैंदर्गी येथील विरक्त मठाचे म.नि.प्र मृत्युंजय महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते होणार आहे.

तसेच सामाजिक बांधिलकी आणि विकास कामांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सोलापूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा शहर उत्तरचे विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांना श्री चौडेश्वरी सेवा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती श्री चौडेश्वरी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष गुरुनाथ निंबाळे यांनी प्रसिद्धी माध्यमांसमोर दिली आहे.



## महात्मा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्काराने प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था, अहिल्यानगर, महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड (अध्यक्ष -उत्तम सोशल फाउंडेशन) यांना महात्मा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्कार-२०२६ प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास ऋदेश अंबाडे (भाजपा युवा मोर्चा अहिल्यानगर शहर जिल्हा अध्यक्ष), राजश्री शिंदे (प्रसिद्ध रिल्स स्टार) तसेच तुषार बोरुडे (अध्यक्ष- अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड यांनी सामाजिक कार्य, शिक्षण, महिला विकास, जनकल्याण, समाजजागृती आणि लोकहिताच्या विविध उपक्रमांद्वारे केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड यांनी हा सन्मान समाजसेवेची प्रेरणा अधिक बळकट करणारा असल्याचे सांगितले.

## मित्राच्या डोक्यात घातली बाटली; तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १२ मे -**

बिअर पिल्याचे तु १०० रुपये का दिले नाही, असे म्हणत एका तरुणाला लाथा बुक्क्याने मारहाण करून डोक्यात बियरची बाटली घालून जखमी केले. ही घटना जोडभावी पेठ भागातील एस के बिअर शॉप जवळ घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपी जोशेफ मुराणी, पप्पू आणि त्यांचा एक साथीदार अशी गुन्हा दाखल केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत अजिंक्य कराड (रा. मित्र नगर शेळगी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि वरील आरोपी हे ९ मे रोजी सायंकाळी एस के बियर जवळ दारू पिण्यासाठी बसले होते. तेव्हा बियरचे शंभर रुपये देण्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीला मारहाण केली. यावेळी अनोळखी आरोपीने फिर्यादीच्या डोक्यात रिकामी बिअरची बाटली मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार वाडीकर हे या प्रकरणी तपास करत आहेत.



## ऑटो चालकांच्या विविध मागण्यांसाठी लाक्षणिक धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

वाहतूक संघटना संयुक्त महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ऑटो चालकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शासन आणि प्रशासनाचे लक्ष चालकांच्या समस्यांकडे वेधण्यात आले. वाहतूक संघटना संयुक्त महासंघाने मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये ऑटो एलपीजीचे दर कमी करणे, सर्व ऑटो एलपीजी पंप नियमितपणे सुरू ठेवणे, कल्याणकारी मंडळाची सभासद फी कमी करणे आणि सर्व चालकांचा कल्याणकारी मंडळात समावेश करणे. तसेच, प्रत्येक चालकाला वर्षातून एक गणवेश देण्यात यावा आणि चालकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ निर्णय घेण्यात यावा, अन्यथा वाहतूक संघटना संयुक्त महासंघातर्फे आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी वेळी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद, प्रदीप शिंगे, इरफान कल्याणी, इम्रान शेख, शंकर राऊत, अशोक बनसोडे, अकिल शेख, अफसर पिरजादे, मिन्हाज बागवान,मनोज खांडेकर, कादीर शेख उपस्थित होते





## आजपासून वांगी येथे पीर महादेव यात्रा महोत्सवास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १२ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वांगी येथे सालाबादप्रमाणे यंदाही पीर महादेव यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दि. १३ ते १५ मे या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम पार पडणार आहेत.

यात्रेच्या पहिल्या दिवशी बुधवारी दि. १३ मे रोजी पहाटे ५ वाजता महादेवाला अभिषेक करण्यात येणार असून सकाळी ७ वाजता श्री महादेव पालखीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. मंगळवेढा येथील हलगी वादनासह पालखी मिरवणूक गावातून मार्गक्रमण करणार असून सायंकाळी ७ वाजता पीरसाहेब गंध कार्यक्रम होणार आहे. गुरुवारी दि. १४ मे रोजी सकाळी ९ वाजता कलगी तुऱ्याचे गाणे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी २ वाजता पीर साहेब गलीफ भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. शुक्रवारी दि. १५ मे रोजी दुपारी ४ वाजता जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविक व पैलवानांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच रात्री ८ वाजता नयनरम्य शोभेचे दारूकाम होणार असून रात्री १० वाजता सामाजिक, कौटुंबिक व हास्यप्रधान कन्नड नाटक सादर करण्यात येणार आहे.



## संभाजी आरमारचा सामुदायिक विवाह सोहळा

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी दिले शुभाशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व संभाजी आरमार संघटनेच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त संभाजी आरमार संघटनेच्यावतीने आयोजित सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यास महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी या सोहळ्यास उपस्थित राहून वधूवरांना शुभाशीर्वाद दिले व भावी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, आ. विक्रांत पाटील, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, नगरसेवक तथा कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, संभाजी आरमार शहराध्यक्ष सागर ढगे यांच्यासह अन्य मान्यवर संभाजी आरमारचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले विद्यालयाचा दहावीचा निकाल ९२.४२ टक्के



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

शाखा महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मंद्रूप येथील विद्यार्थ्यांनी दहावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. सन २०२५-२६ च्या दहावी परीक्षेत प्रशालेचा निकाल तब्बल ९२.४२ टक्के लागला आहे.

यंदाच्या निकालात श्रुतिका म्हेत्रे हिने ९३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. आयेशा मोमीन हिने ९०.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. तर सानिका कोरे आणि अमरिन शेख यांनी प्रत्येकी ९०.४० टक्के गुण मिळवत संयुक्त तृतीय क्रमांक मिळवला.

प्रशालेतील २३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पी. एल. कोळी, उपाध्यक्ष संदेश कोळी, सचिव एम. डी. कमळे, उपाध्यक्ष डॉ. हवीनाळे, खजिनदार विठ्ठल पाटील, सहसचिव सुबोध कोळी, विश्वस्त नागेश बिराजदार तसेच मुख्याध्यापक कोळी शिवपुत्र आणि शालेय व्यवस्थापन समितीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी प्रशांत शिरगुर यांच्या माध्यमातून शिक्षक आमदार जयंत आसगावकर तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दूरध्वनीद्वारे गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी १४ मे पासून टप्प्याटप्प्याने आंदोलन

**बार्शी, दि. १२ मे-**

महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघ तसेच विद्यापीठ व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांच्या आदेशानुसार कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी दि. १४ मे पासून राज्यभर टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती देणारे निवेदन श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीचे प्राचार्य डॉ. शेख यांना सादर करण्यात आले. सेवक संयुक्त कृती समिती व महासंघाच्या निर्देशानुसार शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. यामध्ये सुरुवातीला दि. १४ ते १६ मे दरम्यान राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये काळ्या फिती लावून आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. १८ ते २० मे या कालावधीत दुपारच्या सुट्टीमध्ये धरणे आंदोलन, निषेध सभा आणि घोषणाबाजी करण्यात येणार आहे. तसेच दि. २५ मे रोजी राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलन करण्यात येणार असून दि. २९ मे रोजी विभागीय सहसंचालक कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शासनाने यानंतरही सकारात्मक निर्णय न घेतल्यास दि. १ जून रोजी अत्यावश्यक सेवा वगळता एकदिवसीय लाक्षणिक कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच प्रलंबित प्रश्न निकाली न निघाल्यास दि. ८ जून २०२६ पासून बेमुदत कामबंद व संप आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थी तसेच विद्यापीठ व महाविद्यालयांचे शैक्षणिक कामकाज विस्कळीत होऊ नये यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही संघटनेकडून करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे सोलापूर जिल्हा सचिव भीमराव मस्के, जिल्हा कार्यकारिणी सदस्य शरद मस्के तसेच महाविद्यालयीन कर्मचारी संतोष कवडे, संदिपान पिंगुरे, श्रीमती मोळवणे एस. एस., दिनेश स्वामी, सचिन मोरे, शहाजी महाडिक, आनंद देशमुख, शिवाजी हाके, रामराजे सूर्यवंशी, दीपक शिर्के, विक्रम काकडे उपस्थित होते.



### अवाजवी एमआरपी रद्द करून वस्तूंवर उत्पादन मूल्य छापण्याची मागणी

**पंढरपूर,दि.१२ मे -**

वस्तूवरील अवाजवी एमआरपी रद्द करा, उत्पादन मुल्य छापा यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने १ मे पासून देशभर आंदोलन सुरू केले आहे. ते अधिक तीव्र केले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली. दैनंदिन गरजेच्या वस्तू विशेषतः पॅकिंग केलेल्या वस्तू, कपडे, औषधे इत्यादींवर सध्या २०० ते ३०० टक्के एमआरपी छापल्याने ग्राहकांची लूट होत आहे. त्यासाठी उत्पादन मूल्य छापावे यासाठी देशव्यापी आंदोलन सुरू केले आहे. त्याचा एक भाग म्हणून पंतप्रधान, अर्थमंत्री, वाणिज्य मंत्री, ग्राहक संरक्षण मंत्री यांना देण्यासाठी सोलापूर जिल्ह्यासह राज्यभरात सर्वत्र सर्व जिल्हाधिकारी, सर्व प्रांताधिकारी, तहसीलदारांना एकाच वेळी निवेदन देण्यात आले. अवाजवी एमआरपी देऊन वस्तू घ्यावी घेण्यास ग्राहक वैतागला आहे. ही बाब अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने लक्षात घेऊन सध्याचा एमआरपी कायदा रद्द करून वस्तुंचे उत्पादन मूल्य छापावे. नफा २० ते ३० टक्केपर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी नवीन कायदा करावा अशी लेखी निवेदनात मागणी केली आहे. आंदोलनात नागरिक, सेवाभावी संस्था, कार्यकर्ते हे सहभागी होत आहेत. नवीन कायदा करावा यासाठी पंतप्रधान, अर्थमंत्री, ग्राहक संरक्षणमंत्री, वित्तमंत्री यांना ग्राहक पंचायतीने दिलेल्या लिंकद्वारे आपले निवेदन पाठवावे असे आवाहन प्रांत सहसचिव दीपक इरकल, प्रांत सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापुरकर, संतोष उपाध्ये यांनी केले आहे. संबंधित निवेदन पंढरपूर प्रांताधिकाऱ्यांचे प्रतिनिधी सहाय्यक महसूल अधिकारी राजेश सावळे यांना देताना जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, तालुकाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सचिव महेश भोसले, उपाध्यक्ष प्रशांत माळवदे, सहसचिव आझाद अल्लापुरकर, अमोल अभंगराव, सागर शिंदे, मंगेश देशपांडे, शशिकांत सुगंधी, विक्रांत कासेगावकर, शाम तापडिया, तेजस फडे आदींसह ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



### अभिजीत वाघमारे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. १२ मे-**

सामाजिक व आरोग्य क्षेत्रात कार्य करणारे समाजसेवक अभिजीत वाघमारे यांना मुंबईच्या आशादीप महिला आधार मंच यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार-२०२६ प्रदान करुन गौरविण्यात आले.

हा पुरस्कार रविवार दि. ३ मे रोजी मुंबई येथे प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार ॲड. निर्मला सामंत-प्रभावळकर, प्रा. अक्षय आंबेडकर, नंदेश उमप, डॉ. कॅरेन टेरी रजा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# पंढरपुरातील सिग्नल यंत्रणा कित्येक वर्षापासून बंद अवस्थेत



**महत्वाच्या चौकात नेहमी वाहतूक कोंडी,**

**बेशिस्त वाहतूकीमुळे अपघाताला निमंत्रण**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ मे-**

शहारातील महत्त्वाच्या चौकांमध्ये वाहनधारकांकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नसल्यामुळे वारंवार वाहतूकीची कोंडी निर्माण होत आहे. या मध्ये भरीसभर म्हणून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांमुळे रोजच छोट्या-मोठ्या अपघातालाही निमंत्रण दिले जात आहे. मात्र वाहतूक पोलिस हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहूनही बेजबाबदार वाहनचालकांवर कोणतीच कारवाई करताना दिसत नाहीत.

शहरातील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय चौक, प्रबोधनकार ठाकरे चौक, अर्बन बँक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, संतपेठ, सांगोला रस्ता चौक आदी महत्वाच्या परिसरात मोठमोठी दुकाने, रुग्णालये, हॉटेल, महाविद्यालय, मैदान आहेत. यामुळे या परिसरात दिवसरात्र रहदारी असते. मालवाहतूक, मुरूम, वाळू यांसारखी जड वाहतूक होते. तसेच, विद्यार्थी, वयोवृध्द नागरिक, महिला आणि मुलीही मोठ्या प्रमाणात दुचाकी व सायकलवर जा-ये करीत असतात. तसेच वाहनधारकांकडून बेदरकारपणे वाहन चालवून वाहतुकीचे नियम पाळले जात नसल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होते. मात्र वाहतूक पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होते आहे. वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना शिस्त लावून शहरातील वाहतूक कोंडी तसेच अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी होत आहे. नागरिकांच्या कररुपातील पैशातून लाखो रुपये खर्चुन उभारलेली स्वातंत्र्यवीर सावरकर चौकातील स्वयंचलित सिंग्नल यंत्रणाही अनेक वर्षापासून बंद अवस्थेतच आहे. ती सुरु ठेवल्यास मुख्य सावरकर चौक, स्टेशन रस्ता येथील वाहतूकीला शिस्त लागेल.

**वारंवार वाहतूक कोंडीची प्रमुख ठिकाणे**

गजानन महाराज मठ परिसर, संपुर्ण प्रदक्षिणा रस्ता, स्टेशन रोड, केबीपी कॉलेज रस्ता, अहिल्यापुल रस्ता, तहसील कचेरीसमोरील रस्ता, भक्तीमार्ग, अर्बन बँक मुख्य शाखा रस्ता, भादुले चौक, नगरपालिकेसमोरील रस्ता, संतपेठ, सांगोला चौक रस्ता, गोपाळपूर रस्ता, विवेक वर्धिनीसमोरील रस्ता, अंबाबाई पटांगण या शिवाय इतर काही रस्त्यांवरही वाहतूक कोंडी होत असते.

**वाहतूक पोलिस, परिवहन विभाग गंभीर नाही**

महत्वाच्या चौकात वाहनधारक चुकीच्या बाजून वाहन वळवतात. परिणामी तेथे दोन्ही-तिन्ही बाजूने वाहने एकमेकांसमोर येतात. यामुळे अपघात होतात. तसेच वाहतुक कोंडीही होते. अशावेळी वाहतूक पोलिसांनी चुकीच्या पद्धतीने वाहन वळविणाऱ्यांना दंड करणे गरजेचे आहे. मोटार वाहन कायदा प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी पार पाडण्यात परिवहन विभागही गंभीर नसल्याचे दिसून येत आहे.

केबीपी कॉलेज चौक, ठाकरे चौक, लिंकरोड, संतपेठ, सांगोला चौक, भादुले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आदी चौकांमधून दररोज सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत वाहतुकीची सतत कोंडी असल्याचे अनेक दिवसांपासून पाहत आहे. जड वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. याठिकाणी वाहतुक पोलिसाची गरज आहे.

– **नागेश पाटील**, नागरिक.

वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष झाल्यास वेळेचा अपव्यय तर होतोच; पण जीवदेखील जातात. कायदा पाळणे हे नागरिकांचे कर्तव्य असून, त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई व्हायलाच हवी. नियम मोडणे क्षणिक मजेची बाब असली, तरी त्यामुळे अपघाती मृत्यू होऊ शकतात. बेशिस्त वाहतुकीचे चक्र तोडण्यासाठी पोलिसांची कठोर कारवाई व्हायला हवी.

– **दत्तात्रय जाधव**, ज्येष्ठ नागरिक.



# 'अश्विनी'मध्ये जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

जागतिक परिचारिका दिनाचे औचित्य साधून अश्विनी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, आसरा चौक येथे विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. परिचारिका व्यवसायातील सेवाभाव, समर्पण आणि मानवतेप्रती असलेली बांधिलकी यांचा गौरव करण्यासाठी हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन, प्रश्नमंजूषा तसेच विविध ज्ञानवर्धक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान विविध स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव संस्थेचे प्राचार्य राजू नराळे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सहभागाचे आणि सर्जनशीलतेचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. तसेच परिचारिका क्षेत्रातील सेवाभाव, रुग्णांप्रती असलेली निष्ठा आणि आरोग्य व्यवस्थेमध्ये परिचारिकांचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

# चांगल्या मोबदल्याची मागणी शासनाने गांभीर्याने घ्यावी

**शक्तीपीठ महामार्ग बाधीत शेतकऱ्यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि. १२ मे-**

सोलापूर जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग जाणार आहे. शासनस्तरावरून यासाठी भूसंपादनाच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. माळशिरस तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचा या महामार्गाला विरोध नाही पण शेत जमिनीला चांगला मोबदला देण्याची मागणी होत आहे. शासनाने ती गांभीर्याने घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

माळशिरस तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या बागायत जमिनी शक्तीपीठ महामार्गात जात आहेत. याचा मोबदला आपल्याला चार ते पाच पट मिळावा या मागणीसाठीच शेतकऱ्यांची सध्या धडपड सुरु आहे. खरेतर यामुळे शेतकरी आपल्या शेतात आंबा, चिकु, डाळींब, द्राक्ष अशा बागांची आपल्या शेतात रातोरात लागवड करीत आहेत. तसेच बांधकाम करणे, विहीर पाडणे, घर, बोअर, याचे मुल्यांकन करुन जास्तीत जास्त मोबदला पदरात पाडून घेण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरु आहे. खरेतर शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार शासनाचे सध्याचे मुल्यांकन खुपच कमी आहे. ते वाढवून चांगला मोबदला शासन देत असेल तर आमचा याला अजिबात विरोध नसल्याचे शेतकरी बोलत आहेत. तर शासनाकडून ३१ जानेवारी २०२३ पासुन मागील तीन वर्षाच्या सॅटेलाईट इमेजचा वापर करुन मोबदला दिला जाणार असल्याचे अधिकारी बोलत आहेत. याला मात्र शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे.

योग्य मोबदला दिल्यास अनेक बाधीत शेतकऱ्यांचा विरोध नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. शासन शेतकऱ्यांसाठी योग्य निर्णय घेईल अशी अपेक्षा बाधीत शेतकऱ्यांना आहे. सध्या आपल्या राजकीय सोयीपोटी शेतकऱ्यांमध्ये दोन गट पाडण्याचे काम राजकीय मंडळीकडून करण्यात येत आहे.

**बाधीत शेतकऱ्यांमध्ये दोन गट**

बाधीत शेतकऱ्यांमधून विरोधी व समर्थनार्थ असे दोन गट सध्या कार्यरत झाले आहेत. तर नुकसान भरपाईसाठी दलालांची टोळी सक्रिय झाली आहे. ज्यादा मोबदला मिळवुन देण्याचे आमीष दाखवून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचे काम सध्या जोरदार सुरु आहे. शासनाने याला वेळीच पायबंद घालणे आवश्यक आहे. शक्तीपीठ महामार्गाला शासनाने योग्य मोबदला द्यावा अशी मागणी बाधीत शेतकऱ्यांमधून होत आहे.

# स्वराज्य माहिती अधिकार संघटनेचा रविवारी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त येत्या १७ मे रोजी सोलापुरातील विजापूर रोडवरील निर्मिती लॉन्स येथे कार्यकर्त्यांचा राज्यस्तरीय मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती संघटनेच्या प्रदेशाध्यक्षा धनश्री उत्पात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा मेळावा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष दीपक कांबळे, संस्थापक तथा मुख्य महासचिव कमलेश शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली दोन सत्रात आयोजित या मेळाव्याचे उद्घाटन आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. याप्रसंगी पोलीस आयुक्त एम. राज कुमार हे पोलीस प्रशासन व पोलीस मित्र या विषयावर ,ज्येष्ठ पत्रकार महेश रामदासी हे पत्रकारिता- काल आज आणि उद्या या विषयावर तर सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्षड. बाबासाहेब जाधव यांचे गुन्हेगारीचे स्वरूप-काल आज आणि उद्या या विषयावर मार्गदर्शन होणार आहे.

तसेच दुसऱ्या सत्रात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत पोलीस उपअधीक्षक प्रीतम यावलकर हे शांतता व सुव्यवस्था आणि पोलीस मित्रांचे कर्तव्य या विषयावर, पत्रकार संजय पाठक यांचे माहितीचा अधिकार आणि पत्रकारिता तसेच ड. दादासाहेब जाधव यांचे दिवाणी प्रकरण आणि सामाजिक कार्यकर्ते या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत .या मेळाव्यात संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे ,असे आवाहन उत्पात यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस चंद्रकांत वेदपाठक, संपत महामुनी, संतोष पोतदार आदी उपस्थित होते.

# विवेकानंद केंद्राच्या वासंतिक शिबिरास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**



विवेकानंद केंद्र कन्याकुमारीच्या वासंतिक शिबीरास सुरुवात झाली. या शिबीरात मुलाना योगीक सुर्य नमस्कार, योगा, आसणे, कला, खेळ, गित, घोषणा, व्याख्यान सत्र, सिला स्मारक, लघुचित्रपट व मुलांचे व्यक्तिमत्वविकास हा उद्देश्याने या शिबिराचे आयोजन केले आहे. याच्या उद्घाटनप्रसंगी विपुल भोपळे ते म्हणाले, तुम्ही खुप भाग्यशाली आहात, अशा शिबीराचे तुम्हीं भागीदार आहात. प्रमुख वक्ते गणेश गुड्डमी यानीं मुलांना स्वावलंबी आणि आत्म निर्भर कसं व्हायचं या शिबिरातून तुम्हाला शिकुन आपल्या जिवनात उतारावयाचं आहे, असे आव्हान केले.

या प्रसंगी मंचावर नगर प्रमुख पंडित बिराजदार, शिबीर प्रमुख प्राजक्ताताई रबकई, व्यवस्था प्रमुख वामनजी कुलकर्णी, संचालक महेशजी गोजारी, शिबिर अधिकारी जयश्रीताई म्हेत्रे उपस्थित होते.



# विद्या विकास मंदिरचा निकाल ९८.४३ टक्के

**वैष्णवी कानगुडे प्रथम**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १२ मे-**

विद्या विकास मंदिर उंबरे (पागे) या प्रशालेचा इयत्ता दहावीचा निकाल ९८.४३ टक्के लागला. यामध्ये वैष्णवी कानगुडे ९६.४०,वैष्णवी वावरे ९०.६०,शिवम तळेकर ८९.६० या विद्यार्थी विद्यार्थिनींनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.विशेष प्राविण्यासह (७५ टक्केच्यावर) १५ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थी, विद्यार्थिनींचा सत्कार करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. मुख्याध्यापक, वर्गशिक्षक, वर्गशिक्षिका यांचेही अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, पालक उपस्थित होते.

# चळे, तुंगत मंडळात दीड हजार दाखले, सेवांचे वितरण

**तहसीलदार सचिन लंगुटे; छत्रपती शिवाजीमहाराज महाराजस्व अभियानातून नागरिकांचे समाधान**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ मे-**

पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गीलावण्यासाठी महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरअभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अतंर्गत पंढरपूर तालुक्यातील चळे व तुंगत मंडळातून नुकतेच एक हजार ५२६ विविध सेवा व विविध दाखले देण्यात आले असल्याची माहित तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

या अभियाना अंतर्गत चळे व तुंगत येथील शिबिरात निकाली काढण्यात आलेले फेरफार १०८, सातबारा मधील दुरुस्ती १६, डिजिटल सातबारा ३८४, ८ अ उतारे ३१२, प्रमाणपत्रे ४६९, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज ०५, भूसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आलेली प्रकरणे १७, अद्यावत अभिलेख ५९, वर्ग दोन जमिन वर्ग एक करण्याबाबत कार्यवाही १६, सामाजिक योजना ४९, शिधापत्रिका ११, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना ५०, आभा कार्ड, एच.बी, तपासणी व औषधोपचार २०, ई- मोजणी फेरफार नकाशा १० आदी सेवा व दाखले देण्यात आले.



यामध्ये चळे मंडळातून ७३१ तर तुंगत मंडळातून ७९५ असे एकूण एक हजार ५२६ विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात आल्याचे तहसीलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

यावेळी आमदार अभिजीत पाटील, जि.प.सदस्यगितांजली साळुंखे, पं.स.सदस्य अतुल गायकवाड, सरपंच ज्ञानेश्वर शिखरे, अमृता रणदिवे, प्रांताधिकारीसचिन इथापे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे उपस्थित होते.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वृक्ष व पशुपक्ष्यांच्या पाण्यासाठी निसर्ग फाऊंडेशनचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ मे-**

वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे वृक्ष, पशू आणि पक्ष्यांना पाण्याची नितांत गरज आहे. ही बाब लक्षात घेऊन निसर्ग सेवा फाऊंडेशनच्या वतीने अक्कलकोट शहर व परिसरात वृक्षांना पाणी देण्याचा तसेच मोकाट जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे.

फाऊंडेशनच्या माध्यमातून यापूर्वी विविध सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने पाणीपुरवठा सुरू केला आहे. यासाठी चार हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी टेम्पोमध्ये ठेवून शहरातील विविध भागांमध्ये झाडांना पाणी देण्याचे कार्य सुरू आहे. ज्या ठिकाणी झाडे व जनावरे पाण्यापासून वंचित राहत आहेत, त्या ठिकाणांची माहिती नागरिकांनी ग्रुपमध्ये संदेशाद्वारे द्यावी किंवा निसर्ग सेवा फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष सुनील बिराजदार व विद्याधर गुरव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.



## महत्त्वाचे...



### अकलूज फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांची 'मायलान लॅबोरेटरीज'मध्ये निवड

**अकलूज, दि.१२ मे-**

कॉलेज ऑफ फार्मसीच्या सहा विद्यार्थ्यांची मायलान लॅबोरेटरीज लिमिटेड, बंगळूर येथे निवड झाली आहे. सोलापूर येथे महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ऑफ कॅम्पस पुल ड्राईव्हमध्ये अंतिम वर्ष बी. फार्मसीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील शहानवाज मुलाणी, ऐश्वर्या कुलकर्णी, आर्यन घाडगे, दीप ननवरे, साक्षी देशमुखे, इरफान सय्यद यांची मायलान लॅबोरेटरीजमध्ये निवड झाली आहे. मायलान लॅबोरेटरीज लिमिटेड बंगळूर या अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीकडून विद्यार्थी निवडीची प्रक्रिया राबवली होती. विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया अप्टीट्यूड टेस्ट, टेक्निकल राऊंड, एच.आर.राउंड अशा वेगवगळ्या परीक्षांमधून पार पडली. कंपनीतील निवड समिती टेक्निकल प्रतिनिधी म्हणून एन.रवी, जे.नवीन कुमार, दिनेश कुमार तसेच एच.आर.प्रतिनिधी जी.के.नितीन, संतोष कुमार आणि कीर्ती कैथवास यांनी काम पाहिले. महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ.मुकुंद गाडे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, मार्गदर्शक संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी अभिनंदन केले. महाविद्यालय विकास समितीचे सभापती विनोदकुमार दोशी तसेच सदस्य नारायण फुले,रामचंद्र गायकवाड, योगेश गांधी व शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील आणि प्राचार्य डॉ.अनिल भानवसे यांनीही अभिनंदन केले.




### सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

**बार्शी, दि. १२ मे-**

सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलचा इयत्ता १० वी (एसएससी) परीक्षा मार्च २०२६ चा निकाल १०० टक्के लागला आहे. परीक्षेला बसलेले विद्यार्थी- ५०, उत्तीर्ण विद्यार्थी- ५०.विशेष प्राविण्य - १९, प्रथम श्रेणी २२, द्वितीय श्रेणी (२पव उश्ररींी)- ४, उत्तीर्ण श्रेणी ५. टक्केवारी १०० टक्के. ९५% पेक्षा अधिक- १, ९०% पेक्षा अधिक- ३, ८५% पेक्षा अधिक- ३, ८०% पेक्षा अधिक- ७. सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलमधील सर्व गौरवशाली यशस्वी विद्यार्थ्यांचे बार्शी एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष आनंद सुलाखे, सचिव अनंत कवठाळे, मुख्याध्यापक तुषार महाजन, संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## तात्पुरत्या पाणीपुरवठा २४ योजनांना मान्यता

### टंचाई कृती आराखड्यातील

- पालकमंत्री जयकुमार गोरे यांची माहिती
- पाण्याचे काटेकोरपणे नियोजन ठेवण्याचे आवाहन
- उजनी मायनस गेल्याने आता आवर्तने बंद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

सद्यस्थितीत जिल्ह्यात अक्कलकोट तालुक्यातील एक व माळशिरस तालुक्यातील चार गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे व पुढच्या काही कालावधीत तो ४० टँकरपर्यंत जाण्याची शक्यता आहे. यामुळे टंचाई कृती आराखड्यातील २४ तात्पुरत्या पाणीपुरवठा योजनांना मान्यता देण्यात येत आहे. कामे त्वरित सुरु करावीत व जिल्ह्यात टंचाईची परिस्थिती उद्भवणार नाही यासाठी काटेकोरपणे नियोजन ठेवावे, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित पाणीटंचाई कृती आराखडा आढावा बैठकीत पालकमंत्री गोरे मार्गदर्शन करत होते. उजनी धरणातून ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन केलेले आहे. उजनी धरणातील पाणीसाठा मायनस ध्ये गेल्याने नवीन आवर्तने यातून देता येणार नाहीत. हे सर्व पाणी पिण्यासाठी आरक्षित असून सद्यस्थितीत पाणी वाटप मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, खासदार ज्योती वाघमारे, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार उत्तम जानकर, आमदार नारायण पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उजनी धरणाचे अधीक्षक अभियंता सकृत खांडेकर, वीज वितरण कंपनीचे अध्यक्ष अभियंता सुनील माने यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील कोणत्याही गावातून संबंधित पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्याकडे टँकर मागणीचा प्रस्ताव आल्यानंतर त्यांनी तो २४ तासात प्रांत अधिकाऱ्यांकडे पाठवावा. त्यानंतरच्या २४ तासात प्रशासनाने या प्रस्तावाला मान्यता द्यावी, म्हणजे ४८ तासात टँकर मागणी प्रस्तावावर प्रशासनाने निर्णय घेऊन मंजुरी द्यावी, असेही निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. मंगळवेढा येथील भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना व अन्य पाणीपुरवठा योजनांसाठी तसेच एमजीपीच्या योजनांसाठी स्वतंत्र बैठक प्रशासनाने आयोजित करण्याबाबत पालकमंत्र्यांनी सुचित केले. पाणीपुरवठा योजनांना वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा सुरळीत ठेवावा, थकबाकी अभावी वीज पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही दिले. यावेळी अधीक्षक अभियंता खांडेकर यांनी उजनी धरणातील पाणीसाठ्याची माहिती दिली. धरणातील पाणीसाठा मृत असून सद्यस्थितीत ५९ टीएमसी पाणीसाठा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सर्व लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदारसंघातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तसेच अन्य पाणीपुरवठा योजनांसाठी वीज पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्याची मागणी केली. गावातून टँकरची मागणी झाल्यास पाहणी करून प्रशासकीय यंत्रणेने त्वरित टँकर सुरू करावा, अशीही मागणी केली.


## आमदार पवार विजयदादांच्या भेटीला

### अकलूजमध्ये भेट; जागविल्या जुन्या आठवणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १२ मे-**

आमदार रोहित पवार यांनी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे वडील राजेंद्र पवार हेही होते. यावेळी आमदार रोहित पवार व राजेंद्र पवार जुन्या आठवणीत रमले.

आमदार राहित पवार यांचे आजोबा डॉ.आप्पासाहेब पवार हे साखर कारखान्यावर एमडी म्हणून कार्यरत होते, हा विषय चर्चेत निघाला. येथील सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याशी पवार कुटुंबाच्या जुळलेल्या आठवणींना उजाळा देताना आमदार रोहित पवार भावूक झाल्याचे पाहायला



मिळाले. त्या वेळेचा यशवंत सहकारी साखर कारखाना स्थापनेपासून कारखान्यावर काही वर्षे एमडी म्हणून कार्यभार सांभाळणारे त्यांचे आजोबा डॉ. अप्पासाहेब पवार ज्या घरात वास्तव्यास होते, त्या घराला रोहित पवार आणि राजेंद्र पवार यांनी भेट दिली.

विशेष म्हणजे, अनेक वर्षांनंतरही हे घर आजही पूर्वीप्रमाणेच जतन करून ठेवले आहे. घराशी निगडित असंख्य आठवणी राजेंद्र पवार यांच्या मनात आजही ताज्याच असल्याने भेटीदरम्यान त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. घरातील प्रत्येक कोपऱ्याशी भावनिक नाते जोडले गेल्याचे दिसून आले. यावेळी बोलताना आमदार रोहित पवार यांनी हे दोन खोल्यांचं केवळ घर नाही, तर माझ्यासाठी संस्कारांची शिदोरी आहे. जमिनीवर राहून लोकांसाठी काम करण्याची प्रेरणा आणि साधेपणाची जाणीव मला अशाच अनुभवांतून मिळाल्याचे सांगितले.

भेटीमुळे अकलूजमधील सहकार क्षेत्राशी आणि त्या काळातील सामाजिक जिव्हाळ्याशी जोडलेल्या अनेक आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या. स्थानिकांमध्येही या भेटीची चर्चा रंगली असून पवार कुटुंबाच्या साधेपणाचे कौतुक होत आहे.



## पंढरपूर मंदिर समितीकडून लाखोंच्या फर्निचरची लावली वाट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ मे-**

येथील श्रीविठ्ठल मंदिरातील सभामंडपालगत एका बाजूला तत्कालीन व्यवस्थापकांसाठी पन्नास लाख रूपये खर्चून बनवलेलं सागवानी फर्निचरयुक्त कार्यालय (केबीन) मंदिरे समितीकडून उध्दवस्त केले आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते गणेश अंकुशराव यांनी मंदिर समितीला जाब विचारला आहे. नेमके स्पष्टीकरण न दिल्यास पालकमंत्र्यांना जाब विचारु असा इशारा दिला आहे.

**सामाजिक कार्यकर्ते गणेश अंकुशराव विचारणार पालकमंत्र्यांना जाब**

> फनिर्चर संदर्भात जर सखोल माहिती मिळाली नाही तर पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते होणाऱ्या दर्शन मंडप भुमिपुजन कार्यक्रमावेळी तीव्र आंदोलन करू, हा कार्यक्रम रोखू. यामुळे जर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर यासाठी सर्वस्वी मंदिर समिती प्रशासन जबाबदार राहील.
> **- गणेश अंकुशराव, सामाजिक कार्यकर्ते, पंढरपूर.**

मंदिर समितीने एका भाविकाकडून देणगी स्वरूपात मिळालेल्या निधीतून नुकतेच या कार्यालयातील फर्निचरसह कार्यालयाच्या नुतनीकरणाचा खर्च केला होता. परंतु कोणतेही कारण न देता, प्रशासकीय परवानगी अथवा ठराव न करता हे कार्यालय फर्निचरसह उध्दवस्त केले आहे. केबीन उभारण्यासाठी ज्या भाविकाने देणगी दिली, त्याचे नाव मंदिरे समितीने जाहीर करावं, हे काम करताना व पुन्हा ते काढून टाकताना मंदिरे समितीने कोणते ठराव केले आहेत का तेही जाहीर करावं, अशा पध्दतीने भाविकांकडून मिळालेल्या देणगीतील लाखो रूपयांची उधळपट्टी करण्याचे अधिकार कारभाऱ्यांना कुणी दिले? असा प्रश्नही अकुंशराव यांनी विचारला आहे. हा मनमानी कारभार व भाविकांच्या भावनांशी चालवलेला हा खेळ खपवून घेणार नाही, याबाबत चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, मंदिर समितीच बरखास्त करावी अशी मागणीही केली आहे.

## तीन गावातील २१ वाड्यावस्त्यांना तीन टँकर सुरु

### दररोज १ लाख ९९ हजार १९९ लि.पाणी पुरवणार

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १२ मे-**

माळशिरस तालुक्यातील पळसमंडळ, सुळेवाडी व पिंपरी या तीन गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जाणार आहे. आज त्या त्या गावांना टँकर रवाना केल्याची माहिती पंचायत समितीचे पाणी पुरवठा उपअभियंता जे.व्ही. सदावरे यांनी दिली.

पळस मंडळातील फडतरीवस्ती, चव्हाणवस्ती, माने साळुंखे वस्ती,पाडुळे भाळेवस्ती, करेवस्ती, शिंदे वाघमोडे वस्ती या सहा वस्त्यांवर २५ हजार लीटर क्षमतेच्या टँकरच्या चार खेपा दररोज करण्यात येणार आहेत. सुळेवाडी येथील इरकर वस्ती, फुले वस्ती या दोन वस्त्यांवर १० हजार लीटर क्षमतेच्या टँकरच्या दोन खेपा दररोज करण्यात येणार आहेत. पिंपरी येथील खडकमाळ, लक्ष्मीनगर, हरणटेक वस्ती, गायरान वस्ती, बाळूमामावाडी, बजबळकर वस्ती, उंबरदेव, बाडवस्ती, दत्तनगर, दत्ताडेवस्ती, राणेवाडी, लांडीवस्ती, कोथळवाट या १३ वस्त्यांवर २४ हजार लीटर क्षमतेच्या टँकरच्या रोज तीन खेपा करण्यात येणार आहेत.

गतवर्षी २५ मार्चलाच टँकर सुरू करावे लागले होते. गतवर्षी मे मध्ये १० टँकर सुरु होते. यावर्षी आज अखेर तीन टँकर सुरु झाले असून कदमवाडी गावाचा प्रस्ताव आला आहे, अशी माहितीही जे.व्ही. सदावरे यांनी दिली. यावेळी शाखा अभियंता ए.एन., आंबले,जे.व्ही. घोळवे, वरिष्ठ सहाय्यक एस. आर.करांडे, सहायक स्थापत्य अभियंता एस. आर. मोरे आदी उपस्थित होते.




## बार्शीत तिसरी अखिल भारतीय बौध्द धम्म परिषद उत्साहात

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक सभेला १०२ वर्षे पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ मे-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बार्शी शहरात झालेल्या 'मुंबई प्रांतिक बहिष्कृत परिषदेत' देशांतर, धर्मांतर आणि नामांतर या विषयांवर ऐतिहासिक भाषण केले होते. या महत्त्वपूर्ण घटनेला १०२ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बार्शीत तिसऱ्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले.

भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल (बार्शी शहर व तालुका शाखा) आणि नालंदा स्तूप बुद्धिजम अँड रिसर्च ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी येथील यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृहात ही परिषद झाली. मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन परिषदेचे उद्घाटन बुद्धसृष्टीचे भंते आर्या मेत्ताजी व त्यांच्या उपासिका संघाच्या उपस्थितीत झाले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे सोलापूर जिल्हा (पूर्व) अध्यक्ष सत्यजित जानराव हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभा धाराशिव उत्तरचे अध्यक्ष लक्ष्मण धावारे, सोलापूर जिल्हा (पूर्व) सरचिटणीस बाबासाहेब क्षीरसागर, महिला जिल्हाध्यक्षा निर्मला कांबळे, धम्मरक्षिता कांबळे, स्वाती जगझाप, नंदा काटे, जगन्नाथ शिंगे, समता सैनिक दलाचे सोलापूर शहरप्रमुख बाबू रणखांबे, समाधान गायकवाड, सोमनाथ गायकवाड, प्रसाद लांबतुरे, शिवशरण थोरे उपस्थित होते. याप्रसंगी लक्ष्मण धावारे, नंदा काटे, धम्मरक्षिता कांबळे, बाबासाहेब क्षीरसागर, स्वाती जगझाप आणि अध्यक्ष सत्यजित जानराव यांनी विचार मांडले.

भंते आर्या मेत्ताजी कार्यक्रमाच्या शेवटी धम्मदेसना देताना भंते आर्या मेत्ताजी यांनी बुद्धवंदनेचे महत्त्व आणि बौद्ध धम्मात 'विनयाचे' (शिस्तीचे) महत्त्व किती मोठे आहे, हे विशद केले. बौद्ध धम्म चळवळीत कार्य करणाऱ्यांनी सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती कृतज्ञ आणि विनम्र असायला हवे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. या परिषदेत बार्शी शहर आणि तालुक्यातील धम्म व मानवतेचे कार्य करणाऱ्या निवडक संस्था आणि व्यक्तींचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच, 'संविधान मालिके'ची निर्मिती करुन समाजात संविधानाच्या विचारांचा प्रसार करणारे अश्वकुमार आहिरे यांचा भंते आर्या मेत्ताजी यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन विश्वास वाघमारे यांनी केले. धम्म परिषदेसाठी तालुकाध्यक्ष सचिन पालके, उपाध्यक्ष शंकर वाघमारे, महिलाध्यक्षा कल्पना तुपिरे, जिल्हा सचिव शामल भोसले, निर्मला वाघमारे, राजश्री राजगुरु, चंद्रकला जाधव, वैशाली जानराव, वंदना वाघमारे, रमा खुने, प्रसाद शिंदे, विजय पालके, वृत्तांत वाघमारे, सचिन जानराव, समाधान ननवरे, आनंद जाधव यांनी परिश्रम घेतले.

## कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरली; तिघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

कुत्रा आडवा आल्याने ट्रिपल सीट दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तिघेजण जखमी झाल्याची घटना लोकसेवा हायस्कूल जवळ सोमवारी रात्री साडेदहा वाजता घडली. मल्लेश म्हेत्रे (वय ३२) आणि विराज धोत्रे (वय ५, रा. बापूजी नगर, सोलापूर) आणि किरण गुडमी (वय २८, रा. शास्त्रीनगर सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. वरील तिघेजण सोमवारी रात्री घराकडे दुचाकीवरून ट्रिपल सीट जात असताना अचानक दुचाकीसमोर कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरली. त्यात तिघेजण खाली पडून मार लागून जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात मित्र भरत साका याने रात्री अकरा वाजता दाखल केले.

## सदस्यपदी मोहन गायकवाड यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १२ मे-**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अंतर्गत जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीत अशासकीय सदस्यपदी कुर्डू (ता. माढा) येथील सामाजिक कार्यकर्ते मोहन गायकवाड यांची नियुक्ती झाली आहे. याबाबत जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना शिफारस देऊन अशासकीय सदस्यपदी नियुक्ती करण्याबाबत सूचित केले होते. या समितीत एकूण सात अशासकीय सदस्य आहेत. या जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तर सचिव सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सोलापूर हे आहेत.